साप्ताहिक
# माणूस
२१ ऑगस्ट ८२ दोन रुपये



टिळक
आणि
आगरकर
नक्षत्रांच्या शर्यती रंगभूमीवर येतात तेव्हा....



बायका जेव्हा
'पुरुषी'
नियोजनाविरुध्द बंड करतात



तुला पुन्हा
पडद्यावर
यायलाच हवं......
असंतोषाची
स्वप्नं विकायला

# माणूस

¤

वर्ष : बाविसावे

अंक : अकरावा

२१ ऑगस्ट १९८२

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

अनंत सालकर

¤


# सीमेवरून परत !

घाशीराम कोतवाल या नाटकात मराठी समाजाचा ऱ्हासकाल आपल्याला दिसतो.

हा समाज कात टाकून, तरारून, पुन्हा वर कसा उठू पहात होता? विश्राम बेडेकरांचे नुकतेच रंगभूमीवर आलेले 'टिळक आणि आगरकर' हे नाटक यादृष्टीने उद्‌बोधक आहे.

बावनखाणीतले शृंगार आता संपलेले आहेत. देशासाठी कडकडीत वैराग्य पत्करणाऱ्याची नवी पिढी पुढे आलेली आहे.

लावण्या आणि लघुरूद्र-महारूद्रां-ऐवजी मिस्स-स्पेन्सरांच्या ग्रंथांची पारायणे झडताहेत, वाघिणीचे दूध घरोघर पोचते आहे.

देशाच्या दु:स्थितीमागील, पराभवामागील कारणपरंपरांचा वेध घेतला जात आहे, त्यावर उपाययोजनाही सुरू झाली आहे.

कुणी सामाजिक सुधारणांवर भर दिला, कुणी राजकीय लढ्याला अग्रक्रम देत होते.

ऱ्हासकालाची जागा उत्थानकालाने घेतली. हे उत्थान किती तेजस्वी होते? उदात्ततेने कसे भारलेले होते ?

बेडेकरांच्या नव्या नाटकात या उदात्तपर्वाचे आपल्याला नीट दर्शन घडते.

¤

तसे पाहिले तर ध्येयवादित्व, उदात्त प्रवृत्ती सोडली तर टिळक आणि आगरकर या दोन व्यक्तिमत्त्वात साम्याऐवजी विरोधच अधिक आहे. आगरकर यांचे लहानपण कमालीच्या दारिद्र्यात गेले. दम्याचा विकार तरुणपणापासूनच त्यांना त्रास देत होता. या आधिव्याधींनी त्यांच्या स्वभावात एक प्रकारचा कडवटपणा, चिरचिरेपणा आला असण्याची खूपच शक्यता आहे. त्यामानाने टिळक सुखवस्तू व एक वर्ष व्यायामात घालवल्याने तब्बेतीने चागलेच ठणठणीत! आगरकर बुद्धिवादी असले तरी वृत्ती भावनाप्रधान ! टिळक धोरणी. आगरकराना काव्य–नाटकादिकाची, साहित्याची आवड तर टिळकांचा संचार गणितात, प्राचीन वेदवाङ्मयात. टिळकांचा लोकसंग्रह दांडगा. कार्यशक्ती अफाट. त्यामानाने आगरकराची ही बाजू दुबळीच. अशा या दोन भिन्न प्रवृत्ती एकत्र बऱ्याच काळ राहिल्या हेच खरं म्हणजे एक आश्चर्य आहे. वैचारिक मतभेद पहिल्यापासूनच होते; ते फार तीव्र स्वरूपाचे नव्हते व नंतरही वैचारिक मतभेदामुळे ही दोन व्यक्तिमत्त्वे परस्परांपासून लांब गेली, हे तितकेसे खरेही नाही. टिळकांनी आपल्या मुलीचे लग्न आगरकरांना संमत होईल असे वय झाल्यावर केले व आगरकरांनीही शेवटी आपल्या सुधारकातून राजकीय हक्कांचा पुरस्कार केलेलाच आहे. मग दोघांचे बिनसले कोठे व का ? दोघांचे मूळ स्वभाव जागे झाले व मार्ग त्यामुळे बदलले. आगरकर हे मूलत: लेखक–साहित्यिक, केवळ विचारसृष्टीत रमणारे. याउलट टिळक हे लोकाग्रणी. नवीन तत्त्वांचा शोध घेणे ही आगरकरांची प्रेरणा होती तर टिळकांनी जनतेलाच परमेश्वर मानून आपली सारी विद्वत्ता, आपले सारे तनमनधन 'श्रीशाय जनतान्मने' अर्पण केले होते. गीता ही

त्याची श्रद्धा होती, गीतेतील तत्त्वज्ञान ते प्रत्यक्ष जगत होते. एक केवळ प्रज्ञावंत होता, त्यामुळे हळूहळू तो एकाकी होत राहणे अपरिहार्य होते. दुसरा लोकसागराशी एकरूप होऊ पाहत होता. ही भिन्न दिशांची वाटचाल होती. विचारभेद फार खोलवरचे नव्हते. ते कसेही सांधून घेता आले असते; पण मूळप्रकृतीच वेगवेगळी होती. दोघांचे 'स्वधर्म' भिन्नभिन्न होते. त्यामुळे दुरावा वाढत गेला, दोघांच्या दोन वाटा झाल्या. 'एक सत्यशोधक', 'एक लोकनेता' असा खरा भेद या व्यक्तिमत्त्वात होता. काही काळ ध्येयवादित्वामुळे ही व्यक्तिमत्त्वे एकत्र आली, त्यांनी इतिहास घडवला; पण दोघांची आंतरिक बाधिलकीच वेगवेगळी असल्याने वाटचाल वेगवेगळी होणे अपरिहार्य होते.

नाटक या अंतिम पातळीवर मात्र जात नाही.

¤

नाटकाचा विषय टिळक–आगरकरांची मैत्री हा आहे. दोघांची फाटाफूट झाली तरी मैत्रीचा धागा शेवटपर्यंत अतूट होता हे नाटकात प्रामुख्याने दाखवले आहे; परंतु तिसऱ्या अकात नाटक आगरकरावर केंद्रित होते. त्यांचा आजार, त्यांचे एकाकीपण गडद होत चालले आहे. त्याचा पुतण्या नाना हाही शेवटी त्यांना सोडून जातो. मृत्यु घोटाळताना दिसतो. अखेर गाठतोही! मग एका भव्य शोकातिकेत या नाटकाचा शेवट का होत नाही? नाटक टिळक-आगरकरांचेच का राहते? काळाच्या आणि वैयक्तिकतेच्या सीमा ते का ओलांडत नाही? दोन मित्रांचे नाटक शेवटी दोन महाप्रेरणाचे, दोन मूलभूत मानवी प्रवृत्तीचे प्रातिनिधिक नाटक ठरायला हवे होते. तसा विषय होता, तसा समर्थ नाटककार होता. आगरकर-प्रवृत्तीचा अंतिम आविष्कार सॉक्रेटिस हा आहे–-कोणत्याही सर्वंकष श्रद्धेला नकार आणि संशयवाद. सत्याचा नित्यनवा शोध. या शोधप्रवृत्तीमुळेच अशा व्यक्ती कुठेही थांबत नाहीत, आत्मसदेहाचा छळ सतत सोसत राहतात. 'एकला चलो रे' शिवाय अशा व्यक्तींना गत्यंतर नसते. ही एकटेपणाकडची सखोल पण अपरिहार्य वाटचाल या नाटकात दिसत नाही. वेगळेपणाचे, संघर्षाचे सूत्र केवळ सामाजिक व वैयक्तिक पातळीवर रेंगाळत राहिले. ते दोन भिन्न व्यक्तिमत्त्वांच्या, त्यांच्या जीवनदर्शनांच्या गाभ्यापर्यंत पोचले नाही. सत्यशोधक आगरकरांचा अटळ अंतिम एकाकीपणा तिसऱ्या अंकात हवा तसा भिडत नाही. असे घडले असते तर टिळक–आगरकर हे नाटक फार वर गेले असते–भव्य ठरले असते. भारतीय काय, परदेशी रंगभूमीही या नाटकाने प्रभावित केली असती!

¤

तरीही नाटक महाराष्ट्राबाहेर, भारतात–परदेशात जायला हवे. घाशीराम किंवा 'शतरंज के खिलाडी' मध्ये दिसून येणारा अवनत भारत जसा पाश्चात्यांनी पाहिला तसा हा आधुनिक व उन्नत भारतही त्यांना दिसायला नको का?

¤

अवनत समाज, पराभूत, विकृत आणि वैफल्यवादी माणसे यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या छबिलदासी–महानिर्वाणी नाटकाचा जमाना मागे पडतो आहे का? कारण टिळक–आगरकर या नाटकात माणूस किती उदात्त आणि उन्नत पातळीवर वावरू शकतो, महान असू शकतो हे दाखवले आहे. नाटकात शेवटी प्रभावी ठरते माणुसकी–मानवी सौहार्द – चैतन्य! – जे छबिलदासी नाटकांनी रंगभूमीवरून हद्दपारच करून टाकले होते. ते पुन्हा येऊ पाहत आहे काय?

–श्री. ग. मा.

# नक्षत्रांच्या शर्यती

८ ऑगस्टला नुकतंच एक नवीन नाटक रंगभूमीवर आलं. नाटकाचं नाव अगदी सरळ आणि स्पष्ट–'टिळक आणि आगरकर'. काही नाटकं प्रत्यक्ष स्टेजवर येण्याआधीच गाजतात, त्याच जातीतलं हे नाटक. कारण नाटकाचे लेखक जबरदस्त. 'रणांगण' कर्ते विश्राम बेडेकर. त्यामुळे नाटक कसं होणार याबद्दल आधीपासूनच कुतूहल होतं.

नाटक रंगभूमीवर येण्यापूर्वीच नाटकाचं पुस्तक 'पॉप्युलर' ने प्रकाशित केलं आहे. प्रयोगापूर्वी 'टिळक आणि आगरकर' हातात आलं तेव्हा बेडेकराच्या निवेदनाने प्रथम लक्ष वेधून घेतलं लेखकाच्या मनात नाटक आकार घेत असतं तेव्हाचा प्रवास खरोखरच फार गुंतागुंतीचा, आणि तो वाचकासमोर ठेवण्याचा प्रयत्न करणं तर त्याहूनही अवघड आणि क्लिष्ट. लेखकाची भूमिका स्पष्ट होण्याऐवजी गैरसमज होण्याची चिन्हे अधिक. बेडेकरानी निवडलेले नायक – टिळक आणि आगरकर. दोघेही तुल्यबळ, त्यामुळे झुंज होते ती अटीतटीची. दोघाची उद्दिष्टे एक; परंतु मार्ग पूर्ण वेगळे. दोघाचे स्वभावधर्म भिन्न, प्रकृतिधर्म भिन्न भावना आणि बुद्धी याना परिणामकारकपणे आवाहन करणारे दोन स्वतंत्र नायक एकाच नाटकात असतील तर लेखकाकडून नाटक झुकण्याची शक्यता तर सतत असते. निवेदन वाचत असताना बेडेकरांचं 'झुकतं माप' कोणाला याचा अंदाज घेण्यापूर्वीच नाटकाची बाधणी लक्षात आली. निवेदनात बेडेकर म्हणतात, 'नाटकाला एक सूत्र असते. नाटक अंग धरते तसतसे त्या सूत्राला बाळसे येते. त्यात जोम संचारतो. त्याचे स्वत.चे तर्कशास्त्र तयार होते. ते नाटकाला अटळपणे त्याच्या उद्दिष्टाकडे घेऊन जाते. मग त्या सूत्राला हवे तसे वाकवणे, वळवणे लिहिणाराच्या हातात फारसे रहात नाही. जबरी केली तर नाटक ढासळते.'

टिळक–आगरकरांची प्रकट–अप्रकट मैत्री हे या नाटकाचे सूत्र–नाटक अंग धरते याच सूत्राभोवती. आता या सूत्राला बळकटी आण-

एक

ण्यासाठी नेमके संदर्भ निवडणे हे लेखकाचे काम. मैत्री हा विषयच मुळी भावनेला भिडणारा. टिळक आणि आगरकरांपैकी दोघेही 'मैत्री' बद्दल कमालीचे संवेदनाक्षम. त्यामुळेच आत्यंतिक प्रेम आणि आत्यतिक द्वेष हे टिळक-आगरकरसंबंधाचे वैशिष्ट्य. अशा वेळी एखाद दुसरा प्रसंग, संदर्भ जरी रंगवला तरी हे सूत्र 'मेलोड्रॅमॅटिक' व्हायला वेळ लागत नाही. लेखक म्हणून वेडेकराचे वैशिदिसते ते इथे. टिळक-आगरकरांची भांडणे म्हणजे अटीतटीचा बौद्धिक मुकाबला. त्यामुळे बाह्यात्कारी ते दोघे एकमेकांचे कट्टर विरोधक म्हणून उभे ठाकले. 'केसरी' आणि 'सुधारक' ही त्यांची अधिकृत माध्यमे. आता या बौद्धिक झुंजीबरोबच टिळक-आगरकांच्या आंतरिक विशुद्ध मैत्रीचे सूत्र कसे आकार घेणार हाच प्रश्न. नाटकाचे सूत्र पुढे नेण्यासाठी वेडेकरांनी निवडलेले संदर्भ प्रामाणिक आहेत, त्याला वास्तवाचा भक्कम आधार आहे. घटनांच्या अनुषंगाने येणाऱ्या संदर्भात एक ओघ, ठाशीव सुसूत्रता आहे. जी सूत्राला विनासायास त्याच्या उद्दिष्टाकडे घेऊन जाते' तीही तर्काच्या चौकटीत. यासाठी वेडेकरांना नाटकावर आणि स्वत:वर कोणतीही जबरी करावी लागली नाही. नाटकाच्या संहितेत भक्कम सहजता आहे ती यामुळे.

आगरकरांवर वेडेकरांची भक्ती लहानपणीच जडली असं ते निवेदनात म्हणतात; पण त्याचं कारण त्यांना स्पष्ट उमगलं ते आताआता, नाटकाच्या निमित्ताने लिहित–वाचत असताना. या नाटकप्रवासात आगरकर दिसले ते कसे?–

'एखादा डोंगर एकटाच दिसावा, त्यावर वणवा पेटावा, तो जळतच रहावा, त्यात त्या डोंगराने स्वतःच्या अंगाखांद्यावर वाढवलेली झाडे जळून जावीत आणि त्याच्या सावलीला तो स्वतःच पारखा व्हावा असे त्याचे आयुष्य वाटते 'या वेळेपर्यंत नाटकाचं नाव 'टिळक आणि आगरकर' की 'आगरकर आणि टिळक' अशी बाळबोध वाटणारी पण गुतागुतीची शंका उपस्थित होते.

नाटक वाचून झाल्यावर एक खऱ्या अर्थाने ( balanced संतुलित ) नाट्यप्रयोग वाचल्याचे समाधान मिळते. टिळक विचार निर्णयात ठाम.त्यांची उद्दिष्टं निश्चित.त्यासाठी प्रसंगी थोडा गनिमी कावा करण्याइतपत लवचिकपणा.लोकमताची अचूक नाडीपरीक्षा त्यांना अवगत होती. प्रसंगी हळवे पण एरव्ही परखड आणि चटपटीत भावनेच्या आहारी जाऊन एखादा गैरनिर्णय घेण्याचा प्रसंग टिळकांच्या एकूण आयुष्यात क्वचितच आढळतो. आगरकरांचं चित्र याहून बरंच वेगळं आहे. कमालीचे बुद्धिवादी, तर्ककठोर आणि भावनाप्रधान, त्यामुळे विचाराने कधी कधी ठिसूळ. बुद्धिवादामध्ये असलेली अहं–मन्यता, त्यामुळे सर्वसामान्यापासून फटकून राहण्याची वृत्ती आणि त्यामुळेच कमालीचं एकटेपण. आचार-विचारातील व्यक्तिनिष्ठतेमुळ आचारात टोकाची तळमळ आणि सवेदन–क्षमता. आगरकराची ही वैशिष्ट्यं. आगरकरांचं दुःख समजावून घ्यायचं असेल तर त्यांचं लहानपणापासून साथसंगत करीत आलेलं दारिद्र्य आणि दम्याच दुखणं आणि नंतर वैचारिक एकटेपण विसरता येत नाही.

टिळक–आगरकर नाटकात आगरकर उभे राहतात ते अशा मागच्या सर्व संदर्भांसहित, त्याच्या गुणदोषासहित. शिक्षणासाठी घेतलेले पोखरणारे कष्ट, दारिद्र्य, आई–वडिलांच्या त्यांच्याकडून पैसा आणि मानमरातब मिळ–ण्याबाबतच्या रास्त अपेक्षा आणि तशी सधी डोळ्यांसमोर दिसत असताना, ती झुगारून टिळकाबरोबर राहण्याचा आगरकरांचा निर्णय जास्त प्रखर वाटतो, भिडतो. संपूर्ण नाटकात आगरकर सुरुवातीपासून शेवटपर्यंत क्रमाक्रमाने स्पष्ट होत जातात. नेमकं तेच टिळकांच्या व्यक्तिरेखेचं होत नाही. नाटकाचं सूत्र आहे त्यांची मैत्री, पण त्याचे संदर्भ अर्थातच कौटुंबिक, सामाजिक, राजकीय आहेत नाटकातला टिळकांचा संदर्भ येतो तोच मुळी आगरकराचे गैरसमज दूर करण्याच्या भूमिकेतून. त्या त्या प्रसंगाच्या निमित्ताने टिळकाचं विचारविश्व आगरकराइतकं स्पष्ट नाही. ते सूक्ष्मपणे शोधत राहावे लागत. असे प्रसंग नाटकात जागोजागी आहेत. उदा. 'तुझ्या आई–वडिलासाठी तुला काही वेगळी व्यवस्था करायची असल्यास ––––!' असे म्हणून आगरकराचे घट्ट पाय अजमाव–ताना, डोंगरीच्या तुरुंगात 'समाज सुधारा–यचा असेल तर त्यासाठी जगायला हवं' म्हणून पाण्याच्या घोटाबरोबर तुकडे गिळून आगरकरांची चिंता करताना, पंडिता रमा–बाईंचा 'विद्वान' बाई म्हणून आगरकरांनी उल्लेख करताच, 'हो! पण मिशनऱ्यांच्या नादी आहे' म्हणून फटकारून लावताना, 'समाज सुधारणा हवी आहे; पण लोकमताने, कायद्याने नाही!' हे परखड, तुटकपणे सांगताना. इ.

संपूर्ण तीन अंकात घेतलेल्या या नाटकाचं ढोबळ वर्गीकरण करायचं तर पहिल्या अंकात टिळक–आगरकराच्या मैत्रीची घट्ट वीण छोट्या छोट्या प्रसगांतून आकार घेते. मग सुरू होतात ते वैचारिक मतभेद.त्यामुळं आगरकराच्या स्वतंत्र 'सुधारक'पत्राची स्थापना आणि मग अटीतटीचा बौद्धिक मुकाबला–जो बऱ्याच वेळा व्यक्तिगत दोषारोपांच्या पातळीवर जातो. संमतिवयाचा कायदा हा विद्वेषाचा परमोच्च बिंदू! त्यातून टिळकांना मिळालेली मान्यता आणि बोलघेवड्या सुधारकांमुळं आगरकराना झालेला मनस्ताप. सर्व सुधारकी मतांना टिळकांनी आचरणातून दिलेला पाठिंबा आणि सुधारक म्हणवणाऱ्या मंडळीच्या वागण्यातला विरोधाभास. यातून आपण चुकीच्या मार्गात वाहवत गेलो की काय, या जाणिवेतून आगरकरांची अस्वस्थता. टिळकाच्या 'राजकीय सुधारणे'-बद्दल नंतर उघड उघड दिलेलं अनुकूल मत. जवळचा मित्र लोकनेता म्हणून घडताना पाहिल्याचा आनंद, पण तो व्यक्त करता येत नाही म्हणून असह्याय्य चिडचीड. कमालीच्या भावनाप्रधानतेमुळं आंतरिक प्रेम आणि जिव्हाळा, तो झाकोळून टाकणारा व्यक्तिगत मत्सर, तिरस्कार आणि त्याबद्दल पश्चात्ताप. टिळक आगरकर मैत्रीची ही विविध रूपं. नाटकात टिळक उभे रहातात ते आगरकराना ओळख पटवून देण्याच्या मार्गदर्शक समजस भूमिकेतून. नाटकात टिळकांची भूमिका फारशी पोचत नाही याचं कारण टिळकाची भूमिका करणारा प्रमोद पवार नाही तर स्पष्टपणे वेडेकरांचं संयमी लिखाण आहे. आगरकरांच्या फुलून फुलून केलेल्या संवादांच्या पार्श्वभूमीवर टिळकाचा समजदार अभिनय चमकावून गेला तरी मवाळ वाटतो.

वेडेकरांच्या नाटकाचं दुसरं वैशिष्टच म्हणजे नाटकात तत्कालीन सामाजिक व्यवस्थेच घडणारं दर्शन. न्हाणवलीची मिरवणूक, गर्भादानसमारंभ विकेशा सोवळ्या काकूंच्या चित्रणातून हे दर्शन सहज घडतं.प्रयोगातील केशभूषा, वेशभूषा आणि नेपथ्य परिणाम कारक आहे. नाटकातल्या इतर भूमिकाविषयी बोलायचं तर टिळक-आगरकर–गोपाळराव जोशी या तीन पात्रांशिवाय सत्यभामा (टिळकाची पत्नी), यशोदा ( आगरकराची

पत्नी), सार्वजनिक काकू, आगरकरांची आई व नाना काका ही पात्रे प्रमुख व्यक्तिरेखांना जोड देतात; पण ती स्वतंत्रपणे उभी राहू शकत नाहीत, व्यक्तिरेखा तितक्या प्रभावी असण्याची शक्यता असली तरी. बेडेकरांच्या नाटक-सूत्राचे हेच निर्णायक उद्दिष्ट असेल कदाचित.

१८८० ते १८९३ हा जेमतेम १३ वर्षांचा कालखंड नाटकात आहे. केसरी–मराठा वृत्तपत्रांची सुरुवात, न्यू इंग्लिश स्कूल आणि फर्ग्यूसन कॉलेजची स्थापना. या संस्थातील टिळक आगरकर मतभेद 'सुधारक'ची सुरुवात, क्रीडाभुवनातील आगरकरांची 'संमति वय कायद्याची' उधळलेली सभा, चहाच्या ग्रामण्याची घटना, कोल्हापूरच्या छत्रपतीवरील अन्याय, त्याला 'केसरी'नं दिलेली प्रसिद्धी, त्यातून टिळक आगरकरांची डोंगरी तुरुंगातील शिक्षा, न्या. रानडयांच्या विरोधात टिळकांनी घेतलेली सभा, केसरी-सुधारकातून दोघांनी मैत्रीची सोडलेली मर्यादा, यासारखे अनेक महत्त्वाचे प्रसंग त्या वेळचे ताण तणाव स्पष्ट करतात. याचं श्रेय पूर्णपणे बेडेकरांच्या संदर्भ निवडीला आणि त्याच्या मांडणीला आहे.

आगरकरांच्या मृत्यूपाशी नाटक संपते. टिळकांशी धरलेलं वैर संपवण्याची आगरकरांची तळमळीची इच्छा पूर्ण होऊ शकत नाही. हा मैत्रीचा परमोच्च बिंदू नाटक वर नेऊन ठेवतो. 'महाराष्ट्रातल्या मुलींना आता रडावं लागणार नाही, कारण इथे गोपाळराव आगरकर होऊन गेले आहेत.' या टिळकांच्या उत्कट वाक्यात टिळक-आगरकर विरोध वाहून जातो.

इथं नाटक संपलेलं असतं. 'टिळक-आगरकर' बघणं हा एक उत्कट अनुभव आहे. प्रेक्षकांना बांधून ठेवण्याचा ओघ बेडेकरांच्या संवादात, दिग्दर्शनात आहे. टिळक–आगरकराच्या या 'नक्षत्राच्या शर्यती' आणि त्या पाठीमागची मैत्रीची हळुवार भक्कम वीण नाटकातून साकार करणं हे धाडसाचं काम बेडेकरानी समर्थपणे पेलल आहे. मुंबई साहित्य संघाच्या नाटय शाखेनं त्याला सुरेख साथ दिली आहे. बेडेकर म्हणतात, 'ब्रह्मकुमारी' हे स्वतंत्र नाटक लिहिलं तेव्हा गणिताचा अभ्यास ताजा होता. त्या वेळी गणित सोडवण्याचं प्रमाणबद्ध, रेखीव तंत्र आता जुनं झालं असेल, पण रीत? ती मात्र तितकीच सरळ आणि आकर्षक आहे.

— मेधा देशपांडे

# डॉ. सुधीर फडके

## एक सहृदय साम्यवादी

डॉ. सुरेश गं. सराफ

१६ जुलैला दवाखान्यात जाण्यापूर्वी वर्तमानपत्र भरावाने चाळताना, 'नासिकचे डॉ. सुधीर फडके यांचे दुःखद निधन' ही बातमी वाचून मन क्षणभर सुन्न झाले. पुढील बोल्ड-टाइप वार्तेत कविवर्य तात्यासाहेब शिरवाडकरांची एका स्नेह्याच्या चिर-वियोगाच्या भावनेतून शब्दबद्ध झालेली प्रतिक्रिया वाचताना न कळत चष्म्याच्या आत दहिवर साठले अन् गेला १४–१५ वर्षांचा कालावधी चित्रपटासारखा डोळ्यांसमोरून तरळून गेला!

वैद्यकाचा विद्यार्थी असताना 'अॅनॉटॉमीचे डेमॉन्स्ट्रेटर' या नात्याने फडकेसर या 'कडव्या पंतोजीने' वैद्यकविश्वाच्या उंबरठ्यावर गाठले. 'छडी लागे छमछम'च्या मालिकेवर विश्वास ठेवणारे डॉक्टर डिसेक्शन चुकविणाऱ्या विद्यार्थ्यांना (व विशेषतः विद्यार्थिनींनासुद्धा...) बेशिस्त वर्तनाबद्दल कडू–तीव्र शब्दांचे फटकारे मारत नि प्रसंगी अप्रियही होत! अर्थात माझ्या संदर्भात हे गुरु–शिष्य–नाते सपून या कवि–मनाच्या माणसाशी, माझे हितचिंतक, पालक व प्रसंगी मोकळ्या मनाने तात्त्विक पराभव मान्य करणारे ज्येष्ठ स्नेही म्हणून नात्याची चढती-भाजणी केव्हा सुरू झाली ते दोघांनाही समजले नाही. साठी ओलांडलेल्या, बुद्धीने नाठाळ न होता, एकतृतियांश वयाच्या जवानांबरोबर गप्पांच्या मैफलीला बसलेले ऐकून सनातनी विचारांच्या पगडीच्या झिरमिळ्या पडतील! परंतु वैद्यकीय, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सास्कृतिक क्षेत्रांतील ज्या शेकडो तरुण दोस्तांबरोबर त्यांची 'मैफल' सजली होती, त्या साऱ्यांची खत आता राहील की, (चुकून) कौतुकाची गोष्ट हातून घडली तर शाबासकी देणारा डॉक्टरांचा हात आज पाठीवर नाही! 'घरचं खाऊन लष्कराच्या भाकरी (न करपता) भाजणाऱ्यांना व सामाजिक जाण ठेवून धडपडणाऱ्यांना, हताश झालेल्या निराश मनावर ऋजु शब्दांचे सिंचन करणारे व पुनः आत्मविश्वास जागा करणारे नि कार्यप्रवण करणारे डॉ. फडके आज आपल्यात नाहीत, याची जीवघेणी बोचणी त्यांच्या हजारो स्नेह्यांना आता वाटतेय!

डॉक्टरांशी प्रथमच परिचय झालेली खूपशी माणसे त्यांना 'फटकळ' समजत; पण त्यांना ह्या 'कोकणच्या फणसाचे' अंतरंगच समजले नाही, असे खेदाने सांगावे लागेल! बाहेरून दिसणारे बोचरे काटे हेच त्यांचं अंतरंग मानलं तर आतील गरापासून मिळणारा तृप्तीचा ओलावा उमजून घेण्याची संधी ज्यांना मिळाली नाही, ते करंटे होत! मिळमिळीत अवघे टाकून देऊन, 'उत्कट भव्य तेच घेणारे' डॉ. फडके, प्रत्यक्ष रामदासांनाही न मानता, रामदासी बंडखोर शिकवणुकीचा जन्मभर अंगीकार करीत होते.

स्वातंत्र्यानंतरच्या तरुण पिढीसमोर प्रत्तुग आदर्श समोर ठेवण्यात नियतीने थोडा हात आखडता घेतलाय! पण स्वातंत्र्यलढ्यातील व साऱ्या समाजजीवनात लो. टिळक, स्वा. सावरकर, म. गांधी, सुभाषबाबू आदि लोकोत्तर कर्मयोग्यांच्या सोनेरी कालखंडात उमेदीचा काळ कंठणारे सारेच धन्य होत! हे सांगण्याचा हेतू हा की, डॉ. विठ्ठल भिकाजी ऊर्फ डॉ. सुधीर फडके काय किंवा त्याचे जव्हार या गावचे शाळा-सोबती व नासिकच्या जीवनाचा चालता–बोलता ज्ञानकोश शब्द–प्रभू डॉ. वि. म. गोगटे काय यांच्या जीवनात 'सार्वजनिक आयुष्य' नावाची अलीकडे बुद्धिमंतांनी वाळीत टाकलेल्या जीवनांगाची मुक्त–समृद्ध उधळण आहे! अधिक ठळकपणे उदाहरणे डॉ. फडक्यांच्या आसपासची सांगायची तर, मराठी सारस्वताचे 'वैभव' असणारे, नासिकची 'श्रीमंती' वाढविणारे चिरतरुण कवी आम्हा युवकांचे लाडके आदरणीय साहित्यिक तात्यासाहेब शिरवाडकर काय किंवा जव्हार गावचेच ज्येष्ठ पुरोगामी विचारवंत प्रा. गं. बा. सरदार काय किंवा औद्योगिक नासिकच्या 'सुंदरते' कडील वाटचालीत नगराध्यक्ष या नात्याने बजावलेल्या अमोल कामगिरीबरोबरच आय. एम. ए. व इतर अनेक सेवा-

भावी संस्थांना आकार देण्यात सिंहाचा वाटा उचलणारे डॉ. वसंतराव गुप्ते काय, ही सारी ध्येयाने झपाटलेली माणसे स्वातंत्र्यपूर्व काळातील परिसापासून सोनं होण्याची 'किमया' होय !

डॉ. फडकेंचे 'रम्य ते बालपण' वगैरे सारे पाचवीला पुजलेल्या दारिद्र्याशी लढण्यात गेले; परंतु केवळ गरिबी माणसाचे कर्तृत्व कोमेजून टाकू शकत नाही. विलक्षण प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देऊन दैवावर मांड ठोकाण्यची निधडी छाती व 'मदायत्तं तु पौरुषम्' ही स्वप्न-वाणी सार्थ करण्याची पराकोटीची मनस्विता हा त्यांच्या अखेरच्या रुग्णावस्थेतही झुंजताना प्रकर्षाने दिसलेला स्वभावविशेष ! या मनस्वी माणसाच्या लहानपणातच वडिलांचा आधार गेला व भावंडे पोरकी झाली. ज्या पंधराव्या वर्षात आम्हाला जबाबदारी नावाच्या दुष्ट शब्दाची 'ॲलर्जी' असते, त्या कोवळ्या वयात २ वर्षे ट्रेनिंग घेऊन मास्तरकी केली ती भावंडाना शिकविण्यासाठी ! कथा-कादंबरीत शोभेल अशी रोमँटिक अद्‌भुत-रम्य कहाणी आहे, त्यांनी मेडिकल कॉलेजमध्ये केलेल्या प्रेमविवाहाची ! (कोठे आणि कधी तरी हे त्यांचे राजहंस-प्रकाशित राज्यसरकारपुरस्कृत आत्मकथन किमान त्यासाठी तरी वाचावे !) ती सुरम्य कथा त्यांच्याच तोंडून ऐकायला मिळणे, हा अेक अमृत योग आहे. हवी ती सोबत मिळाल्यावर त्या ध्येयवेड्या डॉ. सुधाताईंनी व त्यांच्या निधनानंतर द्वितीय पत्नी श्रीमती पमाताईंनी, या पक्षाच्या समाजाच्या कामासाठी वाहिलेल्या व झपाटलेल्या माणसाबरोबर इतरांना फुलवीत संसार केला ! होऽ वेड नाही तर काय, ज्या डॉक्टरी व्यवसायात छप्पन्न पिढ्या उद्धरण्याची संधी आजच्या समाजव्यवस्थेने सुकर केलीय त्या व्यवसायात मरेपावतो १७॥ रुपयांच्या भाड्याच्या जागेत राहण्याचे वेडेपण कुठल्या तरी त्रस्त समंधाने झपाटलं असतानाच करता येईल !

एरवी एखादी टोलेजंग इमारत ('श्रमसाफल्य' वगैरे नावाची) मोटारगाडी व हजारो रुपयांची माया गोळा करून सुखासीन आयुष्य जगण्याची क्षमता असताना ते लाथाडून केवळ 'माणसे जोडण्याचा धंदा' करून जीवनाचा जुगार ते बाजी लावूनच खेळले आहेत ! कुणी म्हणत, ते राजकीय, सामाजिक जीवनात फसले नि रुतले आहेत. म्हणोत बिचारे ! खरं तर एव्हाना त्यांना सूर सापडला होता, गीत जुळून आले होते. कशासाठी जगायचे तो जीवन-हेतू गवसला होता. त्यामुळे कोठून निघून कधी कोठवर पोहचायचे ते त्यानी नक्की केले होते! त्यामुळे रस्त्यातील काट्या-कुट्यानाही गुलाब-जाईजुईचाही सुगंध येऊ लागला होता. या सत्यान्वेषी जीवाने खडतर प्रतिकूलतेत पक्षावर (अन् तीही कम्युनिस्ट !) अविचल निष्ठा ठेवली. हरिजनवाड्यात पायपीट करून भाकरी व बोंबिल यावर उमेदीची ५ वर्षे काढून पक्षकार्यकर्त्यांपुढे हाडा-मासाचा एक जिवंत आदर्श उभा केला !

अशा वेळी वाटतं, कोणाचा कोणताही देव असू दे; पण आपल्या देवाला अढळ निष्ठेची आरती अखंडपणे करणारे अदम्य-श्रद्धाळू स्वप्न-साकारी कर्मयोगी आज कुठे दिसताहेत ? मजा अशी की, डॉक्टर' ईश्वर-बिश्वर सब झूठ है' असले एकांतिक तत्त्वज्ञान सिगारेटचा झुरका घेत हिरीरीने मांडत. कदाचित् तुम्ही त्याला 'देव - परमेश्वर' असल्या बूर्ज्वा उपाध्या लावू नका; पण ह्या माणसांच्या भुकेल्या 'विठोबाला' माणसातला देव सापडला होता हे खासच ! मुळात स्वभाव हजारो माणसे जिव्हाळ्याने, आपुलकीने जुळविण्याचा व सर्वांची जीवने फुलविणाऱ्या आणि स्वतः जळणाऱ्या समईतील ज्योतीच्या जातीचा ! पण त्या सात्त्विक ज्योतीची तर्ककठोर व बुद्धिप्रामाण्यात कधी मशाल झाली तेही कळले नाही. जे त्यानाही समजले नाही, ते तुम्हा-आम्हा पामराना काय उमजणार ?

विचाराने कम्युनिस्ट असूनही इतकी सहृदयता हा अपवाद आहे, असे आम्ही मित्र गमतीने टोचत असू. मग 'कम्युनिझम व अन्य तत्त्वज्ञाने' या विषयावर अधिकारवाणीने प्रभावी शब्दांचे धबधबे कोसळू लागत. अशा वेळी डॉ. फडक्यांच्या तोंडात एरवी बागडणारी शारदा, सरस्वती-रूपाने थैमान घालीत असे ! त्या सर्वांचं सार असं की, 'सर्व इझम्सचं सार ह्युमॅनिझमच आहे.' ह्या व अशाच अनंत तात्त्विक विषयापासून वासूनाका ते व्हिएतनामपर्यंतच्या सर्व विषयावर तास-दोन तास चर्चेचा भडिमार होई. अखेर त्यांनी घरून दवाखान्यात आणलेल्या डब्यातील पदार्थांच्या अटीवर तहाची बोलणी होत. सर्व मंडळीचा जठराग्नी त्या शिध्याने व एका चहापानाने तृप्त होई अन् परत नव्या जोमाने गारद झालेल्या एखाद्या मित्र-गनिमाकडून नव्या विषयाच्या चीरफाडीकडे वाटचाल होई !

त्यांच्या दवाखान्यात व घरीही अष्टौप्रहर चालू असलेल्या अखंड चर्चा-यज्ञातील ब्रह्मानंदात नसायचे कोण ? कवी कुसुमाग्रज, डॉ. अ. वा. वर्टी, डॉ. बाळासाहेब दातार, डॉ. वसंतराव गुप्ते, वैद्य श्री आण्णासाहेब दातार, चंद्रकात महामिने इ. लौकिकाने मोठी असणारी असंख्य सन्मान्य मंडळी असतच; पण सल्ला घेणारे नानाविध सामाजिक कार्यकर्ते (अगदी सोव्हियत-संघापासून तो रा. स्व. संघापर्यंतची !) एखादा क्रांतीने अंतर्बाह्य पेटलेला कामगार वा दलित-नेता, शब्दाची आशयापासून फारकत करणारा नव-कवी, ('कवड्या' इति फडके !) नाशकातील उदयोन्मुख, पांढऱ्यावर काळे करणारा होतकरू साहित्यिक-यापासून तो आपली व्यथा, दुःख सांगणारे श्रमिक, बायकोच्या दीर्घकालीन आजारामुळे आर्थिक ताण पडणारा निरुपद्रवी प्राथमिक शिक्षक, वर्षानुवर्ष (मोफत) औषधे-इंजेक्शन घेऊन जाणारा मुस्लिम वा मोलमजुरी करणारा हरिजनबंधू हे सगळे त्यांच्या मैफलीत राग-रागदारी ऐकणारे भाग्यवान श्रोते होते !

पहिली डॉक्टरपत्नी निर्वतल्यावर आईच्या मायेला, संस्कारांना मुलगा पारखा होऊ नये म्हणून हाती अग्रभागी फडकवत ठेवलेला पक्षाचा 'लाल बावटा' मुलाच्या शिक्षणासाठी मूळच्याच बंडखोरी वृत्तीने उचल खाल्ल्याने खाली ठेवला ! जाणीवपूर्वक केलेल्या संस्कारांचे इतके चीज झाले की, 'वरमेको गुणी पुत्रो' चा अनुभव त्यांना लाभला. ही गोष्ट स्वतःच्या मुलाकडे स्वतःच्या कपड्यांइतकेही लक्ष न देणाऱ्या आजच्या पालकाना अनुकरणीय नाही का ? रॅशनल-बुद्धिवादी मानसिक बैठक, निर्भीड व पटेल तेच कृतीत आणण्याचा करारीपणा व रामशास्त्रीबाणा ह्या साऱ्या गोष्टी त्यांच्याबाबत जन्मजात 'लेणे' लेवून आल्यागत वाटत ! सत्तरीतही तोच 'षोडषी' उत्साह, वेळेचा कटाक्ष व गंभीर प्रसंगाची धार बोथट कर-

णारी विनोदी मानसिक घडण ही त्यांच्या बहुसंख्य पांढऱ्या केसातील 'हिरवं अन् गुलाबी' मन दाखवून देत असे! (कम्युनिस्टी 'लाल' नव्हे!)

शेवटची ८-१० वर्षे आय.एम.ए. हॉस्पिटल (ज्याचे ते सुपरिंटेंट व मी आर.एम.ओ. होतो,) ब्लड-बँक, म्हसरूळ टी.बी. सॅनिटोरियम, सार्वजनिक वाचनालय, लोकहितवादी मंडळ, कै. काकासाहेब वाघ चरित्रग्रंथ अशा असंख्य सामाजिक उपक्रमाच्या जोडीने ते अर्धांग–वायू, हृदयविकार, मांडीचे हाड फ्रॅक्चर होणे आदी गंभीर व्याधींना तोंड देत मृत्यूला हुलकावण्या देत होते! खिलाडूपणाचा व विनोदी वृत्तीचा उपयोग आधि-व्याधीबरोबर झगडताना होई! मागे एकदा त्यांना Diplopia (एकाऐवजी दोन वस्तू दिसणे) हा आजार झाला होता. तेव्हा 'आम्हाला दिव्य दृष्टी प्राप्त झाली, एकाचे दोन करण्याची (स्वत पुरती) किमया मिळाली, असे ते सांगत!'

त्यांच्या आजारपणात स्वभावाचे उत्कट भावनावेग सभाळण्याचे अवघड काम यथार्थाने 'सहधर्मचारिणी' असणाऱ्या पमाताईंनी प्रसन्नपणे व एखादे हट्टी लहान मूल संभाळावे तशा काळजीने संभाळले. स्वतःची शाळा, घरी येणारे डॉक्टरांचे बालपणीचे मित्र विचारवंत प्रा.सरदार वा आदिवासींच्या कल्याणार्थ स्वत:ला झोकून देणाऱ्या श्रीमती गोदाराणी परुळेकर यांच्यासारख्या थोर पैपाहुण्यांचे आगत–स्वागत, महिलाश्रम, सा. वाचनालय इ. सामाजिक कामांची लगबग, स्वतःच्या पी. एच. डी. चा व्याप ही सारी 'तपश्चर्या' डॉक्टरांच्या समवेत वाटचाल करताना पमाताईंनी केली! पमाताईंच्या 'धर्मे च अर्थे च' सहयोगाशिवाय डॉक्टर–पपांच्या जीवनाचा कृतार्थ आलेख पूर्ण करणे अशक्यच! माझ्या बाबतीत सांगायचे तर, डॉक्टराकडून मिळालेल्या कृतिशील वैचारिक धनाचा वारसा वाढविणे हेच आता हाती उरलंय! त्या अलौकिक वर्धमान धनाचे व्याज तरी या जन्मात फेडू शकेन काय अशी शंका आहे!

□

---

मुंबई वार्ता

# चांगल्या चित्रपटांसाठी चळवळ

जुलै महिन्याच्या अखेरीस नायगावच्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात 'पहिला चित्रपट रसिक मेळावा' भरला होता. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सहाय्यानं आणि 'महाराष्ट्र टाइम्स'नं पुरस्कृत केलेला हा मेळावा प्रभात चित्र मंडळानं आयोजित केला होता. या कार्यक्रमात एकूण तीन चर्चासत्रं होती. नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या मॅनेजिंग डायरेक्टर मालती तांबेवैद्य यांच्या हस्ते उद्घाटन आणि प्रश्नोत्तरं, 'कलात्मक चित्रपट आणि मराठी प्रेक्षक' या विषयावर अमोल पालेकर, जब्बार पटेल, रामदास फुटाणे आणि शरद पिंपळगावकर यांचा परिसवाद आणि 'फिल्म सोसायटी चळवळ, अडचणी, विस्तार, विकास' या विषयावर खुली चर्चा असा मेळाव्याचा एकूण कार्यक्रम होता. चर्चा केले गेलेले हे विषय आणि खरं म्हणजे अशा मेळाव्याची मूलभूत कल्पना या साऱ्या विचारांना चालना देणाऱ्या महत्त्वाच्या घटना आहेत. असा चित्रपटरसिकाचा मेळावा, हा त्याच्या आयोजकांनी म्हटल्याप्रमाणे अशा प्रकारचा पहिलाच आहे, म्हणूनही त्याचा उद्देश, स्वरूप, आवश्यकता इत्यादी मुद्द्याबाबत त्याची गंभीरपणे दखल घ्यायला हवी.

चित्रपटाच्या अगदी सुरुवातीपासूनच्या काळाचा विचार केला, तर त्याची दोन वैशिष्टयं अगदी ठळकपणे नजरेत भरतात. पहिलं असं की, चित्रपट हे सर्वांत अधिक लोकाभिमुख माध्यम आहे. त्याच्या दृक्-श्राव्य स्वरूपाची आणि संप्रेषण पद्धतीची मोहिनी पडली नसेल असा रसिक तर सोडाच; पण अरसिक देखील विरळाच! पण चित्रपटाचं दुसर वैशिष्टय असं की, बहुसख्य चित्रपट, तत्कालीन अभिजात सांस्कृतिक प्रवाहापासून नेहमीच दूर रहात गेले आहेत. याचा अर्थ चित्रपट हा कला–प्रकारच (genre) मुळी अभिजातपणाची शिखरं गाठायला असमर्थ आहे, असं अजिबात नाही. तरीही थोडे सन्माननीय अपवाद वगळले तर चित्रपट म्हणजे बाजारबुणग्यांची खोगीरभरती, असंच चित्र डोळ्यासमोर उभं रहातं आणि अभिरुचिसंपन्न रसिक चागल्या चित्रपटाचा थोड्या अविश्वासानंच विचार करतो.

त्यातही जुलूम असा की, या बाजारू चित्रपटानी आपल्या जीवनाचा इतका भाग व्यापलेला असतो की, तो टाळू म्हटलं तरी टळत नाही. चित्रपटगृहात जाऊन जरी एखादा 'याराना' पाहिला नाही तरी दूरदर्शन, आकाशवाणी, वर्तमानपत्रं, रस्त्यावरचे फलक या साऱ्यांतून असे अनेक याराने–दोस्ताने आपल्यावर आक्रमण करीत असतात आणि या साऱ्यातून एक उथळ, बाजारू चित्रपट–संस्कृती तयार होत असते.

कला आनंद देतात, कधी रिझवण्याचंही काम करतात. 'मेळाव्याचा उद्देश' म्हणतो, 'पण कलात्मक आनंद व त्याद्वारा रंजन हा एक भाग आणि सस्ते मनोरंजन हा दुसरा भाग. जास्तीत जास्त गर्दी खेचण्यासाठी सस्त्या आणि खोट्या मनोरंजनाला बहुतेक चित्रपटाना शरण जावे लागते आणि ही गर्दी, हा लोकसमुदाय जितका अशिक्षित, अंधश्रद्ध, चित्रपट-माध्यमाबद्दल अज्ञानी असेल तितके चित्रपटाना बाजारी स्वरूप येत जाते. भारतीय चित्रपटांची हीच शोकांतिका आहे... चित्रपटांच्या बाजारू स्वरूपाचं मूळ शोधायचं तर कुठे शोधता येईल? आमचे स्टुडिओ सुसज्ज आहेत, कॅमेरामन निष्णात आहेत, आमच्याकडे कल्पक लेखक आहेत, प्रतिभावान दिग्दर्शक आहेत. त्यांची मुळीच वाण नाही; पण या कलावंताची धडपड रसिकतेनं समजून घेणारे, तिचा आस्वाद घेणारे समानधर्मी कमी आहेत. चित्रपट हे सस्त्या मनोरंजनाबरोबरच श्रेष्ठ कलामाध्यमही आहे, याची जाणीव खऱ्या अर्थानं प्रेक्षकांमध्ये–मराठी प्रेक्षकांमध्ये रुजलेली नाही.'

खरं म्हणजे वाईट चित्रपट आणि असंस्कृत प्रेक्षकवर्ग यांचं नातं कोंबडी आणि

अंधयासारखंच आहे, जिथे पहिलं कोण ते सागण कठिण आहे. रुळलेल्या शब्दात सांगायचं तर हे एक दुष्टचक्र आहे. असंस्कृत प्रेक्षकांना रिझवण्यासाठी म्हणून वाईट चित्रपट, आणि सतत वाईट चित्रपटांची सवय झाल्यामुळं अधिकच असंस्कृत बनणारा प्रेक्षक दूरदर्शनच्या एका माजी अधिकाऱ्याचा लाडका युक्तिवाद असतो, आम्ही काहीही बुलशीट दाखवू, न बघणं तर तुमच्याच हातात आहे ना! पण समुदायात असलेल्या सामान्य (अॅवरेज) बुद्धीमत्तेच्या प्रेक्षकाची अवस्था 'जानामि अधर्मम्, नच मे निवृत्ती अशीच झालेली असते, आणि त्याच्या मनोरंजनाचा ठेका घेतलेले निर्माते, समाजाचे तथाकथित उपकारकर्ते याचा फायदा घेऊन खरं म्हणजे आपल्याच तुंबड्या भरत असतात.

अर्थात निर्मात्यांपुढच्या अडचणीही नगण्य आहेत अशातला भाग नाही. आज चित्रपटमाध्यम ज्यांच्या हातात पैसा आहे अशांच्या ताब्यात आहे. चित्रपट म्हणजे काय? दैनंदिन रटाळ, चिंतांच्या आयुष्यापासून विरंगुळा खोटा सुखान्त शेवट म्हणजे एक ठराविक साचा. ठराविक लोकप्रिय, गुळगुळीत देखणे अभिनेते. चित्रपट हे इथे दिग्दर्शकाचं माध्यम नसून बड्या नायक नायिकाचं ते वतनच असतं. त्यांना हवी ती दृश्यं आणि संवाद ते बदलू शकतात. दिग्दर्शक गौण असतो. चित्रपटात पैसा गुंतवणारा निर्माता, दिग्दर्शकापेक्षा, ज्यांच्या नावावर चित्रपट चालतो त्या अभिनेत्यांना अधिक महत्व देतो, कारण त्यांच्यावर धंदा अवलंबून असतो. मग चांगला चित्रपट येणार कसा?

निर्मात्यांच्या परिसंवादात या सर्व मुद्दयाचा उहापोह झाला. प्रेक्षकांच्या अपेक्षा कितपत असतात? रामदास फुटाणे म्हणतात, प्रेक्षक तीन जमातीत विभागला जाईल डेक्कनवाला प्रेक्षक, सदाशिववाला प्रेक्षक आणि मंडईवाला प्रेक्षक असे त्यांचे प्रकार एवढं म्हटल्यावर त्यांची गुणवैशिष्टयं अधिक वर्णन करण्याची काही आवश्यकता नाही. पैकी मंडईवाला प्रेक्षक हा प्रातिनिधिक आणि बहुसंख्य मुंबईला तो भारतमाता नाही तर कोहिनूरला म्हराटी शिनमा बघतो. पायावर उंदिर फिरला तरी त्याची काही तक्रार नसते तो म्हणती, बरोबरच आहे. तीन रुपयाच्या तिकिटात पायावरून उंदिर नाही तर काय मोर फिरणार? हा प्रेक्षकवर्ग आहे, याला सुशिक्षित नको पण सुसंस्कृत बनवल्याशिवाय चित्रपटाना काय भवितव्य असणार?

जब्बार पटेल म्हणतात, १९३२ ते ८२

---

## पेटीवादक श्री. पटवर्धन

# उत्तम साथ

श्री. गोविंदराव पटवर्धन हार्मोनियम् वादनाच्या दुसऱ्या कॅसेटचा प्रकाशनसमारंभ रविवार दिनांक ८ ऑगस्ट, ८२ रोजी दादर येथे सुप्रसिद्ध संगीतदिग्दर्शक आणि गायक श्री. सुधीर फडके यांचे अध्यक्षतेखाली साजरा झाला.

या प्रसंगी बोलताना श्री. सुधीर फडके म्हणाले—

'सध्या संगीत कॅसेटवर आणण्याची जी सुविधा निर्माण झाली आहे तिचा दूरगामी परिणाम संगीतावर व्हावा. ह्याआधी जेव्हा संगीत फक्त तबकडीवर ध्वनिमुद्रित करणे शक्य होते तेव्हा फक्त मोजक्या कंपन्यांची ह्याबाबत मक्तेदारी होती. त्यामुळे केवळ अर्थार्जनावर लक्ष ठेवून, फक्त बाजारात खूप चालेल असेच संगीत तबकडीवर येत असे. त्यातल्या त्यात सर्वांत जास्त खप अर्थातच सिनेमा संगीताचा व त्याबद्दल तर ह्या बड्या कंपन्याना काहीच करावे लागत नाही आणि तरीही खूप नफा होतो. ह्या नफ्याचा काही भाग तरी ह्या कंपन्यांनी नवे कलाकार शोधून काढून त्यांच्या रेकॉर्डस काढून त्यांना प्रोत्साहन देण्यात खर्चिला पाहिजे व दर्जेदार संगीताची जोपासना केली पाहिजे. त्याचप्रमाणे सरकारवरसुद्धा ही जबाबदारी आहे. गावोगाव बरेच गुणी परंतु उपेक्षित कलाकार आहेत. त्यांना शोधून काढून त्यांच्या कलागुणांचा विकास साधावयास हवा.

'गोविंद पटवर्धन हा असाच एक कलाकार की ज्याच्या कलागुणांबद्दल कोणालाही संदेह नसताना, केवळ व्यापारी वृत्ती असलेल्या मोठ्या कंपन्यांनी त्यांची एकही तबकडी काढली नाही. 'ओक म्युझिकॅसेटस्' ह्या कंपनीने अशा कलाकाराची कॅसेट काढून ह्या कलावंताची कदर केली आहे. वयाच्या केवळ ८ व्या वर्षापासून सतत जवळजवळ ५० वर्षे गोविंदराव हार्मोनियम वाजवीत आहेत. ह्या प्रदीर्घ काळात त्यानी जुन्या आणि नव्या सर्व गायक कलाकारांना साथ केली आहे.'


ह्या कार्यक्रमाला श्री. विद्याधर गोखले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

ते म्हणाले—

'कॅसेटचा धंदा फार धोक्याचा. कारण एका कॅसेटवरून अनेक जण स्वतःसाठी कॅसेट-कॉपी करतात. जेव्हा ओक म्युझिकॅसेटसारखी एखादी कंपनी गोविंदरावांसारख्या कलाकाराची कॅसेट काढण्याचा धोका पत्करते तेव्हा हे उघड आहे की, त्यांचा हेतु हे उच्च दर्जाचे संगीत अनेक रसिकापर्यंत पोचावे. ह्यात केवळ व्यवहारी दृष्टिकोन ठेवणे कठीण आहे. म्हणूनच अशा परिस्थितीत' रसिकानी ही कॅसेट-कॉपी करण्याचा मोह टाकून ती विकत घ्यावी. ओक म्युझिकॅसेटसारख्या कंपन्या जर व्यवस्थित चालू राहिल्या नाहीत तर असे गुणी कलाकार, की ज्याच्या रेकॉर्डस् मोठ्या कंपन्या व्यापारी दृष्टिकोनामुळे काढू इच्छित नाहीत, ते सदैव मागेच रहातील.'

गोविंदरावाच्या कलागुणाबद्दल बोलताना श्री. विद्याधर गोखले म्हणाले, 'उत्तम कलाकार संगीतक्षेत्रात खूप आहेत, परन्तु नवोदित कलाकारांना समजून उमजून, त्याला जमेल आणि झेपेल इतकेच, अशा पद्धतीने शिकविणारे आणि साथ करणारे विरळाच. गोविंदराव हे असे विरळानेच आढळणाऱ्या संगीत शिक्षकांपैकी नि साथीदारांपैकी अग्रगण्य आहेत.'

ह्या समारंभास सौ. सुहासिनी मुळगावकर, श्री. श्रीकांत मोघे वगैरे संगीतातील बरीच तज्ज्ञ आणि रसिक मंडळी उपस्थित होती. *



# घडा भरेल पापाचा नायनाट होईल काळ्या बाजाराचा

* ज्याप्रमाणे एखादा हिरवागर्द वृक्ष कीड लागल्यास सुकून जातो, त्याचप्रमाणे काळा पैसा देशाची अर्थ-व्यवस्था खिळखिळी करून टाकतो.
* या जहरी किडयाची वाढ होऊ देऊ नका. हे विना-शाचे मूळ आहे. हाच किडा महागाईच्या आगीत तेल ओतत असतो.
* याचा नायनाट करण्यासाठी, आवश्यक वस्तु अधि-नियम, काळा बाजारप्रतिबंधक आणि आवश्यक वस्तुपुरवठा कायदा वगैरे कायद्यांची अधिक कडक अंमलबजावणी करण्यात येत आहे.

**त्याचमुळे समाज आणि अर्थव्यवस्थेला उसंत मिळणार आहे.**

सविस्तर माहितीसाठीं खालील कूपन भरून पाठवा.

श्री. आर. के. जॉली
असिस्टंट प्रॉडक्शन मॅनेजर
रिजनल डिस्ट्रिब्यूशन सेंटर
२३, सिदपुर इंडस्ट्रियल इस्टेटस्
हलाव पुल, मसरानी लेन
कुर्ला, मुंबई–४०००७०

नव्या २० कलमी कार्यक्रमाच्या माहितीसाठी कृपा करून मराठी/हिंदी/इंग्रजी पुस्तिका पाठवा.

नाव..................................................

पत्ता..................................................

.................................पिन..............

## नवा २० कलमी कार्यक्रम

या ५० वर्षांच्या कालावधीत प्रेक्षकवर्गात किती तरी बदल झालाय. मात्र तो चांगला आहे असं मात्र नाही. एन, एफ. डी. सी. इत्यादिचं सहाय्य नसतानाही शांतारामबापूं-सारख्यांनी तेव्हा कलात्मक भान असणारे चित्रपट निर्माण केले, ते सर्वस्वी प्रेक्षकांच्या जिवावर. आज असा गृहीत धरावा असा प्रेक्षकवर्ग कलात्मक चित्रनिर्मात्याला नसतो.

ह्याच धागा पकडत शरद पिळगावकर म्हणतात की, निर्मात्याचा एवढा पैसा अडकलेला असतो की, चित्रपटाचा मार्केट रिसर्च करून मगच तो चित्रपट निर्माण करतो. म्हणजे चित्रपट साचेबंद असतात, याची ही ग्वाहीच होती.

अमोल पालेकरांनी प्रेक्षकांच्या निष्क्रियेतेवर कोरडे ओढले. ते म्हणतात, कलात्मक चित्रपट आणि मराठी प्रेक्षकांचा सहभाग हा विषय खोटा आहे. सहभाग वगैरे काही नाही. जे आम्हाला दिलं जातं, ते आम्ही घेतो. चित्रपट काढा न काढा. बरे–वाईट कसेही काढा, कोणत्या मराठी प्रेक्षकाला त्याविषयी आच आहे ? किती मराठी प्रेक्षक मराठी चित्रपट बघतात ? आणि वाईट चित्रपटांचं म्हणाल तर बेसूर गाण्यांची सवय व्हावी, तशी वाईट चित्रपटांचीही आता झाली आहे; त्यांच्यातला वाईटपणा जाणवेनासाच झाला आहे.

म्हणजे निर्मात्यांवर कलात्मकतेची नीती पाळायला लावणारा एक अंकुश असण्याची आवश्यकता आहे आणि असा अंकुश प्रेक्षकांनी ठेवण्याची आवश्यकता आहे.

प्रेक्षकांमध्ये ही पात्रता कशी येणार ?

या प्रश्नाला उत्तर आहे..

फिल्म सोसायटीमधून उत्तम चित्रपट दाखवून प्रेक्षकांच्या अभिरुचीचं संवर्धन करणं, हे ते उत्तर.

फिल्म सोसायटी आणि त्यामधून उभी रहाणारी चित्रपट–चळवळ हे दृश्य तसं बरंच अलीकडच्या काळातलं आहे. १९४७ साली सत्यजित रे आणि चिदानंद दासगुप्ता यांनी ‘कलकत्ता फिल्म सोसायटी’ सुरू केली. ती पहिली फिल्म सोसायटी, की जिथून चित्रपट-चळवळीचा प्रारंभ झाला. (अगदी पहिली फिल्म सोसायटी, ‘इलस्ट्रेटेड वीकली’चे तेव्हाचे संपादक स्टॅन्ले जेपसन यांनी २२ एप्रिल १९३७ रोजी मुंबईत स्थापन केली होती.) १९४७ ची ही फिल्म सोसायटी म्हणजे देशाप्रमाणेच चित्रपटक्षेत्रात उमटलेली आणि नवनव्या शक्यता असणारी पहाटच होती. फिल्म सोसायटी ही कल्पना आज चांगलंच मूळ धरू लागली आहे. फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ इंडिया, फिल्म इन्स्टिटयूट आणि नॅशनल फिल्म अर्काइव या संस्थांच्या स्थापनांमुळं या प्रयत्नाला अधिकाधिक गती येते आहे.

फिल्म सोसायटीज काय करतात ? चित्रपटक्षेत्रात होणाऱ्या प्रयोगांचा परिचय इथून प्रेक्षकांना होतो. देशात आणि परदेशांत तयार होणारे कलात्मक चित्रपट इथं अत्यंत अल्प दरात सभासदांना दाखवले जातात. आपल्याकडे येणारे बहुसंख्य विदेशी चित्रपट इंग्रजी, म्हणजे बहुधा युनायटेड स्टेटस्, ब्रिटन इथूनच येतात; पण जगभरच्या देशातले उत्तमोत्तम चित्रपट इंग्रजी सबटायटल्सच्या सहाय्यानं बघण्याची संधी, फिल्म सोसायटीज सोडून फारशी कुठे मिळत नाही. या चित्रपटांतून प्रेक्षक अनेक नव्या गोष्टी शिकतो, नवे दृष्टिकोन शिकतो. बऱ्याच फिल्म सोसायटीज चित्रपटप्रदर्शनाबरोबरच चर्चा, लायब्ररी, एखादं चित्रपटविषयक नियतकालिक चालवणं असेही उपक्रम करतात. स्वीडनचा इंगमार बर्गमन, पोलंडचा वाइदा, जपानचा कुरोसावा, हंगेरीचा झोल्ट या फाब्री. अमेरिकेचा कपोला, फ्रान्सचा छाब्रिल इत्यादींचे चित्रपट थिएटरमध्ये जाऊन मराठी नाही तर हिंदी सिनेमा पहावा एवढ्या सहजतेनं बघण्याची संधी फिल्म सोसायटीत मिळते. फरक एवढाच की, थिएटरमधला सिनेमा सभागृहाबाहेर पडताच विसरावासा वाटतो आणि विसरतोही; पण हे चित्रपट मनात घर करून राहतात. स्वतःची आस्वादक्षमता, चित्रपट–अभिरुची बदलत चालल्याची सुखद जाणीव प्रेक्षकाला होते. ही किमया फिल्म सोसायटीची आहे.

बंगाल, केरळ आणि कर्नाटकामध्ये अशा चित्रपटचळवळीमुळे स्थानिक भाषीय चित्रपटांच्या गुणवत्ता आणि संख्येत खूपच फरक पडल्याचा अनुभव आहे. महाराष्ट्रातही असं चित्र निर्माण होण्यासाठी अनुकूलता आहे. इथे साडेपाचशेहून अधिक महाविद्यालयं आहेत. ११९५ चित्रगृहं आहेत. हा देशातला दुसऱ्या क्रमांकाचा सुशिक्षित प्रांत आहे आणि शहरीकरणात त्याचा प्रथम क्रमांक आहे.

तेव्हा या प्रांताच्या कानाकोपऱ्यात चित्रपट चळवळीचं लोण पोचणं आणि कलात्मक चित्रपटांची निर्मिती त्यामुळे होऊ लागणं, हे अशक्य नाही.

— ललिता बर्वे

## परराष्ट्र

# भारत–अमेरिका संबंध इंदिराभेटीने काय साधले ?

—वा. दा. रानडे

पंतप्रधान श्रीमती गांधींनी आपल्या अमेरिका–दौऱ्यासंबंधी संसदेत स्वतः निवेदन न करता त्यांच्या वतीने परराष्ट्रमंत्री नरसिंहराव यांनी ते वाचून दाखविले. पंतप्रधानांनी स्वतः निवेदन न करणे हा गृहाचा अपमान आहे अशी टीका विरोधी पक्षाच्या खासदारांनी केली व निषेधार्थ सभात्याग केला. पंतप्रधान कोठे दौऱ्यावर गेलेल्या असत्या तर गोष्ट निराळी; पण त्या राजधानीत असता स्वतः निवेदन करण्याइतका वेळ त्यांनी काढू नये हे पटणारे नाही. हा पायंडा चांगला नाही. नेहरू, शास्त्री, मोरारजीभाईंच्या प्रथा मोडून संसदेला यात गौण लेखले जात आहे.

पंतप्रधानांच्या निवेदनात नवे काही नव्हते; पण त्यांच्या अमेरिका–दौऱ्यातून खरोखर काय साधले या विचाराला त्यातून पुनः एकदा चालना मिळाली. इंदिरा गांधींनी अकरा वर्षांनी अमेरिकेला भेट दिली. या एका भेटीतून दोन्ही देशांचे संबंध सुधारतील अशी कोणाचीच अपेक्षा नव्हती, पण अमेरिकेच्या भारतासंबंधीच्या धोरणात खरोखरच बदल होत आहे का याचा अंदाज पंतप्रधानांना घ्यावयाचा होता आणि भारत रशियाशी जवळीक कमी करून अमेरिकेशी सहकार्य वाढविण्याची कितपत शक्यता आहे याची चाचपणी रेगनना करायची होती.

अमेरिकेच्या भारताकडून काय अपेक्षा आहेत ? आशियातील अमेरिकेचे हितसंबंध साधण्यास भारताची मदत होऊ शकली तर ते अमेरिकेला हवेच आहे; पण निदान विरोध होऊ नये अशी तिची अपेक्षा आहे. आशियातील आपले प्रभावक्षेत्र वाढविण्यासाठी अमेरिका व रशिया या दोन बडया राष्ट्रांत स्पर्धा आहे. या स्पर्धेत आतापर्यंत भारताने अमेरिकेला पाठिंबा तर दिलेला नाहीच; पण पूर्ण अलिप्तही न राहता रशियाच्या बाजूला त्याचा झुकता कल असल्याचे अमेरिकेला दिसून आले आहे, व्हिएतनाम–युद्ध संपल्यानंतर आशियात व्हिएतनामं प्रभावी शक्ती बनावी यासाठी रशियाने त्याला मोठ्या प्रमाणात लष्करी व आर्थिक मदत केली. रशिया-चीन संघर्ष लक्षात घेता आशियात चीनचा प्रभाव रशियाला वाढू द्यावयाचा नव्हता. त्यासाठीच व्हिएतनामचे बळ वाढविण्याचे धोरण रशियाने अनुसरले. हानोईच्या नेत्यांनी उत्तर व दक्षिण व्हिएतनामचे एकीकरण तर घडवून आणलेच; पण तेवढयावर न थांबता लाओस व कांपुचिया (कंबोडिया) आपल्या प्रभावाखाली आणले; पण व्हिएतनामला कांपुचिया आपल्या प्रभावाखाली आणणे सोपे गेले नाही. त्यासाठी यादवीयुद्ध व लष्करी हस्तक्षेप करावा लागला. कांपुचियात चीनच्या प्रभावाखालचे पॉलपॉट सरकार होते. ते टिकविण्यासाठी चीननेही कांपुचियात लष्करी हस्तक्षेप केला; पण व्हिएतनामच्या फौजांनी पॉलपॉट सरकारचा व चिनी फौजाचा पराभव करून हेंगसमरित यांच्या नेतृत्वाखाली आपल्या प्रभावाखालचे सरकार तेथे स्थापले. भारताने या सरकारला मान्यता दिली.

अफगाणिस्तानच्या प्रश्नावरही भारताने बरीचशी रशियाला अनुकूल भूमिका घेतली. अफगाणिस्तानातून रशियाने फौजा काढून घेतल्या पाहिजेत असे मत भारताने व्यक्त केले असले, तरी अफगाणिस्तानात सर्वच परकीयांचा हस्तक्षेप थाबला पाहिजे, बंडखोरांना अमेरिका, चीन, पाकिस्तानातून मिळणारी मदत थांबली पाहिजे, अशीही मागणी भारताने केली आहे. बंडखोरांना मदत करून अफगाणिस्तानातील तेथील रशियाच्या बाजूची राजवट उलथविता येईल, असे अमेरिकेला वाटत होते, पण ते सोपे नाही याची जाणीव तिला आता झाली आहे. अफगाणिस्तानात अमेरिकेने स्वतःला अधिक गुंतवून घेण्यास अमेरिकन लोकमताचाच विरोध आहे. अमेरिका अजून उघडपणे समझोत्यास तयारी दर्शवीत नसली तरी भारताच्या मध्यस्थीने काही समझोता होऊ शकला तर तो अमेरिकेस हवा आहे. अफगाणिस्तानातून रशियन फौजा काढून घेतल्या पाहिजेत व त्याचबरोबर बंडखोरांना मिळणारी परकीय मदत थांबली पाहिजे, तेथील कारमाळची राजवट जाऊन पूर्णपणे अलिप्त असे सरकार स्थापन झाले पाहिजे, या अटीवर समझोत्यास अमेरिका तयार होईल. रशियाची मान्यता मिळविण्याचा प्रयत्न भारताने करावा असे अमेरिकेस अलीकडे वाटू लागले आहे. तसे होण्याचे एक कारण रशियाची नाकेबंदी करण्याच्या रेगन यांच्या धोरणास पाश्चात्य राष्ट्रांचा पाठिंबा मिळालेला नाही. समझोत्याची तयारी रेगन यांनी स्पष्टपणे बोलून दाखविली नसली तरी इंदिरा गांधींशी वाटाघाटीत अप्रत्यक्षपणे तसे सूचित केले असण्याची शक्यता आहे.

भारताशी संबंध सुधारण्याकडे रेगन यांचा कल झुकू लागला याचे दुसरे कारण तैवान प्रश्नावरून अमेरिका–चीन संबंधात अलीकडे आलेला दुरावा. रशियाविरोधाच्या समान भूमिकेने अमेरिका व चीनला जवळ आणले पण लांब पल्ल्याचा विचार करता चीनचे धोरण नेहमीच रशियाविरोधी राहील का, अशी शंका रेगनना येऊ लागली आहे, सीमा प्रश्नावर वाटाघाटी करण्याच्या रशियाच्या सूचना चिनी नेत्यांनी फेटाळून लावल्या हे खरे, पण ही भूमिका किती काळ टिकून राहील ? ब्रेझनेव्हलवर रशिया–चीनचे संबंध संघर्षाचे न राहता सुधारण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास सत्ता समतोल टळून आशियात रशियाचा प्रभाव खूपच वाढेल, ते टाळण्यासाठी किंवा त्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी भारताशी मैत्री आपणास उपयोगी पडेल, हा विचार अमेरिकेत तळ धरू लागला लागला आहे. तेव्हा भारताशी संबंध सुधारण्याचे प्रयत्न करावेत, असे रेगन यांना वाटण्यामागे हाही एक उद्देश असणे शक्य आहे.

अर्थात अमेरिकेचे हे उद्देश साधावेत यासाठी काही भारत आपल्या परराष्ट्र धोरणात बदल करणार नाही. इंदिरा गांधींनी अमेरिकेच्या दौऱ्यातील भाषणात भारताच्या नेहमीच्या परराष्ट्र धोरणाचाच पुरस्कार केला. त्यात कोणताही बदल सूचित केला नाही. एका देशाशी मैत्री वाढविण्यासाठी दुसऱ्या देशाशी असलेली मैत्री आम्ही कमी करणार नाही हे त्यांनी स्पष्ट केले. रशियाशी असलेल्या भारताच्या संबंधात कोणताही बदल होणार नाही हेच त्यांनी सूचित केले. अलिप्ततेच्या पायावर अफगाणिस्तानचा प्रश्न सोडविण्याची दोन्ही बडया राष्ट्रांची तयारी असेल तर भारत जरूर प्रयत्न चालू ठेवील.

इंदिरा गांधींच्या अमेरिका–दौऱ्यापूर्वी अमेरिका पाकिस्तानप्रमाणे भारतालाही एफ–१६ विमाने देण्यास तयार असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. भारताने अमेरिकेला अनुकूल धोरण स्वीकारावे यासाठी हे आमिष होते; पण कोणतीही लष्करी मदत मिळविण्यासाठी इंदिरा गांधी अमेरिकेला जात नाहीत हे भारताच्या बाजूने स्पष्ट करण्यात आले.

लष्करी मदत नको असली तरी भारताला औद्योगिक विकासासाठी अणुइंधन मिळाले तर जरूर हवे होते. त्यापैकी अणुइंधनाचा प्रश्न पूर्णपणे समाधानकारक सुटला असे म्हणता येणार नाही. तारापूरसाठी अणुइंधन अमेरिकेऐवजी फ्रान्स देणार आहे. वापरलेल्या अणुइंधनावर पुन्हा प्रक्रिया करण्याचा भारताला अधिकार आहे असे भारताचे म्हणणे; पण ते अमेरिकेने मान्य केलेले नाही पुन्हा प्रक्रियेचे काम भारत प्रत्यक्ष सुरू करीत नाही तोपर्यंत संघर्ष येणार नाही आणि स्वतःचे अणुइंधन तयार करण्यासाठी भारताला त्या दिशेने पावले टाकायला हवी.

जागतिक बँकेकडून सवलतीच्या दराने आर्थिक मदत मिळविण्याच्या भारताच्या प्रयत्नांना अमेरिकेने नेहमी विरोधच केला आहे. त्यात काही बदल झाला तरच भारताशी संबंध सुधारण्याची अमेरिकेची खरोखर इच्छा आहे असे दिसून येईल. येत्या काही महिन्यांत जागतिक बँकेने भारताला द्यावयाच्या मदतीबाबत बोलणी सुरू होतील. त्या वेळी आर्थिक मदतीसंबंधी अमेरिकेच्या धोरणात भारताच्या दृष्टीने काही अनुकूल बदल झाला आहे काय ते स्पष्ट होईल. □

ाहादे वार्ता

# लक्ष्मणवाडीचा संप

'माणूस'च्या ७ ऑगस्ट १९८२ च्या अंकात लक्ष्मणवाडीचा शेतमजूर संप' या मथळ्याखाली एक लिखाण प्रसिद्ध झाले आहे. ाहादे भागात काम करणाऱ्या श्रमिक संघटनेविषयी विपर्यस्त वृत्त देऊन गैरसमज पसरविणे हा या लिखाणाचा हेतू आहे. कारण शेतमजुरांच्या संपाबाबत या ठिकाणी सरळ सरळ मजूर-आदिवासीविरोधी व मालकधार्जिणी भूमिका ज्यांनी घेतली त्या भाजपच्या डॉ. टाटीया यांच्या सहकाऱ्यांपैकी कुणी तरी हे लिखाण लिहिले आहे यात आम्हाला मुळीच शंका वाटत नाही.

(हे लिखाण लक्ष्मण कदम व श्री. धरम चोरडिया यांचे आहे—सं.) लक्ष्मणवाडी येथील शेतमजुरांनी ५० दिवस संप केला ही घटनाच मुळी त्यांच्यावर कोणत्या प्रकारचा अन्याय होत होता व कशा प्रकारे पराकोटीचे शोषण होत होते, हे दर्शविते.

ज्या मालकाकडे काम करणाऱ्या शेतमजुरांनी हा संप केला ते मालक श्री. के. डी. शहा हे लक्ष्मणवाडीचे एक 'प्रगतिशील शेतकरी' आहेत असे लेखकाचे मत आहे. श्रमिक संघटनेच्या मते श्री. शहा हे 'शेतकरी' नाहीत. पाचशे एकर जमिनीवर मालकीहक्क सांगणारे ते एक बडे भांडवली जमीनमालक आहेत. शहा कुटुंबाकडे एवढी जमीन आदिवासी भागात कशी काय आली? याचे उत्तर शहादाच्या चळवळीबद्दल 'माणूस'च्या वाचकांना सांगण्याची गरज नाही. भिल्ल व जे बंजारा आदिवासींच्या मालकीच्या जमिनीवर, त्यांच्या गरिबीचा, अज्ञानाचा व भोळेपणाचा फायदा घेऊन, या वाणी–शहा कुटुंबाने कब्जा केला आहे. जमिनी गमविलेल्या या आदिवासींचा असंतोष शहा कुटुंबाच्या विरोधात काही वर्षांपूर्वी उफाळून आला होता; परंतु बड्या जमीनदारांची सत्ता ग्रामीण भागात दादागिरीच्या जोरावर गोरगरिबांचा असंतोष दडपून टाकत असते. शहा कुटुंबाकडच्या 'सीलिंग'मध्ये निघालेल्या जमिनी कोर्टातून मनाईहुकूम आणल्याने त्याच कुटुंबाच्या ताब्यात राहिल्या आहेत.

स्वत: लेखकच कबूल करतो त्याप्रमाणे या जमिनीपैकी वनवासी कल्याण आश्रमासाठी दिलेल्या १८ एकर जमिनीची किंमत जर लाखात मोजावी लागते तर शेकडो एकर जमिनीची किंमत किती होईल? म्हणजे आदिवासींना लुबाडून त्यांच्या जमिनी हडप करायच्या आणि त्यातला एक तुकडा आदिवासींचे 'कल्याण' करण्यासाठी (खरे तर सीलिंग' कायद्यातून सुटका करण्यासाठी) दान द्यायचा! वा रे वनवासी कल्याण! आदिवासींना वनवासी करायचा हा धंदा कुणाही 'माणसा'ला चीड आणेल; परंतु लेखकाला यामध्ये 'शेतकऱ्याची प्रगतिशीलता' दिसते!

अशा शेकडो एकर (वाल्या) जमीनमालकांच्या शेतावर राबणाऱ्या एकावन्न सालदारांनी व तीनशेहून अधिक रोजंदार मजुरांनी जादा कामाचे जादा वेतन मिळाले पाहिजे, घाणेरड्या कुजक्या धान्याची किंमत कमी केली पाहिजे, कापलेले डिपॉझिट परत दिले पाहिजे, घरातील कामे करून घेणे बंद झाले पाहिजे इत्यादी मागण्या घेऊन हा ५० दिवस चाललेला संप केला होता. शहा कुटुंब भांडवली पैदास करत असले व लाखो रुपयांचे नफे कमवीत असले तरी सर्व तऱ्हेच्या सरंजामी गुलामीच्या परंपरांत, आदिवासी व इतर मजुरांना राबवून पिचून काढत होते. लेखकाने, 'कामाच्या ठिकाणी राहण्यासाठी. खोल्या, वीज, पाणी सर्व सवलती शेतमजुरांना असतात' असे लिहिले आहे. सालदाराला चोवीस तास वेठबिगारीत जखडून ठेवण्यासाठी या खुराड्यात राहण्याची सक्ती केली जाते, हे सत्य लपविण्याचा हा प्रकार संतापजनक आहे. शहा कुटुंबाने पहाटे चार वाजेपासून रात्री नऊ वाजेपर्यंत सालदारांना राबवून घेतल्याची गोष्ट लेखकाला मालकाप्रमाणेच मंजूर होत नाही. देशातील शेतमजुरांना कोणत्या हलाखीत रात्रंदिवस राबवून घेतात हे लेखकाला माहीत असले तरी सोयीचे नाही. शहा कुटुंबाने मजुरांना घाणेरडी सडकी ज्वारी वेतन म्हणून दिली होती. धान्य मोजून देताना वापरलेले माप सरकत्या तळाचे होते. या धान्याचा भाव सहा रुपये पायली (साडेतीन किलो) असा धरला होता. सालदाराकडून शंभर रुपये डिपॉझिट कापून घेण्याचा व ते परत न देण्याचा लबाडीचा उद्योग हे 'प्रगत शेतकरी' करत असत. नोंदवल्यामध्ये संप सुरू झाल्यानंतर प्रत्येक मजुराने सात तास काम केल्याची नोंद केली होती. सरकारी अधिकाऱ्यासमोर या सर्व गोष्टींचा जेव्हा पंचनामा झाला तेव्हा मालकाची बोबडी वळली होती, हे सगळे लेखक सहज दडवून ठेवत आहे.

आणखी एक गोष्ट लेखक लपवून ठेवतो. संप सुरू झाल्यानतर तीन आठवड्यांनी, १४ मे रोजी धुळ्याला मालक व मजूर-प्रतिनिधींची असिस्टंट लेबर कमिशनर श्री. राठोड यांच्या समोर बोलणी झाली. तेव्हा डिपॉझिट ठेवणे हा कायद्याने गुन्हा आहे, ही डिपॉझिटची रक्कम मजुरांना परत करायला हवी असे सांगितल्यावर, मालकांना ती मागणी मान्य करावी लागली. धान्याचा भाव सरकारी आदिवासी उपयोजनेतील खरेदीच्या भावाइतका धरावा ही मागणीही मंजूर झाली. उरला तो प्रश्न 'ओव्हरटाइमचा' असि. लेबर कमिशनरनी मजूर पहाटेपासून रात्रीपर्यंत काम करतात की नाही हे सिद्ध करण्यासाठी मालक व मजूर दोघे व इतर सरकारी अधिकारी यांची एक चौकशी समिती नेमली व या चौकशी समितीने चौकशीनंतर दिलेला निर्णय दोन्ही बाजूंनी मान्य करावा असे ठरले. त्याचप्रमाणे २७ मे रोजी सरकारी अधिकारी लक्ष्मणवाडीला आले; परंतु चौकशी समिती काम सुरू करणार एवढ्यात भाजपचे डॉ. टाटीया तिथे आले व चौकशी समितीतून बाहेर पडण्याचा व निर्णय न मानण्याचा सल्ला त्यांनी शहांना दिला. त्यामुळे मिटत आलेला प्रश्न चिघळला. त्यानंतर 'शेतकरी संघटने'ने शेतमजुरांच्या या संपाविरुद्ध, डॉ. टाटीयांच्या नेतृत्वाखाली मोर्चे काढले. धुळ्यातील इं. कॉंग्रेस, भाजप व पी. के. पाटील यांचे जनता पक्षाचे पुढारी माणक वल्लभ पाटील यांनी धुळे जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील बड्या बागाइतदारांचे 'आमरण उपोषण' जिल्ह्याधिकाऱ्यांच्या कचेरीसमोर घडवून आणून या मालकांच्यावर होत असलेल्या 'अन्याया' विरुद्ध दाद मागितली! संपकाळात लक्ष्मणवाडीला पोलीस व एस. आर. पी. चा तळ होता.

श्रमिक संघटनेने दहशत व हिंसाचार करून जणु काही मजुराच्या इच्छेविरुद्ध मजुरांची काही एक तक्रार नसताना ५० दिवस संप केल्याचे मुद्दाम बदनामीकारक, असे खोटारडे, दिशाभूल करणारे चित्र लेखक उभे करत आहे.

संप मागे घेतला याचे कारण काय ? जिल्ह्यातील सर्व मालदारवर्ग काही झाले तरी ' ओव्हरटाइम' ची मागणी मंजूर करायची नाही या जिद्दीने पेटला होता. पन्नास – साठ एकर उसाचे व इतर काही नुकसान झाले तरी आम्ही भरून देऊ असे आश्वासन शहा कुटुंबाला या मालदाराकडून देण्यात आले होते. सरकारी अधिकारी या मालकांच्यापुढे नमले व श्रमिक संघटनेवर या अधिकाऱ्यांनी दबाव आणला. ' संप मागे घ्या नाही तर – – – – ' वगैरे भाषाही कार्यकर्त्यांसमोर एका अधिकाऱ्याने, इं. कॉ. चे खासदार माणिकराव गावीत यांच्यासमोर वापरली. कामगारअधिकाऱ्यांनी, ' सन्माननीय तडजोड होऊ शकत नाही. त्यामुळे संघटनेने योग्य त्या न्यायालयात जावे ' असे लेखी दिले. काही मागण्या मंजूर झाल्या होत्या या सगळ्याचा विचार करून संघटनेने संप मागे घेतला. दुसऱ्या दिवशी मंजूर झालेल्या मागण्यांच्या फरकाची रक्कम कामगार अधिकाऱ्यांच्या देखत मजुरांना देण्यात आली. ' ओव्हरटाइम ' साठी नाशिकच्या लेबर कोर्टात केसेस केल्या आहेत.

संपाची नोटीस आधी देऊन मगच हा संप करण्यात आला होता. संप कायदेशीर होता. शेतमजूर आणि त्यातही बहुसंख्य आदिवासी शेतमजूर बलाढ्य जमीनदाराविरुद्ध संप करतात व केलेल्या जादा कामाचे वेतन मागतात आणि परंपरागत पहाटेपासून रात्रीपर्यंत ढोरापेक्षाही अधिक काम करवून घेण्याच्या गुलामीतून मुक्त होण्यासाठी लढा देतात, ही घटना भाजपच्या कष्टकरीसंघटनेला ' प्रगतशील शेतकऱ्यावर अन्याय करणारी वाटावी आणि मजुराच्या विरोधात ' शेतकरी संघटने ' मोर्चे काढून जिल्ह्यातील सर्व मालदारवर्गाला एकत्र करण्यासाठी पुढाकार घेऊन मजुराचा लढा चिरडून असफल करण्यात भाजपच्या डॉ. टाटीया सारख्या पुढाऱ्यानी धन्यता मानावी आणि वर पुन्हा 'माणूस'मधून धादांत खोटे शब्द लिहून वाचकांपुढे श्रमिक संघटनेविषयी काळी प्रतिमा निर्माण करावी यासारखी दुसरी लांछनास्पद गोष्ट कोणती असू शकेल ?

–कुमार शिराळकर

१०।८।८२ श्रमिक संघटना, जि. धुळे

---

# यशस्वी नियोजन ?

# बायकांचा सहभाग हवाच !

विकसनशील देशांचा अनुभव असा आहे की, कोणतंही नव तंत्रज्ञान खेडोपाडी पोचवणं हे अतिशय अवघड काम आहे. अशा कोणत्याही योजनेला निश्चित यश किंवा अपयश येईल असं भाकित करणं कठीण असतं.

खेड्यांच्या आर्थिक प्रगतीसंबंधीचं जे साहित्य आजवर प्रसिद्ध झालेलं आहे त्यात वारंवार म्हटलेलं आहे की, गोबरगॅस प्लॅन्ट, जळाऊ लाकडांसाठी वृक्षाची लागवड, इंधनाचा साठा, धूरविरहित चुली (लाकडी स्टोव्ह), हातपंप, संडास वगैरे तंत्रं (Technology) खेड्यांत रुजली तर तिथलं सध्याचं कष्टमय जीवन खूपच सुखाचं होईल आरोग्य सुधारेल आणि माणसाच्या अगदी मूलभूत गरजा भागतील; पण असं असूनही अशी एखादी विकासयोजना यशस्वी झाल्याची उदाहरणं मात्र अतिशय तुरळक आहेत. आफ्रिका, लॅटिन अमेरिका आणि आशिया या तिन्ही खंडांतल्या विकसनशील देशांत हीच परिस्थिती आहे.

याची कारणं अनेक असू शकतील; पण त्यांपैकी एक महत्त्वाचं पण आजवर दुर्लक्षिलं गेलेलं एक कारण आहे. ही धोरणं ठरवणारे, त्यांचं विश्लेषण करणारे आणि लोकांच्या प्रश्नासंबधीचा अहवाल तयार करणारे सर्वसाधारणपणे पुरुषच असतात. ह्या सगळ्या आर्थिक प्रगतीच्या वाटचालीत बायकांना नेमका कशात आणि किती रस आहे याचा विचार करणारा त्यांच्यात एखाद-दुसराच असतो. अशा संवेदनाक्षमतेच्या अभावापायी धोरणं आखणारे ज्या दिशेनं ती आखत असतात ती दिशा त्यांना भलतीकडेच नेते आणि हे अपयशाचं एक महत्त्वाचं कारण असू शकतं.

वस्तुस्थिती अशी आहे की, या नव्या तंत्रज्ञानाचा विकसनशील जगावर जो काही कमी-जास्त प्रभाव पडतो त्याचं विश्लेषण करताना सर्व गरिबाचा विचार सरसकट केला जातो. विशेषतः गरीब पुरुष आणि गरीब स्त्रिया याचा तंत्रज्ञानातला रस एक आणि सारखाच आहे असं गृहीत धरलं जातं. शोषक–शोषिताच श्रीमंत आणि गरिबात असलेलं नातं हे पुरुष-स्त्रीसंबंधातही असतं याचा बहुतेक वेळी विसर पडतो आणि हे नातं सर्व आर्थिक-सामाजिक स्तरामध्ये थोड्याफार फरकानं सारखंच असतं. या संदर्भात 'सेंटर फॉर सायन्स अॅन्ड एनव्हायर्नमेंट ' या संस्थेकडे आलेले अहवाल जेव्हा स्त्रियांच्या दृष्टिकोनातून वाचले गेले तेव्हा ही भीती खरी असल्याचं लक्षात आलं. काही अहवालामध्ये योजनेच्या अपयशावरून पूर्णपणे चुकीचे निष्कर्ष काढण्यात आले होते. इतर काहींमध्ये नव्या चालीरीती समाजात रूढ करण्याबाबत आग्रह धरण्यात आला होता; परंतु हा आग्रह वैज्ञानिकदृष्ट्या योग्य असला तरी त्यामुळे बायकांच्या आधीच मरणप्राय असलेल्या कष्टात आणखी भरच पडली असती. बायका जर स्वतःच्या हिताकरता संघटित झाल्या नाहीत किंवा केल्या गेल्या नाहीत तर काहींनी समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने जे विचार मांडले होते ते आताच्या परिस्थितीतल्या समाजाला कधीही मान्य होण्यासारखे नव्हते. थोडक्यात या सर्व सूचनांमधला ' समाजवाद ' ठीक होता; पण त्यातही पुन्हा बाईला काहीच स्थान नव्हतं.

उदाहरणादाखल उत्तरप्रदेशातल्या इटावा जिल्ह्यातल्या ' फतेहसिंग का पुरवा ' या खेड्यातला ' कम्युनिटी बायोगॅस प्लॅन्ट ' घेऊ.

संपूर्ण खेड्याला गॅस पुरवणारा भारतातला हा पहिला गॅस प्लॅन्ट. श्रीमंत असो की, गरीब, प्रत्येक घरात या प्लॅन्टमुळे गॅस पोचला होता. तंत्रदृष्टया हा प्लॅन्ट यशस्वी झाला; पण सामाजिकदृष्टया अयशस्वी ठरला. परिस्थितीचा थोडा विचार केला तर या अपयशाची कारणं अतिशय स्पष्ट आणि आपल्या समाजव्यवस्थेशी सुसंगत असल्याचं दिसून येतं. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स या बंगलोरच्या संस्थेत काम करणाऱ्या प्रा. अमूल्य रेड्डीसारख्या शास्त्रज्ञांनी बजावलं आहे की, भारतात फॅमिली साइझ बायोगॅसप्लॅन्टपेक्षा कम्युनिटीप्लॅन्टचा फायदा सर्वांना मिळेल. खेड्यात जास्तीत-जास्त दहा टक्के कुटुंबात चार ते पाच गुरं असतात आणि फॅमिलीसाइझ प्लॅन्टला आवश्यक तेवढा शेणपुरवठा अशा कुटुंबातच होऊ शकतो. त्यामुळे या प्लॅन्टचा फायदा काही थोड्या सधन कुटुंबांनाच मिळतो. असं असताना मग कम्युनिटी प्लॅन्टही अयशस्वी का ठरावा ?

इटावामधला कम्युनिटी प्लॅन्ट वर्षभर ठीक चालला; पण लवकरच लोकांचा त्यातला रस कमी व्हायला लागला. बऱ्याच जणांनी शेणपुरवठा थांबवला आणि हळूहळू प्लॅन्ट बंद पडला. गावातल्या प्रमुखांना याबद्दल विचारलं असता त्यांनी सांगितलं की, त्यांना स्वयंपाकाच्या इंधनात रसच नव्हता. त्याऐवजी विहिरीचे पंप, कापणीची यंत्रं, गिरणीकरता लागणारी यंत्रं याकरता इंधन मिळालं तरच हवं होतं. या योजनेसंबंधी तयार केल्या गेलेल्या अहवालात तत्परतेनं निष्कर्ष काढला गेला की, स्थानिक लोकाच्या तयारीचा अंदाज न घेतल्यानं प्रयोग फसला !

## पुरुषांची उदासीनता

इंडियन कौन्सिल ऑफ अॅग्रिकल्चर या आणखी एका संस्थेच्या असं निदर्शनाला आलं की, पंजाब आणि हरियानाच्या शेतकऱ्यांना बायोगॅसप्लॅन्ट हा गॅसपेक्षाही कंपोस्टखताकरता जास्त उपयुक्त वाटतो. स्वयंपाकाकरता गॅस ही आपली जमलं तर जाताजाता करण्याची गोष्ट. याच स्वरूपाची भूमिका चीनसकट सर्व विकसनशील देशांमधल्या शेतकऱ्यांनी घेतलेली दिसते.

दैनंदिन जीवनात आवश्यक अशा या गॅसबद्दल इतकी उदासीनता का ? इतर कारणंही असू शकतील; पण मुख्य कारण हे आपल्या पुरुषप्रधान समाजरचनेत आहे. इटावात जे झालं ते अतिशय प्रातिनिधिक आहे. गावाचे प्रतिनिधी पुरुष होते, त्यात एकही बाई नव्हती. गॅसप्लॅन्ट टाकायचा त्यांनीच ठरवला आणि तो बंद करण्याचा निर्णयही त्यांच्याच. त्यांच्या दृष्टीनं हा सगळा प्रकार म्हणजे गरज नसून निव्वळ नखरे किंवा फॅशनचा भाग होता. स्वयंपाकाला लागणारं इंधन म्हणजे खरं तर बायकाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न; पण त्यासंबंधीच्या योजनेत निर्णय घेताना त्यांना कुठेच स्थान नव्हतं. त्यांचा सल्ला विचारण्याचीही गरज कुणाला वाटली नाही. प्लॅन्ट उभारणं, त्याची व्यवस्था पहाणं वगैरे कोणत्याच गोष्टीशी त्याचा काही संबंध नव्हता. प्लॅन्ट बंद पडला आणि गावच्या बायका मुकाटयानं जळणाच्या शोधात उन्हातान्हात, दिवसचे दिवस जंगलात पायपीट करायला बाहेर पडल्या.

थोडक्यात प्लॅन्ट कम्युनिटी असो वा फॅमिलीसाइझ तो उभा करणं न करणं, चालवणं वा बंद करणं हे या पुरुषप्रधान समाजात सर्वस्वी पुरुषाच्याच हातात असणार हे स्पष्ट आहे; पण निदा म फॅमिलीसाइझचा प्लॅन्ट घरातच असल्यामुळं त्याचा प्रत्यक्ष वापर तरी बाईच्या हातात असेल. कम्युनिटी पातळीवरचे सर्व निर्णय मात्र पुरुषांच्याच हातात असणार. तेव्हा कम्युनिटी प्लॅन्ट जास्त 'समाजवादी' असला तरी प्रत्यक्ष बाईच्या दृष्टीनं तो शून्य उपयोगाचा ठरू शकतो. तिथे गावचे पुरुष 'सहृदय' असण्यावरच सगळं अवलंबून.

स्वयंपाकाच्या जळणाबाबत पुरुषवर्ग उदासीन असतो याचा आणखी एक पुरावा म्हणजे जळणाऱ्या लाकडाकरता वृक्षांच्या लागवडीचा प्रश्न. या लागवडीच्या योजनाही विकसनशील देशात फसलेल्या दिसतात. बायका आणि मुलं तासन् तास, काही ठिकाणी तर अक्षरशः सारा दिवस जळणाकरता लाकडं मिळवण्यात घालवतात पुरुषांना त्याची जाणीवही नसते न् फिकीरही नसते.

## संघटनच पाहिजे

हिमालयात चामोली जिल्ह्यात चिपको आंदोलन मूळ धरत आहे. या आंदोलनाचा एक नेता चंदीप्रसाद भट्ट झाडांच्या लागवडीवरच भर देण्याकरता खेड्यातल्या लोकाना संघटित करण्याच्या प्रयत्नात आहे. (नुकतेच श्री. भट मॅगसेसे पारितोषिकाचे मानकरी ठरले आहेत.) त्यानं गावच्या पंचायतीला कोणती झाडं लावावीत याबद्दल मत विचारलं तेव्हा पुरुषांनी एकमुखानं उत्तर दिलं 'फळझाडं.' सुदैवानं चामोलीच्या बायका इटावातल्या बायकांपेक्षा धीट होत्या. फळझाडाचा आपल्याला काही फायदा होणार नाही हे ओळखून त्यांनी या योजनेला विरोध केला. 'पुरुष फळं घेतील आणि ती रस्त्यावर बसून विकतील. येणारा पैसा दारूत आणि व्यसनात घालवतील. नाही, आम्हाला जळण आणि चाऱ्याचीच झाडं हवीत !' त्यांनी ठणकावलं.

अखेर दोन्ही प्रकारची झाडं लावली गेली. एका निरीक्षकानं सांगितलं की, अशा पद्धतीनं बायकांनी पुढाकार घेऊन आपलं म्हणणं रेटलं नसतं तर पुरुषांचा 'जंगल वाढवा' मोहिमेतला रस तेव्हाच संपला असता. काही ठिकाणी फॉरेस्ट डिपार्टमेंटकडेही फक्त फळझाडांचीच रोपं असतात, 'बायकांची' झाडं मिळतच नाहीत.

चामोली जिल्ह्यातच आतल्या भागातल्या डुंगरी–पातोला नावाच्या खेड्यात गावाजवळचं जंगल सरकारला बटाटा लावण्यासाठी विकण्याच्या प्रस्तावाला स्थानिक बायकांनी विरोध केला. इंधनासारख्या महत्त्वाच्या आणि जिव्हाळ्याच्या प्रश्नाबद्दल आता बायका जागरूक होऊन विचार करायला लागल्याचं हे उदाहरण आहे. कारण ही जंगलतोड झाली असती तर त्या बायकांना जळण शोधायला आणखी चार–पाच मैल चालून उभा चढ चढून जावं लागलं असतं. एरवीही या भागातल्या बायका केवळ या कामासाठी चारपैकी तीन दिवस किमान दहा किलोमीटर चालतात. प्रत्येक दिवशी त्यांचे सरासरी सात तास त्यात मोडतात. प्रत्येक वेळी साधारण २५ किलो इतकं जळण त्या गोळा करतात. या उद्योगात लहान मुलींपासून म्हाताऱ्यांपर्यंत सर्व वयाच्या–यात गरोदर बायकाही आल्या– सर्व बायकांना भाग घ्यावा लागतो.

गोपेश्वर या लहान गावात चिपको आंदोलन १९७३ साली सुरू झालं. आता तिथल्या बायकांनी गावच्या जंगलपंचायतीवर बायकांनाही घेतलं जावं असा आग्रहच धरला आहे. चिपको आंदोलन

हे पुरुषांनी सरकार किंवा जंगलच्या ठेकेदारांविरुद्ध उभं केलेलं आंदोलन नाही तर गढवालच्या बायकाच आपल्या जळणाच्या शेवटच्या साठ्याच्या रक्षणाकरिता उभ्या ठाकल्या आहेत **आणि त्यांचाही लढा फक्त झाडं तोडणाऱ्या सरकारी करवतींविरुद्ध नाही तर पैशामागं धावणाऱ्या त्यांच्याच नवऱ्यांविरुद्ध आणि मुलांविरुद्ध आहे.** प्रत्यक्ष संघर्षाच्या वेळी आंदोलनाच्या तथाकथित पुढाऱ्यांपैकी कुणी उपस्थित नसतं असा अनुभव आहे. इथल्या बायकाना सघटित केलं गेलं तर डुंगरी पातोली गावच्या बायका जगलतोडीविरुद्ध आपण होऊन उभ्या राहिल्या. आपल्याच जिल्ह्यात चिपको नावाचं काही आंदोलन चालू आहे याचा त्यांना पत्ताही नव्हता! याचा अर्थ उघड आहे की, आपल्या कष्टांचा, अडचणीचा विचार न करणाऱ्या आणि आपलं बिनदिक्कत शोषण करणाऱ्या पुरुषी वर्चस्वाविरुद्ध बायका आता संघटित व्हायला लागल्या आहेत!

चिपको आदोलनात बायकांना सहभागी करून घेण्यात यश मिळाल्यामुळं आज ती देशातली सर्वांत मोठी 'जंगल वाढवा' मोहीम बनली आहे. सुरुवातीला पुरुष झाडांच्या लागवडीच्या कामात मदत करत असले तरी पुढं रोपाची निगा राखण्याचं काम चिपको आदोलनाच्या बायकाच करतात. जंगलखात्यानं लावलेल्या रोपांपैकी ५० टक्क्याहून जास्त रोपं क्वचितच जगतात. चिपकोमध्ये हेच प्रमाण ९० टक्क्यांवर जातं.

आता प्रा. रेड्डी आणि त्यांचे सहकारी, Cell for Application of Science and Technology to Rural Areas. कर्नाटकात पुरा नावाच्या गावी कम्युनिटी बायोगॅसप्लॅन्ट उभारण्याच्या खटपटीत आहेत. त्यांच्याही एक गोष्ट घ्यानात आली आहे की, तिथल्या बायकाच जास्त आतुरतेनं या प्रकल्पाची वाट पहात आहेत.

### खरी गरज त्यांनाच !

सार्वजनिक नळाच्या संदर्भात केलेल्या पहाणीत दिसून आलं आहे की, पोटाचे अपचन वा डायरियासारखे विकार कमी करण्यात आज कुठल्याही योजनेला यश आलेलं नाही. डायरिया हा रोग विकसनशील देशात इतर कोणत्याही रोगापेक्षा जास्त बळी घेतो. तिसऱ्या जगात दर वर्षी साठ लाख बालकं त्यामुळं मृत्युमुखी पडतात. भारतात शालेय वयाच्या आतल्या वयाचीच १५ लाख एवढी बालकं या रोगामुळं मृत्युमुखी पडतात!

सार्वजनिक नळाद्वारे स्वच्छ पाण्याचा पुरवठा केला जात नाही असा याचा अर्थ नव्हे; पण परिसराच्या आरोग्याचा अभ्यास करणाऱ्या तज्ज्ञांच्या आता लक्षात आलं आहे की, नुसतं पिण्याचं पाणी स्वच्छ असून भागत नाही. अस्वच्छ हातांमुळंही जंतूंचा प्रादुर्भाव होत रहातो आणि रोग आटोक्यात येण्यामध्ये अडथळा निर्माण होतो. सर्व गरीब देशांमध्ये खेड्यात संडास बांधण्याची कल्पना रुजवण्यात आलेलं अपयश पहाता वरील गोष्ट जास्त स्पष्ट होते. निदान घरकाम करताना, मुलांना हाताळताना, स्वयंपाक करताना आणि वाढताना, जेवताना हात स्वच्छ असणं अतिशय आवश्यक असल्याचं लक्षात येतं.

पण यांच्या बायकांवर काय परिणाम होईल? हात सतत स्वच्छ ठेवणं यात त्यांची सोय पाहिली जाणार आहे का? हात स्वच्छ ठेवायचे तर त्याकरता त्यांच्या हाताशी स्वच्छ पाणी असावं हे कोण पहाणार? जर तशी सोय झाली तर त्याना हात स्वच्छ ठेवा हे रोज उठून सांगायची गरजच पडणार नाही. जर जवळचा सार्वजनिक नळ शंभर मीटर अंतरावर असेल (एवढंही फार थोड्याच्या भाग्यात असतं) तर स्वयंपाक करताना दर तिसऱ्या मिनिटाला ती बाई नळावर हात धुवायला जाईल ही कल्पना मूर्खपणाची आहे. यासाठी प्रत्येक घरात नळ हवा आणि तो आला तर डायरियाचं प्रमाण कमी होते असा अनुभव आहे. घरापासून सार्वजनिक नळ जेवढा दूर तितक्या डायरियाच्या केसेस जास्त. तेव्हा सरकारनं घरोघर नळाचं पाणी पोचविण्याची जबाबदारी घेणं किंवा गावच्या पुढाऱ्यानी म्हणजेच पुरुषानी स्वखर्चानं नळ टाकून घेणं हे दोनच मार्ग दिसतात. याला अफाट खर्च येईल. त्यामुळं नजीकच्या भविष्यकाळात यातलं काही घडेल अशी शक्यता नाही. तिसरा मार्ग म्हणजे घरात स्वच्छ पाण्याचा साठा करणं. म्हणजेच घरातले फुकटचे पाणवये, बायका आणि मुलं, रोज सकाळ–संध्याकाळ डोक्यावर हंडे घेऊन चौपटीने पायपीट करणं हेच उरतं. पुरुषानी घरकामाची, कुटुंबाच्या आरोग्याची जबाबदारी उचलावी हे फक्त बोलायला ठीक आहे, अशा परिस्थितीत अत्यंत आवश्यक तेवढ्याच पाण्याचा साठा घरात केला जातो. मग स्वच्छतेला सर्वांत कमी महत्त्व दिलं जाणं हे ओघानंच आलं.

ज्या ग्रामीण भागात पडदा-पद्धत आहे, विशेषतः बांगलादेशसारख्या देशात, तिथं तर बायकांना दिवसा पाणी भरायलाही बंदी आहे. मग अगदीच गरज पडली तर मुलाना पिटाळलं जातं किंवा आजूबाजूला पुरुष नाहीतसं बघून एखादी म्हातारी बाई घराबाहेर पडते या घरामध्ये नेहमीच प्रत्येक गोष्टीकरता, अगदी संडासातही (ते असले तर) अत्यंत अपुरं पाणी असतं.

ग्रामीण भागात संडासासारख्या सोयीपासून वंचित रहाणाऱ्यांची संख्या सतत वाढते आहे. १९७० साली ती ११०० दशलक्ष होती.


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.

–डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

१९७५ मध्ये १२०० दशलक्ष आणि १९८० साली १४२५ दशलक्ष झाली. भारतातल्या ग्रामीण जनतेपैकी केवळ २ टक्के लोकांना या सोयीचा लाभ मिळतो. बांगलादेशातलं प्रमाण १ टक्का आहे; पण या आकडेवारीवरुनही परिस्थितीचं गांभीर्य पुरेसं कळू शकत नाही. अनेक देशांत झोपडपट्टी बेकायदा समजली जाते आणि त्यामुळं त्याचा कोणत्याही नागरी सोयीमध्ये अंतर्भाव केला जात नाही. १९८१ ते ९० हे तप पिण्याचे पाणी आणि सांडपाणी ( Sanitation ) योजना-तप म्हणून जगातल्या सर्व देशांनी जाहीर केलं १९९० पर्यंत सर्व खेड्यांना या योजनाचा लाभ मिळावा अशी अपेक्षा होती; पण प्रत्यक्षात पहिल्या वर्षातच बहुसंख्य देशांनी, युनोला आपण सांड-पाण्यावर फारसं लक्ष केन्द्रित करू शकत नाही असं कळविलं. भारतातही १९५२ च्या पहिल्या योजनेत खेड्यातल्या सांडपाण्याच्या प्रश्नावर बराच भर देण्यात आला होता; पण एकामागून एक योजनेत अपयश येत गेल्याने सरकार या प्रश्नाकडे दुर्लक्ष करायला लागलं.

याकरता पुढे करण्यात येणारं नेहमीचं सरकारी स्पष्टीकरण म्हणजे लोकांच्या खोल रुजलेल्या सवयी बदलणं आवश्यक आहे आणि *नोकरशाहीला हा बदल घडवून आणणं शक्य नाही*. खेड्यातल्या माणसांना आरोग्याच्या दृष्टिकोनातून असलेलं संडासांसारख्या सोयीचं महत्त्व कळत नाही. म्हणून मोठ्या प्रमाणावर आरोग्य-शिक्षणाचा कार्यक्रम हाती घेणं हाच मार्ग आहे.

पण हे एवढंच आहे का ? त्या ज्या सवयी आहेत त्या कुणाला फायदेशीर आहेत ? खरोखरच खेड्यात संडासासारख्या सोयीमध्ये कुणालाच रस नसतो का ? लोकांच्या स्वच्छतेच्या सवयींबाबत फार थोडी माहिती उपलब्ध आहे; पण जी आहे तीत एक गोष्ट स्पष्ट आहे, ती म्हणजे अशा योजनाचं सर्वात जास्त स्वागत बायकां-कडून होतं. कारण त्यानाच प्रायव्हसीची सर्वात जास्त गरज असते.

सांडपाण्याच्या योजना प्रभावीपणे राबवणं म्हणजे कुटुंबातले *निर्णय घेणाऱ्या पुरुषांना ज्या गोष्टीत खास रस नाही अशा गोष्टी* त्यांना मान्य करायला लावणं. कारण त्यांचे सर्व व्यवहार त्यांना कुठंही कधीही करता येतात. बायकांना ते अशक्य असतं. अनेक आखाती देशात असलेल्या पडदापद्धतीमुळं बायका घराच्या छपरा-वरच प्रातर्विधीकरता बसतात. डायरियासंबंधी नुकत्याच झालेल्या एका परिषदेत काही शास्त्रज्ञांनी सांगितलं की, बांगला देशात स्त्रीला अंधार पडल्याखेरीज बाहेर पडता येत नाही. अनेक स्त्रियांना त्या-पायी सबंध दिवस ताण सहन करावा लागतो आणि तो ताण कमी करण्यासाठी कित्येकजणी दुपारचं जेवणच घेत नाहीत !

भारतातही खेड्यात रहाणाऱ्या बायकांना रोज अशा क्लेशदायक अनुभवातून जावं लागतं. स्वच्छतेसंबंधीच्या अशा योजना सरकारनं (म्हणजे पुरुषांनी) आखल्या तेव्हा त्या संबंधातल्या सामाजिक अंध-श्रद्धा, गैरसमजुती विचारातच घेतल्या नाहीत. परिणामी योजना कोलमडल्या. अर्थात या सर्व अंधश्रद्धा आणि गैरसमजुती फक्त बाय-कांच्याच माथ्यावर मारल्या गेल्या आहेत. पूर्व आफ्रिकेत या योज-नेला आलेल्या अपयशाचं कारण विलक्षण आहे. तिथं एखाद्या स्त्रीनं पुरुषाची विष्ठा पाहिली तर ती लग्नच करू शकत नाही. दक्षिण कोरियातल्या अपयशाचं कारण तितकंच चमत्कारिक. तिथे सासरा ज्या जागेवर बसून विधी करतो तिथेच सुनेनं करणं निषिद्ध आहे. तेव्हा स्वच्छता आणि आरोग्य या संदर्भात खेड्यांचा विचार केला तर निदान आज आहे अशा सामाजिक चौकटीत या गोष्टी खेड्यात रुजवण्याचा प्रयत्न करणं म्हणजे बायकांच्या हालांमध्ये भर घालण्या-सारखं आहे. वरील वस्तुस्थितीचा विचार केला तर यात खोटं काही नाही असे लक्षात येईल. कुठलीच सुधारणा अशी बाहेरुन लादली जाऊ शकत नाही. ती नुसती चिकटते न चिकटते तो लवकरच गळून पडते.

मुंबईसारख्या शहरातल्या झोपडपट्ट्यांचा प्रश्न असाच गंभीर आहे. तिथे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या निदर्शनाला आलं आहे की, परिस्थितीमुळे तिथल्या बायकांना संडासांची तीव्र गरज वाटायला लागली आहे. कारण त्यांनाही अंधार पडण्याची वाट पहावी लागते आणि अशा वेळेला निर्मनुष्य जागा शोधणं म्हणजे अनेकदा बला-त्कारासारख्या आपत्तींना आमंत्रण देणं ठरतं. एका प्रसिद्ध ब्यूटी-पार्लरमध्ये काम करणाऱ्या आणि एका झोपडपट्टीत रहाणाऱ्या मुलीनं सांगितलं की, या त्रासापायी मी रोज पार्लरमधलाच संडास वापरते आणि सुटीच्या दिवशी पक्क्या घरात रहाणाऱ्या मैत्रिणीकडे जाते. *तिच्यासारख्या असंख्य बायकांची होणारी ही फरपट त्यापायी* होणारं आरोग्याचं नुकसान, रोगराई, मानहानी हे टाळण्याचे प्रामा-णिक प्रयत्न होताना फारसे दिसत नाहीत.

या सगळ्यावरून एक गोष्ट स्पष्ट दिसते की, या आणि इतरही अनेक जिव्हाळ्याच्या प्रश्नांकरता बायकांनी संघटित होणं ही आता गरज आहे. ज्या समाजव्यवस्थेत बाईचे प्रश्न, अडचणी, मतं विचा-रातच घेतली जात नाहीत किंवा तिला काही अडचणी असू शकतात याची जाणीवच नाही, तिथे नेहमीच कुणी तरी पुरुष स्त्रियांचा कैवारी म्हणून अवतार घेईल आणि आपली गाऱ्हाणी ऐकेल असली खुळचट स्वप्नरंजनं थांबवून गरज पडली तर रस्त्यावर उतरण्याची तयारी बायकांनी ठेवली पाहिजे. गरज आपल्याला आहे तेव्हा *आपल्या प्रश्नाकरता, हक्काकरता आपणच भांडायचं आहे हे लक्षात* ठेवलं पाहिजे. खेडोपाडी काम करणाऱ्या सामाजिक संस्था, वृत्तपत्रं, तंत्रज्ञ, विकासयोजनांची आखणी करणारे तज्ज्ञ या सर्वांनीच बाय-कांच्याही दृष्टिकोनातून विचार केला आणि त्या योजना राबवण्या-साठी प्रत्यक्ष बायकांना हाताशी धरलं तर मुळापासून सगळ्या धोर-णांचा पुनर्विचार आणि फेरआखणी होऊ शकेल. विकासाच्या कामाला गति येईल आणि कदाचित उद्याच्या समाजाचा चेहरा-मोहराच बदलून जाईल ! □

('इंडिअन एक्सप्रेस मुंबई'च्या १९ आणि २० जुलै १९८२ या अंकात प्रसिद्ध झालेल्या श्री. अनिल अगरवाल यांच्या लेखांवर आधारित )

**भूल गये वो दिन जब यहाँ कि गलियोंमें आवारा कुत्तोंकी तरह घुमते थे....**
**साले, सुधारवादी बन गये....पैसा कमाने लगे....सलाम...**

# दोन कॉम्रेड्स

**गेल्या अंकात प्रसिद्ध झालेल्या एका ज्वलंत सत्यकथेचा उत्तरभाग**

**लेखक : जयंत प्रधान**

सलामने मदनपुरा पार्टीचा इतिहास सांगितला तो असा. कॉम्रेड हमीदने मदनपुऱ्यात पार्टी स्थापन केली. एक टेबल, एक खुर्ची व एक झेंडा–अर्थात लाल–हतिया हातोडावाला–घेऊन हमीद मैदानात जाई. झेंडा रोवून, टेबल व खुर्ची लावून तो तक्रीर–भाषण, तक्रार नव्हे, सुरू करत असे. समोर पब्लिक असो वा नसो. त्याची क्षिती हमीदला नसायची. मैदान भरलेय अशा थाटात तो बोलू लागे. हळू-हळू पब्लिक जमायला सुरुवात होई. सन चाळीसच्या आसपासची गोष्ट ही. हमीदचे भाषण सर्व मसाल्याने खच्चून भरलेले आणि आवेशपूर्ण असे. करमणूक व वक्तृत्व यांच्या जोरावर पब्लिकला खिळवून ठेवायची कला हमीदला होती. सर्व वस्ती बव्हंशी काम-गारांची. भाषणं संपल्यानंतर चार-पाच जण थांबत. त्यांच्याशी हमीदच्या गप्पा होत. हळूहळू पार्टी युनिट स्थापन झाले. आणि वाढत गेले. मुंबईतल्या लालबाग युनिटएवढेच प्रभावी.

त्यानंतरच्या सर्व आंदोलनात मदनपुऱ्यातले कॉम्रेड्स हिरीरीने भाग घेऊ लागले. आज सिनेमात गाणी लिहिणारे बहुतेक शायर मदनपुऱ्यात काम करून गेलेले आहेत. बलराज साहनीने चळवळीचे पहिले धडे मदनपुऱ्याच्या गल्ली-बोळातच घेतले. अठ्ठेचाळीस साली पार्टीची दुसऱ्या काँग्रेसनंतरची बी. टी. आर. प्रणित 'क्रांतिकारक' चळवळ सुरू होती. बलराजला पकडून दादरच्या भोईवाडा कोर्टात नेण्यात आले. तेव्हा पार्टीतले तरुण व नवीन कॉम्रेड्स हजर होते. बलराजचे स्टेटमेंट व्हायचे होते. पार्टी लाइनविरुद्ध बलराजने स्टेट-मेंट दिले आणि त्याला सोडण्यात आले. कॉम्रेड्स खवळले होते. पोलीसबंदोबस्तात बलराजला नेण्यात आले, त्यानंतर दहा वर्षे बलराज मदनपुऱ्यात फिरकला नाही. पुढे सभांना त्याला बोलवण्यात येऊ लागले.

सलामच्या वर्णनामुळे ह्या माहितीची माझ्यासमोर फिल्म बनत होती. रसभरीत आणि मसालेदार. हावभाव व चेहऱ्यातील बदल जबर. सलाम एक प्रकारचा नटच होता. राग, आनंद, उत्साह, दुःख सर्व भाव एकामागोमाग एक त्याच्या वर्णनातील प्रसंगांनुसार त्याच्या चेहऱ्यावर बदलत जात होते.

कैफी आजमी, अली सरदार जाफरी, हसरत जयपुरी, साहीर लुधियानवी, शैलेंद्र सर्व मदनपुऱ्यात येऊन राहून काम करून गेले होते.

पंचावन्न सालापर्यंत कैफी लंबी सीमेंटचाळीच्या मधल्या पॅसेज-मध्ये खटिया टाकून झोपत असे. पार्टी फुलटायमर होता. शायरी तेव्हादेखील करीत असे. नंतर फिल्ममध्ये गेला, लग्न केले. नंतर शबाना आली.

बासष्ट साली सर्व शायरलोकांनी भारत-चीन युद्धात भारताची बाजू घेऊन चीनचा निषेध केला. त्यानंतर कैफी किंवा जाफरी मदन-पुऱ्यात आले की, त्यांच्याकडे कोणी लक्ष देत नसे बोलत देखील नसे. आवामी इदास ही स्थानिक लायब्ररी व सभागृह, कालापानीच्या मैदानातील कॉम्रेड लोकांनी फंड जमा करून बांधलेले, तेथे येत. पण कोणी आपल्याशी बोलत नाही किंवा बोलले तर तुटकपणे, हे लक्षात येताच त्यांनी येणे बंद केले.

सलाम ह्या मंडळीविषयी दिलखुलास शिव्या घालून बोले.

'साले, नामचीज हो गये तब पार्टी को भूल गये. सुधारवादी बन गये. पैसा कमाने लगे. भूल गये वो दिन जब यहाँ की गलियों में आवारा कुत्तोंकी तरह घूमते थे.' बाकीच्या शिव्या लिहिण्यायोग्य नाहीत.

बरेच पार्टी पुढारी मदनपुऱ्यात भूमिगत राहून गेले. त्यांची वड-दास्त ठेवली जाई. हा भाग बाहेरच्या जगापासून इतका वेगळा पडतो की बाहेरील माणसाला तेथले काही कळत नाही आणि नवीन माणूस फिरताना दिसला तर चटकन लक्षात येतो. पोलिसांना तेथे हिंडणे, तपास करणे कठीण जाते. म्हणून इथे नेहमी अंडरग्राउण्ड डेन्स ठेवल्या जात. येथे येऊनच कॉ. बी. टी. आर., डॉ. सावंत, कॉ. ओक, संझगिरी यांचे उर्दू सुधारले. कॉ. ओक तर मला वाटत उर्दू लिहूही शकतात.

पन्नास बावनच्या जमान्यात मदनपुऱ्यातल्या फुटपाथवर चटया टाकून तासनतास ही मंडळी बसली आहेत. किंवा कालापानीच्या मैदानात. खाटा टाकून हल्ली पंधरावीस वर्षं तशी बसत नाहीत. येऊन जातात. जरूरी पुरती मदनपुऱ्यात बी टी आर. चे राज्य त्रिकालाबाधित राहले. डांगेला तेथे प्रवेशच मिळाला नाही. आज तागायत.

गप्पांचा कंटाळा आला की, सलामला मी शेर सुनवायला सांगत असे. प्रत्येक दिवस एक किंवा दोन शाएरांचा. कैफीला किंवा जाफरीला आपले शेर इतके याद नसतील. त्यांना एरवी शिव्या देणारा सलाम त्यांच्या शायऱ्या मोठ्या चवीने म्हणून दाखवे. प्रत्येक शेरला थोडेफार बॅकग्राउण्ड असायचे. हुस्न आणि मोहब्बतवरच्या शेरांना सलाम बगल देई. सर्व सामाजिक किंवा राजकीय किंवा तत्त्वज्ञानपर.

'हा सुनो कॉम्रेड बावन का इलक्शन था. पार्टी की निशानी थी रेलका इंजन. क्या? इंजन. पुराने ढंमका. बाफपे चलनेवाला. उसपे एक शेर अर्ज है कैफीका (किंवा जाफरी असेल)

हयात लेके चलो
कायनात लेके चलो
क्या (सलाम)
हयात लेके चलो कायनात लेके चलो
चलो तो ऐसे चलो
(चलो चे हावभाव)
चलो तो ऐसे चलो
सारे जमाने को साथ लेके चलो
(दोन्ही हात फैलावून पुढे नेत)

मग मतलब. कारण माझे उर्दू कच्चे

'हयात मतलब जिंदगी. कायनात है मौत. हयात लेके चलो, कायनात लेके चलो. मतलब जिंदगी और मौतको साथ लेके चलो. जिगरके साथ चलो. मगर अकेले मत चलना. सारे जमाने को साथ लेकर चलना.'

हा एक नमुना. मला वाटते बहुतेक सामाजिक, राजकीय, तात्त्विक व क्वचित चांगले धार्मिक शेर याच पद्धतीने मी ऐकले असतील. असा एकही शायर नसावा उर्दूत, की ज्याचे शेर मी सलामकडून ऐकले नाहीत. धर्मविरोधी सलाम धार्मिक शेर सांगे तेव्हा मला गंमत वाटे. पण त्यात काही तरी खास वेगळेपणा असे म्हणून सांगे. उगाच अल्लाची करामत सागणारे नाही. आपल्याकडे तुकारामाचे काही अभंग, रामदासांचे काही श्लोक, ज्ञानदेवाच्या ओळी अशाच आहेत–ज्या आपली निरीश्वरवादी मंडळी त्यातील काव्य किंवा विचारांसाठी म्हणतात, वाचतात.

¤

संध्याकाळी आम्ही मदनपुऱ्यात आग्रीवाड्यात आणि कामाठीपुरा भेंडीबाजारात फिरत असू. शेटमंडळींना सलाम टाळत असे. त्यांना भेटायचे म्हणजे मी एकटाच जात असे. मला वाटते प्रत्येक पंचवीस पावलांना मला थांबावे लागे. कारण कोणीतरी ओळखीचा भेटत असे. पाच मिनिटे गप्पा, मग परत पुढे वाटचाल. असा एकही दोन नंबरचा धंदेवाला त्या भागात नव्हता. की, ज्याची सलामशी ओळख आणि ऊठ बस नव्हती. सलाम निर्व्यसनी. ना दारू, ना जुगार, ना चरस ना बाई. फक्त चहा आणि सिगरेट. तरीही त्या धंदेवाल्यांशी ओळखी. धंदेवाले इकडच्या तिकडच्या गप्पा मारत, धंद्याबद्दल नाही.

'क्यों रज्ज़ाकमियाँ, बहुत दिनमें मिले नही. बात क्या है?' अशी किंवा वेगळी सुरुवात करून सलाम बैठक मांडे.

सलामला ही मंडळी वचकून असत. सामाजिक व राजकीय कार्यकर्ता म्हणून. शिवाय डेअरिंगबाज; पण त्याचे संबंध सलामच्या दिलखुलास स्वभावामुळे असत. सलामच्या गप्पाही त्यांना आवडत. कोणाशी काय कसे बोलायचे हे सलामला चांगले अवगत होते. त्याच्या आवडीला आणि मर्माला धरून तो बोलत असे. किंचित राजकारण, थोडे समाजकारण आणि बऱ्याच गावगप्पा.

मी त्याला एकदा त्या संबंधाविषयी विचारले.

'रियासी आदमीने सबसे रिश्ता रखना चाहिये. इन लोगोसे किसी अच्छे आदमीको तकलीफ हुवी तो हम बात ठीक कर सकते है.'

ही सलामची पॉलिसी. पार्टीसाठी त्या मंडळीकडून चंदा वसूल करायलाही तो मागेपुढे पाहात नसे.

'अरे ये साले तो आव्वाम (जनता) के पैसे पे पलते हैं. बुनसे कम ही लेते हैं. सब छीन लिया तो भी कुछ खराबा नही.'

सलाममुळे मलाही ही मंडळी ओळखू लागली. कधी दिसलो तर 'आव मोहनभाय, बैठो!' मोहनभाय किंवा मोहनमियाँ पूर्वी एक मोहन मदनपुऱ्यात होता. त्याचे नाव मुस्लिम; पण टोपणनाव मोहन होते. म्हणून हे नाव मला दिले गेले. मी मुसलमान अशीच सर्वांची समजूत होती. आजही मी मदनपुऱ्यात गेलो तर सर्व मंडळी मला मोहनच म्हणतात. कॉम्रेड्स सोडून. ते परधान म्हणतात.

मदनपुऱ्याचे हे वैशिष्टय होते. प्रत्येकाला टोपणनाव किंवा बहुतेकांना. अझीज डॉक्टर किंवा लगडा. कॉ. अझीज सीबात कामाला होता. औषधे आणून वाटत असे म्हणून डॉक्टर आणि एकदा पाय मोडला म्हणून चार महिने प्लास्टरमध्ये घालून फिरत होता म्हणून लंगडा. मजिद लाखा. कॉ मजीद कायम मोठ्या पैशाच्या गप्पा करी म्हणून लाखा. सिद्दीक शैतान. भयानक दिसायचा आणि शैतानी पण केली होती–गुंडगिरी म्हणून. दुसरा कॉ. सिद्दीक चष्मा. कारण चष्मा लावे म्हणून. इसाक मुल्ला. कारण मुल्लासारखा राजकीय; सामाजिक उपदेश करणे ही इसाकची स्टाइल होती. अशी किती तरी.

त्याला एक कारण होते. तुम्ही 'सिद्दीक' म्हणून मैदानात उभे राहून आवाज दिलात तर पाच–सहा सिद्दीक तरी ओ देणार. तेच अहमद किंवा अझीज किंवा मजीद नावाचे. सलाम, कामरेड सलाम होता. कारण कामरेडगिरी त्याचे सर्वस्व. मुसलमानात नावाची कमतरता आहे असे नाही. अरबी उर्दू नावे भरपूर आहेत; पण जुनी पद्धती. हिंदूंमध्ये जसे पूर्वी नामदेव, तुकाराम, रामदास, विष्णू, राम तसेच. धार्मिक नावे देण्याची प्रवृत्ती जास्त. आत्ताआत्ताशी नवीन निधर्मी नावे देण्याची प्रथा पडली आहे. अरेबिक, पर्शियन किंवा उर्दू.

एके दिवशी सलामने मला विचारले, 'घरकी हालत कैसी है?'

'खबर आती है बीवी तो पूना में है बच्चोंके साथ.' ही बाळंतपणाला माहेरी गेली ती परत आली नव्हती. मी भूमिगत म्हणून.

'खबरसे क्या होता है? मिलके आना!'

'अंडरग्राउण्ड मे घरवालोसे नही मिलते.'

'फिर वही बात? सब कुछ कर सकते हो. सिर्फ घरपे और पार्टी ऑफिसपे जाने का नही.'

मी दुसऱ्या दिवशी पुण्याला गेलो. मी भूमिगत झाल्यानंतर ही बाळंत झाली होती. तिच्या मैत्रिणीकडे जाऊन तिला घरी पाठवले. अर्ध्या तासानें दोघी आल्या संगीताला घेऊन. माझ्या मांडीवर घेतली तशी मोठ्याने किंचाळू लागली, तिन्हाईत वाटून. लाल-लाल गोरी आणि दिसायला छान होती. चौकशी करून अर्ध्या तासात मी निघालो.

पुण्यात पंधरा दिवस काढले. सुरेश बेरी, अनिल बर्वे यांच्या ओळखी झाल्या. मी आनंद मराठे होतो. अनिल सतरा एक वर्षांचा असेल. समाजवाद्यातून नुकताच आमच्याकडे येऊ घातलेला. पाच–दहा मिनिटात शंभर प्रश्न विचारे मार्क्सवादाबद्दल. मी बाहेर आल्यावर माझ्या घरी आला.तेव्हा मी घरी नव्हतो पत्ता बरोबर दिला होता. वडील म्हणाले, 'इथे आनंद मराठे राहात नाही.' त्यांना सांगायला मी विसरलो होतो.

मुबईत परत आल्यावर चार ठिकाणे बदलली. वेगवेगळ्या ब्रँचेसमध्ये रात्री जात असे. काम विशेष नव्हते. पार्टी पार थंडावली होती.

कॉ. रामचंद्रन भेटे. तो चौसष्ट डिसेंबरपासून अंडरग्राउण्ड होता. भयंकर अ‍ॅक्टिव्ह माणूस. सध्या तो नक्षलवादी आहे. एकाच ठिकाणी दोन रात्री राहात नसे. अजूनही त्याची तीच सवय आहे. लग्न केलेच नाही. त्याने मला बरेच हिंडवले. माटुंग्यापासून ते उल्हासनगरपर्यंत. रात्री दोन–दोन वाजेपर्यंत चर्चा, वादविवाद चालत. माझी लाइन समजावून घेण्याचा त्याने खूप प्रयत्न केला; पण शेवटपर्यंत त्याला ती पटली नाही.

मला वाटते प्रत्येकाच्या स्वभावाला अनुसरून तो विचार करतो. त्यात बौद्धिक भाग कमी असतो. विचार हा फक्त आपल्याला सोयीचा तोच असतो. 'वन थिंक्स व्हॉट वन इज.' त्यामुळे कोणाला काही पटवण्यापूर्वी तो काय चीज आहे हे समजून घ्यायला पाहिजे. हे मी नंतर शिकलो. त्या वेळी मेंदूवर दांडगा विश्वास होता. जीव तोडून लोकाना पटवायचा, कम्युनिस्ट बनवायचा–चर्चेतून प्रयत्न करीत असे. पाच टक्केसुद्धा यश मिळत नसे. लोक सामाजिक मंथनातच किंवा क्रांतीतच फार आणि झटकन बदलतात. त्यातही एक सोयच असते. माणूस स्वतःला समजतो तेवढा बुद्धिमान नाही. जनावरापेक्षा जरा वर.

एप्रिलमध्ये परत आग्रीपाड्याला आलो. अधूनमधून येऊन-जाऊन सलामला भेटत होतो. सलामच्या घरची परिस्थिती वाईट होती. वडील एकटेच कामाला आणि सलामची चार मुले, सात भाऊ असा बारातेरा माणसांचा परिवार. सलाम वैतागलेला होता. नोकऱ्या मिळत नव्हत्या. तो गिरणीत कामाला जायला तयार नव्हता. मी त्याला त्याबद्दल टोकले.

"वहांकी आवाज, हवा सही नहीं जाती. दो सालमें टी. बी. लग जायगी. और फिर वापस आके इतने थक जाते है की कुछ काम नही कर पाते. पार्टी वगैरे सब छोडना पडेगा!"

कापडगिरणी काय चीज आहे हे ज्याने ती पाहिली नाही त्याला कधीच कळणार नाही. साच्यांचा आवाज इतका भयंकर असतो की, बोलणे व्यर्थ असते. खुणांनीच चालते. जॉबर आला तर लोक लहुपणाची हातानी खूण एकमेकाला करतात असा अनेक खुणा आहेत. वाफ आणि उष्णताही खूप. त्याशिवाय धागा सुटत नाही सर्वत्र कापसाचे नि धाग्याचे तंतू उडत असतात. नाका-तोंडात जात असतात. पिठाच्या गिरणीतला कामगार जसा पिठाने भरतो तितके नाही, पण कामगार तंतूंनी भरलेले असतात. पंधरा मिनिटावर मला तेथे थांबता आले नाही कधीच. स्वयंचलित साचे असलेला भाग मात्र शांत असतो. फारसे तंतू उडत नाहीत; पण युनियन स्वयंचलित साच्यांना विरोध करते. कारण एक माणूस बत्तीस साचे पाहू शकतो. जुने साचे चारच पाहू शकतो. कामगार बेकार होतील. अजूनही कापडगिरण्यात कापडविभागात जुनेच साचे आहेत बव्हंशी. सलामची अडचण माझ्या लक्षात आली. तो तडजोड करण्यापेक्षा उपाशी मरायला तयार होता. घरी जेवायचा तेव्हा फक्त दोन रोट्या मटणाच्या रश्शात बुडवून खायचा. खडे खात नसे. त्याला विचारले तर म्हणाला की, आवडत नाहीत; पण मला कळले पोरासाठी नि भावासाठी ठेवतोय्.

मदनपुरा आग्रीपाड्यात माझी बडदास्त चांगली ठेवत. मी कलीना वगैरेला राहून अशक्त झालो होतो.दिवसा कॉम्रेडस् कामाला. वडा-पाव खाऊन दिवस काढत असे. रात्रीचं जेवण कालापानीत राहून. परत भरलो. रोज बीफ किंवा बोकडाचे मटण, मासळी असायचे. सिद्दीक चष्म्याच्या घरी जेवत असे. तो फार आग्रह करून जेवायला लावत असे. मुसलमानात पडदा असतो; पण मला सिद्दीकच्या घरी पडदा आढळला नाही. सलाम किंवा मक्सूदच्या घरीही नाही. सिद्दीकची बायको साबरा आणि मुलगी आमच्याबरोबर जेवायला बसत असत. साबराही थोडीफार कम्युनिस्ट होती. ती एकटीच बाई मला मदनपुऱ्यात लालबावटेवाली आढळली. मक्सूदची आई सोडून. बाकी लोक आपल्या बायकाना लालबावट्याचे विचार समजवायच्या भानगडीत पडत नसत. पण बायकाना लालबावट्याचा अभिमान होता.

¤

मे महिन्यात रेडिओवर अनाउन्समेंट आली. वॉरंटस् परत घेण्यात आली होती. कामगारमैदानात पार्टीची सभा होती. सर्वांना सोडण्यात आले होते. बी. टी. आर. सकट. सर्वजण गलेलठ्ठ होऊन बाहेर आले. बी. टी आर. सोडून. आत सर्वांना 'अ' वर्ग होता. दूध, आठवड्यातून दोनदा मटण आणि आराम! मी पटेकरला सभेत म्हणालो, "साले, तुम्ही लोकांनी मजा केलीत!"

"मग तुम्ही आत का नाही आलात? फुकट वणवण करत राहलात!"

"मला काय कल्पना? शिवाय जेलचा अनुभव केव्हाही मिळू शकतो. अंडरग्राउन्डचा नेहमी नाही."

बापटकडून व दयाळकडून कळले की, जेलमध्ये गेलो नाही ते बरे

## सगळेजण गलेलठ्ठ होऊन बाहेर आले होते...

झाले. आत फार भांडणे चालायची. मारामाऱ्यांपर्यंत पाळी यायची. रिकामी मंडळी आणि कोंडलेली. त्याचा परिणाम तीन तट पडले होते. दयाळ व बापट यांना बॉयकॉट केले होते. मंडळी एकमेकावर गलिच्छ आरोप करीत. वाटेल ते बोलत. तुरुगात फक्त बी. टी. आर. आणि कॉ ओक शांत असत. बाकी सर्वजण भाडणात व्यग्र पण खेळतही असत. व्हॉलीबॉल वगैरे. कारण नुसतेच भांडून वेड लागायचे. तुरुंग हा असाच आहे माणसाला पशू बनवतो !

मे महिनाअखेर बायकोला घेऊन घरी आलो. उत्पन्न शून्य होते. वकिलीला परत सुरुवात करायची तर जमेपर्यंत वेळ जाणार काय करावे ते सुचत नसे. शिवाय राजकारण पूर्ण वेळ करायचे डोक्यात वेड होते. घरात भांडणे होऊ लागली. बायकोचे व आईचे पटत नसे. शेवटी वेगळे राहायचे ठरवले. सलामला जाऊन भेटलो. सलाम म्हणाला, "अब्दुल्लाकी रूम खाली है." पहिल्या माळ्यावर अब्दुल्लाची खोली होती. त्याचा पहिल्या बायकोपासून तलाक झाला होता. दुसरे लग्न करायचा त्याचा इरादा नव्हता. मी बायकोशी बोललो. मोठ्या मुलीला आजोळीच ठेवले होते. तो कबूल झाली. तीही थोडीफार वागण्यात माझीच आवृत्ती. खालच्या वर्गात व दलित समाजात मिसळणारी मैत्रिणी मराठा, चांभार, महार जास्त. आपण कायस्थ आहोत हे कधीही त्यांना जाणवू न देणारी

आम्ही जूनमध्ये लम्बी सिमिटमध्ये गेलो. संगीताला घेऊन. संगीता दहा महिन्यांची होती. फार चपळ, हसरी आणी गोरीपान! मुसलमानांना मुलाचे अति प्रेम असते. सर्वजण संगीतावर एकदम फिदा झाले. पोरांपासून थोरांपर्यंत. सकाळी नऊ वाजता तिला कोणी तरी येऊन घेऊन जाई. पडद्याबाहेर उभे राहून हाक मारे 'संगीता!' मग ही संगीताला बाहेर सोडे. कोण घेऊन जाई त्याचा चेहराही माहीत नसे. भायखळा स्टेशनपासून ते मदनपुऱ्यापर्यंत ती एकाकडून दुसऱ्याकडे अशी फिरवली जाई सर्व हॉटेल्स संगीता फिरून सध्याकाळी सहा-सातला घरी येई. दूध, बिस्किटे सर्व बाहेरच. असला प्रकार मी आयुष्यात पाहिला नव्हता. हिंदू आणि विशेषत: मध्यमवर्गात हे घडत नाही. कामगारात चालते; पण इतके नाही मला काळजी वाटायची. सलामला विचारले तर तो हसत म्हणाला, 'बिल्कुल फिकर मत करो कोई भगाएगा नही.'

माझ्या बायकोला बायकांनी लगेच सामील करून घेतले तीही मिसळून गेली. एकदा घरी गेलो तर पाहिले. तिने कुकू लावले नव्हते. एरवी मी कितीही आग्रह केला तरी ती कुंकू लावल्याशिवाय राहात नसे. मी विचारले,

'का ग कुकू लावले नाहीस ?'

'इथे बरं पडतं. कोणीच लावत नाही.'

काही दिवसांनी मंगळसूत्रही पेटीत गेले. नूराने हिला सर्वजणीची ओळख करून दिली. दिवसभर सलामच्या घरी अड्डा असे. दहाबारा बायका. हिचे हिंदी चांगले आहे. तिची काकी पंजाबी. तिच्याकडे दोन वर्षं राहिल्यामुळे आणि हिंदी सिनेमे पाहून. त्यामुळे बायकांशी गप्पा मारण्यात तिला अडचण वाटत नसे. बायकाची बैठक बसली असता कधीकधी मी जात नसे. त्या मला पडदा करीत नाहीत. एकीला आठ महिने गेले होते. नवऱ्याने टाकली होती. तिला पोट फार आले होते. सगळ्याजणी तिला पेटवाली म्हणत. दुसरी फातमा. सलामची भाभी. मोठ्या भावाची बायको. तो दोन नबरचा धंदा करतो. सलाम त्याच्याशी बोलत नसे. फातमाला मूल नव्हते. कोळ्याची मुलगी. सलामच्या भावाने तिला मुसलमान करून घेऊन तिच्याशी लग्न केले होते. आठदहा जणी हसत-खिदळत, हिची व एकमेकीची चेष्टा करीत दुपार घालवत.

एकेकीला ढीगभर पोरे. 'खुदाकी देन है' त्या म्हणत. ही त्यांना सारखी फसवत असे दिवस गेले असं सांगून. पहिल्या पहिल्यांदा तिचे खूप कौतुक करीत. गोडधोड खायला घालीत; पण नंतर त्यांना कळले. मस्करी आहे. मग वैतागत. 'तुम लोग बच्चोंको रोकते हो. ये ठीक नही.'

'उनको खानेको क्या देनेका ? खुदको नही इधर.'

'जैसे अपुन रहते वैसेही उनको रखने का.'

'वो ठीक नही. सबकी तबियत बिगड जाती है.' पण हिच्या म्हणण्याचा त्यांच्यावर परिणाम होत नसे.

मदनपुऱ्यात सत्तरटक्के अन्सारी लोक राहतात. यु. पी. चे मुस्लिम विणकर. लंबी सीमीटमध्ये जवळजवळ सगळेच अन्सारी. पूरभी बोलीचा एक वेगळाच फॉर्म मदनपुऱ्यात बोलला जातो. उर्दू फक्त चर्चेच्या वेळी बोलले जाते पुरुषमडळीत. बायकांना उर्दू येत नाही.

'तोरी लडकी बहुत बडी हुवी है. शादी बनाना ओकी।'

'नक्की कर डाली है ओके बापने।'

'केके साथ।'

'अहमद का बेटा मक्दुमवा के साथ।'

'ओकी तो नौकरी छुटी है ना ?'

'गांवखातेमें काम करता है। मिल जायगी दूसरी।' स्थानिक पेडल व पावरलूम म्हणजे गांवखाते.

'मेरा कय्युमवा गराज मे कामपे लगा है। ड्रायविंग सिखाना है ओके। कुवेट भेज देगा ओका बाप अगली साल।'

अशा तऱ्हेची बोली आहे ती. बायका लाडिकपणे बोलतात.

बायका शुक्रवारी आघोळ करत. कपडेही एकदम त्याच दिवशी धूत. पुरुष मात्र रोज आंघोळ करतात. हिला रोज आंघोळ केल्याशिवाय चैन पडत नसे. लम्बी सिमिटमध्ये कायम खरजेची लागण असते. हिलाही एकदा झाली; पण औषधामुळे व रोज आघोळीमुळे लौकर बरी झाली. पाण्याची टंचाई फार. पहाटे चार ते सात पाणी येते पोरी भरून ठेवतात. नूराची बहीण सैया किंवा रसिया आमच्याकडे पाणी भरत. बायको नळावर जात नसे. आम्ही झोपलेलो असताना सकाळी सहाला सैया येई घुंगट करून आणि पंधरावीस मिनिटात पाणी भरून जाई. पोरी पंधरा–सोळा वर्षांच्या होत्या. कधी इकडे तिकडे पहात नसत. नजर खाली. नीतिमत्ता एकदम कडक असते. पोरीने किंवा पोराने भानगड केली तर खुनाखुनी होते. शिवाय सर्व अन्सारी मंडळी सी. के. पी. लोकांसारखी. सर्वांचे एकमेकांशी कुठले तरी नाते. सी. के. पी. पेक्षा जास्त संबंधित आणि एकाच वस्तीत राहणारी. म्हणून भानगडी क्वचितच होतात.

ही बीफ खात नसे; पण माझ्यासाठी एक प्याली सलामच्या किंवा दुसऱ्या कुणाच्या तरी घरून रोज सकाळ-संध्याकाळी येई. हिला बीफ खाण्याचा कोणी आग्रह केला नाही. सलामकडे जेवली तर भाजी,

डाळ खात असे रोटचा कुणीही यऊन करून देई किंवा करू लागे.

सलामच्या वडिलांनी हिचे मुस्लिम बारसे केले–जैतून आम्ही नतर-ही कधी भेटायला गेलो की ते तिला जैतून म्हणून हाक मारत. गेल्या वर्षीच वारले. बाकी सर्वजण तिला भाभी म्हणत. मला मोहन. ही बायकांबरोबर सिनेमाला जाई. मुस्लिम बाया सिनेमा अचाट पाहतात. घरात पडद्यात बसून कटाळतात. दिवसभर चहा आणि पान खाणे चालू असते. तेही कंटाळा येउ नये म्हणून. गंमतीने नूराने माझ्या बायकोला सिनेमाला जाताना बुरखा घातला. नंतर म्हणाली,

'सब पहनते है न बाहर जाते टाइम, तुम भी पहना करो।'

मग बायकांबरोबर बाहेर जाताना हीपण बुरखा घालू लागलो. अर्थात माझ्याबरोबर असताना नाही. आम्ही कधीकधी शेवटच्या शोला जात असू. येताना हिला थोडी भीती वाटे वस्तीत भाडण, कधी मारामाऱ्या चालत; पण आम्हाला कधी येताना त्रास झाला नाही.

बायकोचे मंगळवार, गुरुवार, शनिवारचे उपवास असत. तेव्हा ती सलामकडे काही खात नसे. तेही तिच्या उपवासाचा मान ठेवत. बायका नमाज फक्त सणाच्या वेळी पढत. धर्माचे अवडंबर बायकात नाही पुरुष मात्र रोज नमाज पढतात, मशिदीत जाऊन. कॉम्रेड लोक नमाज पढत नाहीत. मशिदीतही जात नाहीत. धर्माची किस-ल्याही प्रकारची चर्चा बायकांनी हिच्याशी कधी केली नाही. मी लाल बावटेवाला नास्तिक हे त्याना चांगले माहीत होते.

जुलै महिना उजाडला तरी सहासष्ट साली पाऊस पडला नव्हता. मुंबईत घबराट पसरली. वसंतराव नाईक मुख्यमंत्री त्या वेळचे. त्यांनी घोषणा केली पंधरा जुलैपर्यंत पाऊस पडला नाही तर मुबई खाली करणार. मुबईभर महादेव पाण्यात बुडविले. मदनपुऱ्यात पोरे मोर्चांनी फिरू लागली! 'या अल्ला पानी दो' या घोषणा करीत. सलाम म्हणायचा. 'चूतिए है साले. मुल्ला लोक बोलते है और ये घुमते है अल्ला के नामसे.' अखेर दुसऱ्या आठवड्यात पाऊस पडला. सर्वांनी अल्लाला दुवा दिला. सलामने परत शिव्या घातल्या.

¤

आमची आर्थिक परिस्थिती बेकार होती. कोर्टात काम नव्हते. पार्टीचा मी फुलटायमरही नव्हतो. ट्रेड युनियनवाले व पुढारी फक्त फुलटायमर. बाकी पोसायची ताकद नव्हती. इतकी परिस्थिती आली की, दोन दिवस घरात स्टोव्ह पेटला नाही! सलामला कळले कुठून तरी पाच रुपये आणून तो माझ्या हातात कोंबायचा मी नाही नाही म्हणत असताना. संगीताच्या एक लिटर दुधाची उधारी होती. शिवाय तिचे दूध बहुतेक बाहेरच होई

ही संगीताला कधीकधी सकाळच्यावेळी स्वयंपाक करताना खाटेला दोरीने बाधे. कारण ती स्टोव्हकडे येई एकदा बाहेर रांगत जाऊन जिन्यावरून गडगडली. सकाळी पोरीही कामात. रागत संगीता दारा-पर्यंत जाई; पण पायाला दोरी बांधलेली असल्यासुळे तिला दाराबाहेर फार जाता येत नसे. मग ती रडे. कोणी तरी बाहेर येई.

'अरे, इसको बाँधा क्यों?' म्हणून दोरी सोडून उचलून नेई. तिचे नाव 'कन्हैया' पडले. कृष्णासारखी बांधली म्हणून !

तो काळ माझ्या बायकोच्या एरवी हालअपेष्टांच्या काळातला सर्वात चागला गेला. आनंदी असायची. एकटेपणा अजिबात नाही. पुढे पुढे हिंदूंच्या वागण्याला नावे ठेवायची. अजूनही ठेवते. विशेषतः मराठी माणसाना.

'सगळे एकजात अप्पलपोटे आणि स्वतःत गुरफटलेले. स्वार्थी. एकमेकाला नुसती नावं ठेवायची आणि भांडायचे. दुसरा उद्योग नाही. मुसलमानात कशी एकी असते!'

हे काही सर्वस्वी खरे नाही. त्यांच्यातही आपसात हेवेदावे, भांडणे असतात. पण दुही कमी आणि सामूहिक जीवन जास्त म्हणून माणूस एकदम एकटा पडत नाही, वाऱ्यावर सोडल्यासारखा. माझी बायको भावनानी कम्युनिस्ट आहे. विचारानी नसली तरी. कारण विचार समजत नाहीत. फक्त कॉंग्रेसला व भांडवलशाहीला - म्हणजे व्यापाऱ्यांना–नावे ठेवते. तिला सामूहिक जीवन आवडते. जातपात मुळीच मानत नाही, पाळत नाही तिचा धर्म सोडवायचा फार प्रयत्न केला तेव्हा; पण सुटला नाही. दारू सुटत नाही तसा. पुणेरी पडली! धर्मकाडात व कर्मकांडात वाढलेली. ते संस्कार जात नाहीत. पुढे घर मिळाल्यावर, पँथरचा वकील झाल्यावर घरी नामदेव येत असे–पाच पाच पोरांना घेऊन. बॉडीगार्डस त्याचे स्वयंपाकखोलीत, देवाजवळ. टेबलावर, बूट घालून देखील जेवायला बसत. कारण मीही बसे. कधीकधी माझ्या घरातल्या देवाबद्दल पोरं बोलत; पण नामदेव बोलत नसे. तेव्हा ती म्हणे–

'इतर गोष्टी मला चालतील; पण माझ्या देवाला नावं ठेवायची नाहीत.'

तेही गप्प बसत. तिचा स्वयंपाक फार रुचकर. मटण, मासे नि बिर्याणी. ती बंद व्हायची हिला डिवचलं तर! शिवाय माझ्या घरात बीफपण शिजत असे. ती त्याला हात लावत नसे. मीच शिजवायचो.

एकदा ती मला गंमतीनं म्हणाली,

'मी मुसलमान होऊ का?'

मी ह्या अचानक प्रश्नामुळे थोडा चक्रावलो. मग तिच्याकडे पाहिले. ती स्मित करीत होती.

'तुझ्या हिंदुत्वाचा मला इतका त्रास होतोय की तुझ्याशी तलाक घ्यावासा वाटतोय. मग मुसलमान झालीस तर आमचे काय हाल होतील? काडीमोडाशिवाय उपाय नाही राहणार.!'

बोलण्यातील गफलत जाणूनबुजून आहे हे ती समजली.

'अर्थात तुला खरंच तो धर्म आवडत असेल तर माझी काहीच हरकत नाही.' मी एकदम सरियस होतो. 'तुझ्या मनाचं समाधान त्याच्यामुळे होत असेल तर माझी काही हरकत नाही.'

'माझा कसला अभ्यास आणि कसले काय!' ती म्हणाली; 'पण माणसं चांगली आहेत.'

'हाच तर तुझ्यातला दोष आहे. जिकडे जातेस तिकडची होतेस. पानी तेरा रंग कैसा? जिसमे मिलावे वैसा।'

'का असं असू नये माणसानं? सगळी माणसंच आहेत ना?

**मुस्लिम बाया सिनेमा पाहतात, घरात बसून कंटाळतात.**

आणि जनावरांना का कमी लेखायचं? तीही प्रेम करतात.'

'भाभी', म्हणजे माझी बायको, मदनपुऱ्यात बेफाम पॉप्युलर झाली होती. माझी किंमत कचरा होऊ लागली होती' मलाही असूया वाटू लागली.

एकदा मी तिला म्हटले.

'नीले, तू माझ्यावर कुरघोडी केलीस ग. मला कोणीच विचारीत नाही. अन तुझ्या अवती भोवती सगळे असतात.

'तुम्ही वेगळे आणि मी वेगळी. त्यात कमीपणा कशाला वाटून घ्यायचा?'

¤

सलाम हिच्या बाबतीत अतिशय कडक होता. तिचा चेहराही पाहात नसे. संगीताला न्यायला आला तरी. मी त्याला एकदा विचारलं. तो म्हणाला,

'छोटे भाई की औरत है।'

मी गप्प बसलो. हे कसले मुसलमान? हे सगळे हिंदूच.

भारतातले सर्व मुसलमात हिंदूच आहेत, हे अजून कोणालाच कळलं नाही.

हिंदुत्ववादाच्या अन् राष्ट्रीयत्वाच्या भाषा करतात. सामील होतील पण करून घेणारे पाहिजेत. 'दुनिया झुकती है लेकिन झुकानेवाला चाहिये' आणि हिने दुनिया झुकवली होती. मी नाही.

ह्या गोष्टी अतिरंजित वाटतील. पण सर्वांनी थोडासा विचार; थोडा विवेक करावा. हळूहळू सारं लक्षात येईल.

पण धर्मवाद्यांत विवेक नसतो. जसा हिंदूत तसा मुसलमानात आणि तसाच ज्यू ख्रिश्चनात.

माणसानं स्वतःला विसरून मिसळून जायला हवं. जसं ही करत होती, मी नाही.

स्वतःला तेवढं विसरू शकलो नाही. माझं शिक्षण, माझी पात्रता हीच माझी अपात्रता ठरत होती.

प्रेम करावं अन् करून घ्यावं.

हिला मुलं आवडत. ह्या वाक्यातून काहीच कळणार नाही. मुलं मलाही आवडतात, तुम्हालाही. पण हिच्या हातात मूल आलं तर त्याचा चोळामोळाच व्हायचा बाकी राहतो. मी तिला कधीकधी म्हणतो,

'नीलू, एवढं नकोस आवळू त्यांना.'

मला कळतं मुलांना कसं धरावं, चार झालीत.'

मुसलमानांना मुलं आवडतात. सर्व दरिद्री लोकांना मुलं आवडतात. काही मूर्खशिरोमणी म्हणतात.

'लोकवस्ती वाढतेय, त्याचं कारण गरिबी. दुसरी करमणूक काय?'

ह्या भडव्यांना सेक्सशिवाय काही दिसत नाही. गर्भ राहिल्यापासून ते मूल आठ दहा वर्षांचं होईपर्यंतचा काळ अतिशय संगीत असतो.

पण त्यांना ते दिसत नाही. दिसते फक्त नागवी क्रिया.

ॲरिस्टॉटलनं दिलेल्या तर्कशास्त्राचा हा वारसा आहे. प्रत्येक वस्तू; प्रसंग वेगळे. भिन्न जीवनातला रस शोषून फेकून देणारं तर्कशास्त्र.

मुसलमान अजूनही फॅमिली प्लॅनिंग करीत नाहीत. त्याची कारणं दोन :–

एक तर त्याचं दारिद्र्य.

आणि दुसरा त्यांचा एकाकीपणा.

कोणास पटणार नाही. न पटो. कोणाला काही कधी पटवायचं नसतं. फक्त हिच्यासारखं मुक्त वागायचं असतं. जगायचं असतं.

ते ह्यांच्या बापालाही जमणार नाही.

'ओम् सहना भवतु
सहनौ भुनक्तु
सहवीर्यं करवावहै'

ह्याच्यापलिकडे ही मंडळी जाणार नाहीत.

त्याची शोकांतिका, their funeral.

कुंकू पुसून, मंगळसूत्र पेटीत घालून ती मुक्त जगली.

मदनपुऱ्यात जेवढी आनंदी, सुखी होती तेवढी नंतर ती मला कधीच दिसली नाही.

तुळजाभवानीची कडक भक्तीण माझी बायको. कडक मंगळवार करते. आज गेली कितीएक वर्षं.

'प्रोग्रेसिव्ह' शब्दाची व्याख्या बदलायला हवी.

¤

डिसेंबर महिना असेल.

एकदा सलाम मला म्हणाला,

'अब्दुला दूसरी शादी करना चाहता है'

आम्ही अब्दुल्लाच्या खोलीत राहात होतो. सारा प्रकार एका क्षणात माझ्या लक्षात आला. मीही बिनधास्त.

'तो करने दो. आठ दिनमे रुम खाली कर देता हूं'

'कॉम्रेड, मुझे बहुत अफसोस है...'

पुढे तो काही म्हणण्याअगोदर मीच म्हणालो.

'सलामभाय, मेरी फिकर नही करना. मैं तो कही भी रह सकता हूं और औरत भी.'

'भाभी की बात ही छोडो. जहाँ जायगी वहाँ राज करेगी. मुझे फिकर है तुम्हारी और बच्चोंकी.'

'सब ठीक हो जाएगा. मार्क्सका शुक्र है' माझ्या विनोदावर तो हसला.

¤

आम्ही सातव्या दिवशी लम्बी सिमिटमधून हललो. ही माझ्याकडे बघण्याचे टाळत होती. ती कधीच रडत नाही. मला रडका म्हणते. न सांगावे तेवढे चांगले.

त्या रात्री दोन्ही मजल्यांवरच्या बायका जेवल्या नसाव्यात. माझा अंदाज नंतर खरा ठरला.

¤

मी पुण्यात राहून गोखले इन्स्टिट्यूट लायब्ररीत बसत असे. पार्टी सोडली नव्हती. पण काम करायची इच्छाही नव्हती. मतभेद फार. सुधारणावाद्यांबरोबर, एकदा संझगिरींना सांगितले 'मी आता मेंबर राहू शकत नाही, तुमची आणि माझी लाईन वेगळी, ते चालू शकते. पण तुम्ही संपूर्ण पार्लमेंटरी संघटना शास्त्राप्रमाणे पार्टी उभारली आहे मी काम करू शकत नाही!'

मी राजिनामा दिला नाही. कॉ. रामचंद्रनला पार्टीतून काढण्यात आले. होते मला देखील ॲंटिपार्टी ॲक्टिव्हिटीबद्दल काढायचे ठरले. पण मी माझे कार्ड रिन्यूच केले नव्हते. मग प्रश्नच उद्भवला नाही. तरी एकदोन वर्तमानपत्रात बातम्या आल्या. त्यात माझंही नाव होतं-पार्टीतून काढल्याचं.

¤

मी मुंबईत येत जात होतो. आलो की मदनपुऱ्यात जात असे. सलाम भेटायचा. गांजला होता. नोकरी सोडून दोन वर्षं होऊन गेली होती. चार मुलं. चौघाचा संसार.

सलामची परिस्थिती दिवसेंदिवस फारच बिकट होऊ लागली. वडील सदसष्टअखेर रिटायर झाले. फंड वगैरे काढला. पण तो खर्च करायचा कसा ? अडसष्ट सुरुवातीला सलामची आई कुवेतला गेली. घरकामाची नोकर म्हणून. त्याशिवाय उपायच नव्हता. ती महिना चारशे रुपये पाठवत असे. तेरा चौदा लोकांना कसे पुरणार?

मी हिला माहेरीच ठेवले होते. आणि घरी राहून वकिलीला सुरुवात केली. वडिलाच्या एका ओळखीच्या वकिलाकडे ज्युनिअर राहलो. महिना दोनशे देत असे तो, ते सर्व हिला पाठवून द्यायचे. मलाही प्रॅक्टिस मिळू लागली. बऱ्याचशा केसेस मदनपुऱ्यातून मिळायच्या. सिद्दीक, मक्सूद व सलाम यानी मिळून मला कामे पाठवायला सुरुवात केली. आयुष्यात प्रथमच पाचशेच्या वर उत्पन्न गेले, आई-वडलांना व सासूसासऱ्यांना बरे वाटले.

सदुसष्टला नक्षलाईट फूट पडली. बंगालमधून बरेच कार्यकर्ते बाहेर पडले. पण सहानुभूतिदार तरुणांचा भरणा त्यात अधिक होता. मदनपुऱ्यातले कॉम्रेड नक्षलवाद्यांना नावाजत, लढाऊ म्हणून. पण हा लढा आत्मघातकी होता. मला त्याचे गुप्त वाङ्मय मिळत होते. त्याची, 'भारत हा एक नववसाहतीखालचा देश आहे' ही लाईन मला मान्य नव्हती. सलामलाही ते पटत नव्हते; पण त्याच्या बोलण्यात त्यांच्याविषयी आदर दिसून येई.

आंध्रच्या डाव्या-उजव्या फुटीत अर्धेअधिक कॉम्रेड्स डाव्यांकडे आले होते, अडसष्टला नागीरेड्डी बाहेर पडला आणि सत्तर टक्के लोक त्यांच्याबरोबर गेले. आंध्रात उजवे डावे नाममात्र राहिले. नागीरेड्डीची लाईन नक्षलवाद्यापेक्षा थोडी वेगळी पण आत्मघातकीच होती. त्याला मिळण्याचा प्रश्नच येत नव्हता. विचार वेगळे असले तर एकत्र राहण्यात फारसा अर्थ नसतो. केव्हा ना केव्हा फूट पडते किंवा आपल्याला बाहेर पडावे लागते. त्यामुळे राजकीयदृष्ट्या मी अलिप्तच होतो, सी. पी. एम. शी थोडे संबंध ठेवले होते. युनियन वाल्यांशी. रामचंद्रन एकटाच काम करत होता. त्याला राजकीय जीवनापलिकडे जीवन नव्हते.

सलाम अधूनमधून माझ्या ऑफिसवर येई. मी दहा-पंधरा रुपये त्याच्या खिशात घालत असे; पण सलामची आर्थिक कोंडी फुटत नव्हती.

¤

त्यानंतर एकदा गेलो तेव्हा नूरा फार वैतागली होती. प्रथमच सलामला बोलली. पाच मुले होती. पाच भाऊ, वडील इतका परिवार. 'कुछ तो करना चाहिये। बैठे बैठे क्या होगा?' ती मला म्हणाली.

सलाम मला घेऊन खाली उतरला. खूप त्रासला होता. मला हॉटेलात बसवून समोरच्या कम्पाउण्डमध्ये जाऊन परत आला.

'क्या किया कामरेड ?' मी विचारले.

'धंदेवालेके पाससे पैसा लाया। मांगा नही, मगर थोडी देर बैठनेके बाद वोही खुद बोला।'

'बहुत परेशान दिखते हो कामरेड सलाम। मैं बोला, 'घरकी परेशानी है। उसने सौ दिया। ले नही रहा था मैं, मगर क्या करे? लौटा देंगे मिल जायगा तब।'

मी काहीच बोललो नाही. माझ्यात तीन-चारशे देण्याची ऐपत नव्हती. सलामने फार मोठी तडजोड केली होती. तो माझ्या नजरेला नजर देण्याचे टाळत होता.

मी सलामला म्हटले,

'कॉम्रेड, मेरी मानो, ड्रायविंग सीख लो और अरब मुल्क चले जाव।'

'सोचेंगे।'

'सोचने के लिये वक्त नही है। जल्दी कुच्छ कर डालना।'

कॉम्रेड्सच्या बायका उपाशी दिवस काढीत. अडचणीच्या काळात प्रत्येकाला चार ते सात मुले असताना; पण नवऱ्याला टाकून बोलत नसत, सात वर्षे त्रास काढल्यानंतर नूरा प्रथमच बोलली होती. तिचेही बरोबर होते.

सलामने ड्रायव्हिंग शिकून घेतले. कुणा तरी कॉम्रेडने त्यासाठी तीनशे रुपये भरले. दोन महिन्यांत सलामने ड्रायव्हिंगची हेवी विहिकल परीक्षा देऊन हेवीचे लायसेन्स मिळवले.

सिद्दिक चष्मावाले जाण्यासाठी लागणारे तीन हजार दिले. पासपोर्ट काढून झाला. एजण्टने पूर्वतयारी केली, तोपर्यंत बहात्तर साल उजाडले.

एके दिवशी सलाम संध्याकाळी घरी आला.

'कामरेड जाने की तैयारी हो चुकी है। आती पंधरा को जा रहा हूं।'

त्याच्या स्वरात विषण्णता होती. जरी गेले वर्षभर सलाम पक्ष-चळवळीविषयी निराशावादी बनत चालला होता, तरी त्याची निष्ठा आणि क्रांतीवरील विश्वास ढळला नव्हता. त्यामुळे आपली सामाजिक-राजकीय नाळ तोडून जाताना सलामला मरणाच्या वेदना होत होत्या. त्याच्या जाण्याच्या मलाही. कुवेत मुंबईपासून दीड-एक हजार मैल दूर; पण सलाम स्वत:पासून लाखो मैल दूर चालला होता. मीही चळवळीत ॲक्टिव्ह राहलो नव्हतो. सहप्रवासी व सहानुभूतीदार; पण सलामचे दु:ख तिहेरी होते. चळवळीच्या सीनपासून दूर, बायकापोरे, दोस्त कॉम्रेड्सपासून दूर आणि समाजापासून दूर. सामाजिक कार्यकर्त्यांचे समाजकार्याचे व्यसन इतके जबर असते की, ते सोडणे म्हणजे दारुड्याची दारू अचानक तोडण्यासारखे आहे. मला सलामचे दु:ख समजत होते, जाणवत होते.

'खत भेजते रहना कॉम्रेड!' मी आमच्या दोघांच्या मनातल्या भावनाकल्लोळाला बगल दिली. 'और भाभीको पैसा भी।'

'हां' तो हसून म्हणाला, 'उसी के लिये तो जा रहा हूं।' जरा-वेळ थांबून तो म्हणाला, 'भाभीको बोलना हम जा रहे हैं।'

मी नीलाला हाक मारली. ती बाहेर आली. 'नीला, सलामभाई

**सलाम स्वत:पासून लाखो मैल दूर चालला होता.**

कुवेतला चालले आहेत.'

'हाँ भाभी; पेट के लिये जाना पड रहा है, आप सबसे दूर।'

तिला वाईट वाटले; पण तिचा बाईतला व्यवहार जागा झाला.

'तो क्या हुवा? बालबच्चोको तो देखना चाहिए। और आते जाते तो रहेंगे।'

हल्ली सलाम तिच्याशी पडदा केल्यागत वागत नसे.

'वो तो जरूर, आप घरकी खबर लेते रहना।'

'नूरांसे मिले बिगर हमे चैन नही होती।' ही म्हणाली.

आम्ही अधूनमधून आग्रीपाडयात जात-येत असू. हिच्या आणि तिथल्या बायकाच्या संबंधात तिळमात्र फरक पडला नव्हता. गप्पा तासन तास रंगत.

¤

दोन वर्षांपूर्वी आम्ही पुण्याला स्थायिक झालो. मी कामानिमित्त जात-येत असे मुंबईस. गेलो की नूराभाभी, मुलांना भेटत असे. युसुफ, सलामचा सावत्र भाऊ कुवेतला गेला होता. एकदा नूरा म्हणाली,

'लोग बोलते है उन्होने दूसरी औरत रखी है' तिच्या डोळयात पाणी चमकले.

मी हे ऐकून गारच झालो. मग विचार करून म्हणालो,

'भाभी, बेफिकर रहना. सलामभाई ऐसा नही कर सकते.'

'मरद जातका क्या भरोसा?'

मी चौकशी केली. बरेच लोक मदनपुरा–आग्रीपाडयातून गेले होते कुवेतला. मग कळले एक बाई युसुफने ठेवली होती. नूराचा जीव भांडयात पडला. युसुफचे लग्न झाले नव्हते.

¤

एके दिवशी पत्र आले १८ मार्च १९८० ला. कमर नि आशियाँ याचे लग्न होते. पत्र २० मार्चला मिळाले. लिहिले होते,

'वो नही है. आप कमर और आशियाँ के वालीद की जगह हैं. जरूर आना!'

आम्हा दोघांना फार वाईट वाटले. तारीख उलटून गेली म्हणून नंतर दोघे भेटून आलो. साऱ्या बाया आमच्यावर चिडल्या होत्या. समजावता समजावता नाकी नऊ आले!

¤

त्या वर्षी गेल्या महिन्यात कळले 'वो २० अक्तूबर को आ रहे हैं.'

२५ तारखेला मी मुंबईला गेलो.

सलाम कोपऱ्यावरच्या हॉटेलात बसला होता. नेहमीप्रमाणे सर्वांशी गप्पा मारत. अंग भरले होते. चेहरा पूर्वीसारखा तजेलदार नव्हता; पण डोळयातील चमक आणि तीव्रता कायम होती.

'आव परधान!' उठून त्याने हात मिळवला, जसा काही परवाच भेटला होता. सात वर्षांनी नाही.

आणि मग गप्पा झाल्या. स्थानिकपासून आंतरराष्ट्रीय राजकारण आणि दोस्तमंडळींबद्दल. सलामचे राजकीय ज्ञान तुटपुंजे झाले होते. कामात वेळ मिळत नव्हता वाचायला.

'क्या करूँ कामरेड, वक्तही नही मिलता पढनेके लिये. और वहाँ रियासी हव्वा बिलकुल नही.'

'यहाँ भी सब चौपट हो चुका है. लेफ्ट रियासत में रहा क्या है?' मी म्हणालो.

'वक्त खराब है. बोल नही सकते नूर कब बदलेगा;' पण त्याच्या स्वरात खात्री, पूर्वीचा दांडगा आत्मविश्वास नव्हता.

'भाभी कैसी है?' त्याने विषय बदलला.

'तबियत खराब रहती है अकेलेपन महसूस होता है उसे.'

'लम्बी सीमीटमे बहुत खुष थी.' तो म्हणाला.

इकडच्या–तिकडच्या गप्पांनंतर मी विचारले,

'अब कब आओगे?'

'कमसे कम पाँच सालके बाद.'

'और कैफी जाफरी को गालीयाँ देते थे. पैसेके पीछे पडकर आव्वामसे दूर गये करके.' मी गंमतीने म्हणालो.

माझा सूर गंमतीचा आहे हे समजूनही सलामला लागले.

'उनकी बात अलग, हमारी अलग. हम मजदूरही थे. मजदूरही रहेंगे. ये देशमें काम नहीं मिला इसलिये दूसरे देश गये.'

'सलाम मजाक नही समझते?'

'समझता हूँ फिरभी...'

'सलाम, तुम शरीरसे यहाँसे दूर गये हो और तुम्हारा हालत देखके बहुत दर्द होता है. लिख रहा हूँ एक मेगझिनमे मेरे और तुम्हारे बारेमें. एखाद शेर देना पैगामके तौरसे.'

'कामरेड, अब शेरशायरी कहाँ याद है?'

'फिर मैं एक सुनाता हूँ. गालिबका. मेरी तरफसे मेरी मूड बतानेवाला.'


'सुनाव, कॉमरेड सुनाव' तो उत्सुकतेने म्हणाला.

'चलो रहिये जरा ऐसी जगह चलकर
जहाँ हमसफर कोअी नही
हम जबाँ कोअी न हो.
पडिये मर बीमार
तो न हो कोअी तीमारदार
और अगर मर जाअिये
तो नौशख्वा कोअी न हो'

(चला अशा ठिकाणी जाऊन राहू या की, जेथे सहप्रवासी कोणी नसेल. आपली भाषा जाणणारा कोणी नसेल. आजारी पडलो तर निगा राखणारा कोणी नसेल आणि मेलो तर दुःख करणारा कोणी नसेल.)

'वोही तो मेरी हालत है कुवैतमें' तो हसत म्हणाला.

## समाप्त



# महात्मा आणि माणूस

विल्यम शिरर.
जगप्रसिद्ध अमेरिकन इतिहासकार.
'राइझ अँड फॉल ऑफ थर्ड राइश' या गाजलेल्या पुस्तकाचे लेखक.
पन्नास वर्षांपूर्वी मात्र ते कुणीच नव्हते.
'शिकागो ट्रिब्यून'चे प्रतिनिधी म्हणून ते भारतात आले होते तेव्हा केवळ सत्तावीस वर्षांचे होतकरू पत्रकार एवढीच त्यांची प्रतिमा होती. भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्याची वार्तापत्रं पाठवण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली होती.
या काळात गांधीजींशी त्यांचा निकटचा संबंध आला, अगदी मित्र म्हणवण्याइतका.
त्यांना दिसला एक महात्मा—
ख्रिस्ताशी साधर्म्य असलेला.
आणि एक माणूस तुमच्या—आमच्यासारखा.
'गांधी-अ-मेमॉर' या आपल्या पुस्तकात त्यांनी या आठवणी संकलित केल्या आहेत.
त्या पुस्तकाचा हा परिचयात्मक संक्षेप.

स्वैर रूपांतर **निखिल वागळे : भाग एक**

एकतीस सालच्या फेब्रुवारी महिन्यात माझी बोट मुंबईच्या किनाऱ्याला लागली तेव्हा गांधीजी पुन्हा एकदा तुरुंगातून सुटले होते. त्यांनाच भेटण्यासाठी मी ताबडतोब दिल्लीला जाणारी फ्रॉन्टियर मेल पकडली.

ब्रिटिशांची स्वराज्याच्या संदर्भात बोलणी सुरू करण्याचं वचन द्यावं आणि त्या बदल्यात गांधींनी कायदेभंगाची चळवळ मागं घ्यावी म्हणून व्हाइसरॉयबरोबर चाललेली त्यांची बोलणी फिसकटण्याच्या मार्गावर आहेत अशा बातम्या येऊ लागल्या होत्या. साहजिकच आणखी एकदा ब्रिटिशांच्या गजाआड जाण्याआधी गांधीजींना गाठायला मी उत्सुक होतो.

वर्षापूर्वी मी पहिल्यांदा भारतात आलो तेव्हा गांधीजी येरवडा तुरुंगात होते. त्यांच्याशी संपर्क साधणं केवळ अशक्य होतं. त्यांना भेटण्याची परवानगी नव्हती.

त्या वेळचा माझा भारत-दौरा हा एक निखळ निराशाजनक अनुभव म्हणावा लागल. अंग भाजून काढणारा तीस सालचा उन्हाळा, त्यानंतरची शिशिरातली पानझडी आणि कडक हिवाळ्याचे सुरुवातीचे दिवस...गांधीजी, काँग्रेसचे इतर नेते आणि दहा हजार क्रियाशील कार्यकर्त्यांना अटक झाल्यामुळं गोऱ्या राजसत्तेविरुद्ध ऐन वसंतऋतूत पुकारल्या गेलेल्या त्या बंडाची धगही कमी झाली होती.

तरीसुद्धा काही ठिकाणी ही धग मला जाणवलीच. देशातले अनेक तुरुंग खदखदत असले तरी अजूनही शहराशहरातून गांधीजींचे अनुयायी शांततामय सत्याग्रह करण्यासाठी रस्त्यावर उतरत होते. अक्षरश: हजारोंच्या संख्येने जमणारे स्त्री-पुरुष मी बघितले. मुंबई, कलकत्ता, दिल्ली, लाहोर आणि अशा अनेक ठिकाणच्या रस्त्यांवर ते ठाण मांडून बसत. दृढ निश्चयानं ते तिथून जायचं नाकारत. मग एकच अपरिहार्य परिणाम—ब्रिटिश पोलिसांचा अमानुष लाठीमार

आणि तुरुंगाची अपेक्षित वाट. तो निर्दयपणा मोठा किळसवाणा वाटे पण गांधीजींनी शिकवलेल्या अहिंसेच्या मार्गावर ते अढळ असत. त्या भव्य-दिव्य शिस्तीचं मला खरोखरच आश्चर्य वाटे; पण ते कधीही प्रतिकारासाठी हात उगारत नसत. प्रतिकाराचं तर सोडाच, पण लाठीच्या तडाख्यांपासून चेहरा आणि डोकं वाचवण्यापलीकडे ते बचावही करत नव्हते !

पेशावरमध्ये मात्र प्रतिकाराचं रूप वेगळं होतं. तिथल्या मुस्लिमांचं मतपरिवर्तन झालं नव्हतं. गांधींचा अहिंसेचा मार्ग त्यांना अजूनही पचत नव्हता. दोन्ही बाजूनी बंदुका धडाडत. मी तिथे पोचण्याआधी एक वेळ तर अशी आली होती की, पठाणांनी आपल्या मनगटाच्या बळावर पश्चिमोत्तर सीमेवरच्या या राजधानीच्या शहराचा जवळजवळ कब्जाच केला होता. शहराबाहेरच्या ब्रिटिश छावण्यांवर गोळ्यांचा वर्षाव करायलाही त्यांनी कमी केलं नव्हतं. मी ज्या रेस्टहाउसमध्ये उतरलो होतो तिथल्या माझ्या खोलीची भिंतही गोळ्यांच्या निशाणांनी मढवलेली होती.

दंडशक्तीच्या जोरावर स्वातंत्र्याचं हे अनोखं बंड मोडून काढायचा ब्रिटिशांचा प्रयत्न हिवाळ्याच्या सुरुवातीपर्यंत कायम होता. त्याच्या निर्दयपणातून महिला सत्याग्रहीसुद्धा सुटल्या नाहीत. हजारो महिलांना निर्घृणपणे मारहाण करून तुरुंगात टाकण्यात आलं होतं.

मी परत जायला निघालो तेव्हा सारा भारत संतापानं नखशिखांत धुमसत होता. कुजकट वासानं भरलेला बाजाराचा परिसर असो किंवा विद्यापीठाचा आखीव-रेखीव प्रदेश असो सर्वत्र एकच ताणाव. मुंबई-कलकत्त्याच्या गजबजलेल्या वस्त्यांची भावनाही काही वेगळी नव्हती. गल्लीबोळातून पसरलेल्या रस्त्यांरस्त्यावरही हीच चीड. जियेजिथे म्हणून चार भारतीय जमत त्या प्रत्येक ठिकाणी याशिवाय दुसरा विषयच नव्हता.

आता गांधीजी काय करतील ? या प्रश्नाने मी आश्चर्यचकित होत होतो तसा संभ्रमातही पडत होतो. त्यांच्याशी बोलायची नितांत आवश्यकता आहे असं मला वाटत होतं. यापुढे ते कोणत्या मार्गाने जाणार आहेत, त्यांच्या त्या जगावेगळ्या क्रांतीची धोरण काय असणार आहेत एवढंच मला जाणून घ्यायचं नव्हतं तर त्यांचं व्यक्तिमत्त्व अनुभवायचं होतं. जगातल्या इतर कोणत्याही नेत्यापेक्षा मला गांधींच्या व्यक्तिमत्त्वाची भुरळ पडली होती.

## मी स्तिमित झालो होतो....

एकोणिसशे बावीसमध्ये मी पहिल्यांदा त्यांच्या तुरुंगवासाबद्दल वाचलं. त्या प्रसिद्ध खटल्यात त्यांनी केलेल्या बचावाच्या भाषणाने मी पार भारावून गेलो होतो. त्यानंतर अगदी अलीकडेच मी त्यांचं आत्मचरित्र वाचलं. भारत स्वतंत्र करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न पाश्चात्य वृत्तपत्रातून का होईना, पण शक्य तेवढ्या खोलवर जाऊन मी जाणून घेतले होते.

या सगळ्यावरून गेली अनेक वर्षं मला वाटत होतं की, हा या पृथ्वीतलावरचा महानतम माणूस आहे. साऱ्या खंडप्रदेशाला जागं करणारा आणि अवघ्या जगाला भान देणारा एवढा प्रभावी नेता आमच्या काळाने कधीच पाहिला नव्हता. धूर्त, कणखर राजकारणी पण त्याबरोबर साधाभोळा धार्मिक प्रवृत्तीचा मनुष्य. ख्रिस्ताशी जवळीक सांगणारा. घरी कातलेल्या सुताचा पंचा आणि कटाक्षाने स्वीकारलेली दारिद्र्याची रहाणी. वर काठोकाठ नम्रपणा. बोलेल तसा चालणारा.

त्यांच्या देशातले कोट्यवधी लोक तर त्याला संतच मानत. त्यांच्या विरोधाला न जुमानता ते त्याला 'महात्मा' म्हणत. साऱ्या जगावर राज्य करणाऱ्या पाश्चात्य वृत्ती आणि मानसिकतेपेक्षा पूर्णतः वेगळं असं काही तरी त्यांना या महात्म्यात सापडलं होतं. त्यांच्या दर्शनातून ते त्यांना मिळत असावं.

गांधींना मात्र दर्शनाचा हा प्रकार कधीच आवडला नाही. 'त्यांच्यामधला दर्शनाचा फॅडचा मी बळी झालो होतो...दर्शनासाठी आलेल्यांच्या आंधळ्या भक्तीनं मी संतापत असे...त्याहीपेक्षा कित्येकदा मला विलक्षण वाईट वाटत असे.' असं गांधींनी आपल्या आत्मचरित्रात लिहिलं आहे. या दर्शनवाल्यांमुळं आपल्या कामात व्यत्यय येतो अशीही तक्रार ते करत.

जवळजवळ दहा वर्षं गांधीजी या जगावेगळ्या क्रांतीचं नेतृत्व करत होते. ब्रिटिशांना भारतातून हाकलून स्वातंत्र्य मिळवण्यासाठी संघटित, शिस्तबद्ध आणि अहिंसक अशा कायदेभंगाच्या चळवळीमार्फत त्यांचे प्रयत्न चालले होते. ब्रिटिशांच्या बंदुका, संगिनी आणि लाठ्यांना ते उत्तर देत होते निःशस्त्रपणे. शांततेच्या हत्यारानं. आम्हा अमेरिकनांच्या दृष्टीनं हे सगळं अनोखं होतं. १७७० च्या अखेरीला आमच्या देशातून ब्रिटिशांना हाकलण्यासाठी आणि स्वातंत्र्य मिळवण्यासाठी आम्ही वापरलेला मार्ग असा नव्हता, ब्रिटिशांना हिंसेचा प्रतिकार आम्ही केला तेवढ्याच प्रखर हिंसेनं. त्यांच्या बंदुकांना नामोहरम करण्यासाठी आमच्याकडेही बंदुका होत्या. त्या लढ्यात आम्हाला यशही मिळालं होतं.

दुसऱ्या एखाद्या मार्गानं क्रांती कशी काय होऊ शकणार हेच मला सुरुवातीला समजलं नव्हतं. साऱ्या पश्चिमेला गांधी जे काही करत होते ते निरर्थक वाटत होतं. आमच्या दृष्टीनं हिंसा हा स्थायीभाव होता आणि आमच्या इतिहासावरसुद्धा त्याचंच प्रभुत्व होतं.

गांधींनी सुरुवातीला देशातल्या आणि देशाबाहेरच्या लोकांना आपला मार्ग समजावून सांगायचा प्रयत्न केला होताही. ते म्हणत, 'जिथे युद्धं बंदुकांच्या जोरावर लढवली जातात अशाच भूमीवर ही लढाई खेळवण्याचा ब्रिटिशांचा मनसुबा आहे. त्या भूमीवर आम्ही शस्त्रहीन आहोत. सगळी हत्यारं त्यांच्याकडेच आहेत. आम्हाला युद्ध अशा भूमीवर लढवायचंय जियं ते शस्त्रहीन असतील आणि हत्यार आमचं असेल. त्यातच त्यांच्या पराभवाची निश्चिती आहे.'

गांधींचं तर्कशास्त्र साधं-सरळ होतं. निःशस्त्र भारतीयांच्या हाती उरलेला हा एक आणि एकमेव उपाय होता; पण सुरुवातीला तो भारतातल्या आणि बाहेरच्या फारच थोड्या मंडळींना उमजला.

पण तीस सालच्या ऑगस्टमध्ये मी भारतात येण्यासाठी व्हिएन्नाहून निघालो तेव्हा मला तरी ते कुठं कळलं होतं ? गांधींच्या या अद्भुत क्रांतीची वार्तापत्रं लिहिण्याचं काम शिकागो ट्रिब्यूननं माझ्याकडे सोपवलं म्हणून मी निघालो इतकंच.

त्याच वर्षीच्या वसंतात गांधींनी आपल्या मोजक्या अनुयायांसह बेकायदा मीठ तयार करण्यासाठी समुद्रापर्यंत एक 'यात्रा' काढली होती. जाळणाऱ्या उन्हाळ्यातल्या त्या पायपिटीचा उपयोग काय हे मलाही समजलं नव्हतं; पण गांधींच्या त्या प्रातिनिधिक कृतीनं भारतीयांनी ब्रिटिश साम्राज्यातली जवळजवळ तीन शतकांची गुंगी झुगारून दिली होती. एखादं परकीय राष्ट्र नव्हे तर फायद्यासाठी

लालचावलेली 'ईस्ट इंडिया कंपनी' नावाच्या व्यापाऱ्यांची टोळी त्यांच्यावर दोन शतकं सुखानं राज्य करत होती. ह्या दोनशे वर्षांच्या काळातलं भारतीयांचं अविश्वसनीय जीवन आठवलं की, या जागृतीचं महत्त्व कळतं.

माझ्या मते, एखाद्या खाजगी व्यापारी कंपनीनं एवढा मोठा देश बळकावण्याचा, पोलादी पकडीनं तो ताब्यात ठेवण्याचा आणि स्वतःच्या फायद्यासाठी त्याची लुबाडणूक करण्याचा इतिहासातला हा एकमेव दाखला होता. कदाचित ब्रिटिश होते म्हणूनच हे करू शकले ! रुडयार्ड किपलिंगनं वारंवार आळवलेलं योग्य जागी योग्य माणूस नेमण्याचं त्यांचं कसब, धंदेवाईक दृष्टी आणि ध्यानी-मनी वसलेली *वर्णश्रेष्ठत्वाची भावना हे त्यांच्या या यशाचं कारण* असावं ! 'काळ्या' लोकांत फूट पाडून त्यांच्यात आपसातच भांडणं लावून देणंही त्यांना चांगलं जमायचं. त्यांच्या सत्तेला, नफेबाजीला आव्हान देणाऱ्या सर्वांचा समूळ नायनाट करण्याइतका निर्दयपणाही त्यांच्या ठायी होताच.

कदाचित ब्रिटिश सैन्याचं थोडं-फार पाठबळ लाभलेल्या या व्यापाऱ्यांना सहजगत्या शरण येतील आणि त्यांच्या ताब्यात दीर्घकाळ रहातील असे जगाच्या पाठीवर केवळ भारतीयच होते. अगोदरच त्यांची अवस्था कठीण होती. मुघल साम्राज्याच्या नाशानंतर एकमेकांवर कुरघोडी करू पहाणारी, सतत लढणारी अनेक लहान-मोठी राज्यं इथं निर्माण झाली होती. डॉ. राधाकृष्णननी म्हटल्या-प्रमाणे, 'ज्या दिवशी भारतमातेनं स्वातंत्र्य गमावलं त्या दिवशी ती शापभ्रष्ट झाली आणि पाषाणवत् बनली !'

प्रसंगी भारतीयांनी गोऱ्या राज्यकर्त्यांविरुद्ध सशस्त्र उठाव केलेही होते. परिणामी दोन्ही बाजूंना रक्तपात घडला. 'इन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका'मधल्या ठरीव ब्रिटिश ढंगानं लिहिलेल्या भारतीय इति-हासात याबद्दल म्हटलंय, '१७६४ मध्ये तीस शिपायांना बंदुकीच्या तोंडी देऊन ठार मारण्यात आलं. बंड शमवण्यासाठी ते आवश्यक होतं.' हा प्रकार मी नंतर काबूलमध्ये पाहिला. तिथं अफगाण शासनकर्ते बंडखोरांना तोफेच्या तोंडी देत. हे तंत्र आपण अफगाण युद्धाच्या वेळी ब्रिटिशांकडून शिकल्याचं त्यांनी मला सांगितलं होतं.

भारतीय क्रौर्याची कहाणी म्हणून सांगितली जाणारी कलकत्त्याच्या काळकोठडीची हकीकत तर ब्रिटनमधल्या प्रत्येक शाळकरी मुलाच्या तोंडी होती. १७५६ मध्ये एका भारतीय नबाबानं कलकत्त्याच्या एका ब्रिटिश व्यापारी वसाहतीवर कब्जा केला आणि १४६ गोऱ्यांना अटक केली. नंतर त्यांना केवळ अठरा बाय पंधरा फुटांच्या अरुंद कोठडीत कोंडून ठेवलं. भयंकर गर्मीचे ते दिवस होते. दुसऱ्या दिवशी त्यांपैकी फक्त तेवीसजण बचावले. बाकीच्यांचा घुसमटून मृत्यु झाला होता. अर्थात त्याआधी त्या कोठडीत किती भारतीय कैदी मरण पावले होते हे मात्र कुणालाच माहीत नाही ! ब्रिटिश मात्र तोपर्यंत भारताचा इतिहास निर्धोकपणे लिहीत होते !

पण कधी तरी यात बदल होणं अपरिहार्य होतं. एकोणिसाव्या शतकाच्या ऐन मध्यावरचा तो काळ. जग झपाट्यानं बदलत होतं. अशा वेळी आपल्याहून प्राचीन आणि समृद्ध संस्कृती लाभलेल्या कोट्यवधी लोकांच्या वसाहतीवर एका व्यापारी कंपनीनं राज्य करणं हे दिवाळखोरीचंच लक्षण होतं. समृद्ध संस्कृतीशिवाय भार-तीयांवर हिंदू आणि मुस्लिम अशा दोन महान धर्मांचाही विलक्षण प्रभाव होता. साहजिकच व्यापारी कंपनीचं राज्य फार काळ तग धरू शकेल अशी शक्यता नव्हती.

याचा पहिला स्फोट झाला १८५७ साली. ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या आधिपत्याखालच्या बंगाल नेटिव्ह आर्मीतल्या शिपायांनी बंड पुकारलं. एखाद्या वणव्यासारखं ते उत्तर आणि मध्यभारतातल्या बहुसंख्य राज्यांत पसरलं. घुसमटवून टाकणाऱ्या उन्हाळ्यातला तो संहार भयानक होता. शेवटी कंपनीच्या दिमतीसाठी असलेल्या ब्रिटिश सैन्यानं हा उठाव मोडून काढण्यात यश मिळवलं.

पण तेवढं पुरेसं नव्हतं. या बंडाळीच्या वेळी, ब्रिटिशांना आपलं चंबूगबाळं आवरून चालतं व्हावं लागेल आणि भारत भारतीयांच्या ताब्यात येईल असं वाटायला लावणाऱ्या अनेक घटना घडल्या होत्या. लंडनमधले सत्ताधारी तर एवढे हादरले होते की, यापुढं व्यापारी कंपनी या प्रचंड देशावर राज्य करू शकणार नाही असा निष्कर्ष त्यांनी काढला. बारा ऑगस्ट १८५८ ला एकोणचाळीस वर्षांच्या व्हिक्टोरिया राणीनं एका कायद्याला मंजुरी दिली आणि या वसा-हतीचा ताबा राजघराण्याकडे गेला.

बरोबर दोनशे अठ्ठावन्न वर्षांचा काळ. ३१ डिसेंबर १५९९ ते बारा ऑगस्ट १८५८. एलिझाबेथ राणीनं ईस्ट इंडिया कंपनीला ईस्ट इंडीज बेटातल्या सगळ्या व्यापाराचे हक्क दिले ते ३१ डिसेंबर १५९९ ला. मसाल्याच्या पदार्थांच्या व्यापारातली डच लोकांची दादागिरी मोडायची आणि त्या पदार्थांचे भाव कमी करायचे एवढाच त्या वेळी ब्रिटिशांचा उद्देश होता. एक क्षुल्लक इच्छा ते समृद्ध वसाहत जिंकण्याची महत्त्वाकांक्षा असा हा प्रवास. हा अडीचशे वर्षांचा काळ, त्यामध्ये ब्रिटिशांनी गाजवलेली सत्ता, केलेली मनमुराद पिळवणूक हा इतिहासाच्या पुस्तकातला अगदी जगावेगळा भाग आहे. राधा-कृष्णननी म्हटल्याप्रमाणे भारतीयांच्या दृष्टीनं हा शापच होता. ब्रिटिशांना मात्र याची किंचितही जाणीव नव्हती. अर्थात सगळ्याच साम्राज्यवाद्यांमध्ये तेवढा निगरगट्टपणा असतोच म्हणा !

## नियतीने सोपविलेली जबाबदारी

भारताची राणी म्हणून व्हिक्टोरियांचा अशा प्रकारे राज्याभिषेक झाला. *भारत आता ब्रिटिश राजघराण्याच्या मालमत्तेचा एक भाग* होता. सर्वांत मोठा, सर्वाधिक नफा देणारा असा भाग !

राणीच्या आधिपत्याखालच्या या कालखंडाचं रुडयार्ड किपलिंगनं मोठं कोडकौतुक केलं आहे. ब्रिटिशांचा जन्मच सत्ता, मालकी हक्क गाजवण्यासाठी होता असं किपलिंग आणि त्यांच्या असंख्य चाहत्यांचं म्हणणं. अशा धन्यानं आपल्यापेक्षा 'खालच्या', 'कमी प्रतीच्या' लोकांवर राज्य करावं ही या मंडळीच्या दृष्टीनं दैवगतीच. 'भारती-यांवर राज्य करणं नियतीनं ब्रिटिशांच्या खांद्यावर दूरदृष्टीनं सोपव-लेली जबाबदारी आहे' असा किपलिंगचा ठाम समज होता. वास्त-विक किपलिंग भारतात जन्मलेला होता. भारत त्यानं जवळून पाहिला होता; पण राजाची चरणसेवा करण्यात आयुष्य दवडलेल्या इतर ब्रिटिशांच्यात आणि त्याच्यात फारसा फरक आहे असं दिसत नव्हतं. या 'खालच्या प्रतीच्या लोकांनाही' एक संस्कृती आहे आणि ती अनेक दृष्टींनी आपल्यापेक्षा अधिक समृद्ध, प्रगल्भ आहे याबाबत तो अनभिज्ञच आहेसं वाटत होतं. कदाचित इतर गोऱ्या मंडळींबरो-बर हा देशभक्त कवीही वाहवत गेला असेल; पण त्याच्या लिखा-

णात भारतीयांच्या या समृद्ध वारशाचा साधा उल्लेखही दिसत नाही हे मात्र खरं ! विशेष म्हणजे त्या काळात केवळ इंग्लंडच नव्हे तर अमेरिकेतले बहुसंख्य लोकही किपलिंगच्या लिखाणावरूनच भारताविषयीचं चित्र आपल्या मनात तयार करत असत. त्यांच्या मनात भारताची एक उथळ चित्रविचित्र आणि ब्रिटिशांना झुकतं माप देणारी प्रतिमा उभी राहिली असेल तर नवल नाही.

या काळात ब्रिटिश राजसत्तेचं वैभव कळसाला पोचलं असलं तरी भारत मात्र मृतवत् झाला. आपण आपलं स्वातंत्र्य परत मिळवू शकू ही भारतीयांच्या मनातली आशाही जवळजवळ नष्ट झाली. राधाकृष्णननी आपल्या पुस्तकात तर हे म्हटलच आहे; पण नंतर गांधींची ओळख झाल्यावर त्यांनीही मला हेच सांगितल. भारतातल्या माझ्या पहिल्या काही महिन्यांच्या वास्तव्यातच मला निराशेनं काळवंडलेली जुन्या पिढीतली अशी अनेक माणसं भेटली. ब्रिटिश छत्राखाली वाढता-वाढतानाच त्यांच्या मनात ही निराशा पेरली गेली होती.

गांधींसारखे काहीजण उच्चशिक्षणासाठी इंग्लंडला गेले, तिथं राहिले आणि इंग्लिश शिकले होते. इंग्लिश चालीरीती आणि विचारांबरोबर तिथलं राजकीय स्वातंत्र्याचं वेडही अंगवळणी पडलं होतं. या मंडळींना भारतात परतल्यावर बहिष्कृतापेक्षा थोडी चांगली वागणूक मिळे इतकंच. ब्रिटिशांपेक्षा ते खालच्याच दर्जाचे आहेत याची जाणीव मात्र गोरेसाहेब त्यांना सतत करून देत.

त्या शतकाच्या अखेरीपर्यंत ब्रिटिशांनी या देशावर आपली पकड व्यवस्थित बसवली. रस्ते, रेल्वे, तारायंत्राचं जाळं थामधून अस्ताव्यस्त पसरलेला सगळा देश जोडला. पर्यायानं तो अधिक फायदेशीर आणि नियंत्रण ठेवायला सोपा करून टाकला. ही सत्ता एवढी अनिर्बंध वाटत होती की, जगाच्या अंतापर्यंत हा गोरासाहेब आपल्यावर राज्य करणार आहे अशा निष्कर्षाला काही भारतीय पोचले ! त्यानीच मला तर सांगितलं. देश कसा चालवावा याबद्दलच्या त्यांच्या मताला तर आता किंमत नव्हनीच; पण जगावं कसं हेही ठरवणं जणू त्यांच्या हाती नव्हतं. शेवटच्या थेंबापर्यंत हा गोरासाहेब भारत नावाच्या या दुभत्या गाईचे आचळं ओढू शकणार होता !

ब्रिटिशही अगदी सुखेनैव संचार करत होते. आपण परक्या देशात आहोत, इथल्या लोकाचं आपल्यावर प्रेम नाही, किंबहुना आपण नकोसेच आहोत याची त्यांना किंचितही जाणीव नव्हती. भारतीयाकडे पहाण्याचा त्यांचा दृष्टिकोन मानहानिकारक होता. संस्कृतिपरंपरेने समृद्ध अशा लोकांना ते वर्ण-संस्कृति-बुद्धिमत्तादृष्ट्या खालचे समजत. त्यांच्याकडे राज्य करायची लायकी नाही, असं त्यांचं म्हणणं होतं.

रोजघडीला किंवा एखाद्या वेळी गोऱ्या साहेबाला ओलाडून पुढं जायचं असेल तर भारतीयांना वाकावं लागे, मुजरा करावा लागे. यापेक्षा मरण परवडलं अशी अनेकांची भावना होती.

## मिशनऱ्यांचे उपद्व्याप

यात भर म्हणून ख्रिश्चन मिशनऱ्यांचे उपद्व्याप. ही साधीसरळ मंडळी त्यांच्या धर्मात सांगितल्याप्रमाणे 'मूर्तिपूजकांना' ख्रिस्ताचा मार्ग दाखवत होती ! मंडळी साधीसरळ असली तरी महत्त्वाकांक्षी होती. धर्मांतराचे त्यांचे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर चालले होते. त्याबद्दल हिंदू-मुस्लिमांत प्रचंड चीड होती. भारताच्या भूमीवर पाऊल ठेवीपर्यंत हा संताप किती खोलवर रुजलेला आहे याची मला जाणीव नव्हती. गांधींसारखा सहनशील आणि सहिष्णु माणूससुद्धा त्यांच्या जन्मगावी चाललेल्या बाटवा-बाटवीविरुद्ध विलक्षण कडवटपणे बोलत असे. वास्तविक गांधींना सर्व धर्मांबद्दल आदर होता. कित्येकदा ते मला बायबलच्या न्यू टेस्टामेन्टमधला कुठचा भाग घेण्यासारखा आहे ते सांगायचे. या उदारमतवादी हिंदूलासुद्धा मिशनऱ्यांचे चाळे अपमानकारक वाटले म्हणजे बघा !

गांधी जोपर्यंत या सगळ्यात कुठेच नव्हते तोपर्यंत ब्रिटिशांचं हे सहजगत्या राज्य करणं चाललं होतं. कंपनीने भारतीयांचा ताबा राणीकडे दिला तेव्हा तिची शक्ती मोजकीच होती. दोन हजार आय. सी. एस. अधिकारी, दहा हजार अन्य अधिकारी आणि दोन लाख काळ्या शिपायांना आपल्या तालावर नाचवणारे साठ हजार गोरे सैनिक एवढ्या जोरावर ते कोटयवधी लोकांवर राज्य करत होते. विशेष म्हणजे हे गोरे सैनिक बहुतेकदा काळ्या सैनिकामार्फतच त्यांच्या देशबांधवांची दडपणूक करत !

या सर्वांवर आधिपत्य चाले व्हाइसरॉयचं. राजदंडाचे अंतिम अधिकार त्यांच्याकडे होते. तो जबाबदार होता लंडनच्या सरकारला. भारतीयांची कोणतीच जबाबदारी त्यांच्यावर नव्हती. अर्थात् भारतात इतरही लोक होतेच. विशेषतः व्यापारासाठी आलेले हजारो ब्रिटिश दुकानदार, डॉक्टर्स, वकील, स्कॉटिशांची संख्याही भरपूर होती. शिवाय डझनावारी इंग्रजी वृत्तपत्र चालवणारे गोरे पत्रकारही. इंग्लिशच या देशाची अधिकृत भाषा होती. अगदी अल्पसंख्यांना ती येत असली तरीही !

कर्मठ जातिव्यवस्था जशी हिंदूंमध्ये होती तशी ब्रिटिशांमध्येही होती. गोरे अधिकारी, मग ते सरकारी सेवेतले असोत की सैन्यातले, गोऱ्या व्यापारांना क्वचितच बरोबरीनं वागवत. जवळजवळ नाहीच असं म्हटलं तरी चालेल, गोऱ्या अधिकाऱ्याकडून त्यांच्या वाट्याला नेहमी तुच्छताच येई. त्यांना समाधान एकच 'काळ्या' लोकांपेक्षा, अगदी त्यातल्या श्रेष्ठ ब्राह्मणापेक्षा, आपण थोडे वरच्या दर्जाचे आहोत !

ब्रिटिश कधीही भारतीयांमध्ये मिसळत नसत. कोणत्याही सामाजिक समारंभात ते भाग घेत नसत. भारतीय, मग ते कितीही शिकलेले-सुसंस्कृत असोत. त्यांच्यापासून चार हात दूर रहाणंच चांगलं असं त्यांना वाटे,

ही शिवाशिव सार्वत्रिक होती. मुंबईत आल्यानंतर काही दिवसानी मी एका वरिष्ठ अधिकाऱ्याबरोबर बॉम्बे क्लबमध्ये जेवायला गेलो होतो. तो अशा तऱ्हेने बोलत होता की, भारतीयांनी अजून आपल्या घराच्या दाराचा उंबरठाही ओलांडलेला नाही असं नवख्या माणसाला वाटलं असतं !

आणखी एकदा मला असाच अनुभव आला. एका प्रतिष्ठित मुस्लिम जोडप्याला मी ताजमहाल हॉटेलात जेवणाचं आमंत्रण दिलं. त्यांची मुलगी मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेणाऱ्या पहिल्या भारतीय विद्यार्थिनींपैकी एक होती. (कदाचित ती पहिली मुस्लीम मुलगीही असावी.) जेवणानंतर त्या तरुणीबरोबर मी नृत्यही केलं. किरमिजी रंगाच्या साडीत ती फारच सुंदर दिसत होती हे मला आजही आठवतं. दुसऱ्या दिवशी मात्र त्याचे परिणाम भोगावे लागले. माझ्या ओळखीच्या काही ब्रिटिशानी मला त्याबद्दल सुनावलं. "असं आज-

वर कधीही घडलेलं नव्हतं " ते म्हणाले. मी माझं वतन सुधारावं असंही त्यांनी बजावलं!

मलाही असं वागून चालणार नव्हतं. मी जाणूनबुजून हे केलं होतं, अशातलाही प्रकार नव्हता. भारतीयांनी स्वातंत्र्यासाठी चालवलेला संग्राम पहायला मी आलो होतो. लंडनहून येणाऱ्या इशाऱ्यानुसार भारतीयांना राजकीय स्वातंत्र्य द्यायचं नाकारणाऱ्या या ब्रिटिश अधिकाऱ्यांशी संपर्क ठेवणं माझ्या दृष्टीनं आवश्यक होतं. त्या गोऱ्या अधिकाऱ्यांच्या मनात होतं तरी काय ? ही जिज्ञासा मला छळत होती. स्वराज्याचा आपला हक्क जपण्यासाठी या ब्रिटिशांनी वेळप्रसंगी प्राण पणाला लावायचीही तयारी दाखवली होती. मग ते आणि त्यांचे लंडनचे सत्ताधीश भारतीयांना तोच हक्क देण्याविरुद्ध का होते ?

पण त्याहीपेक्षा महत्त्वाचं होतं भारतीयांच्या अंतरंगाचा वेध घेणं. बहुसंख्य हिंदू आणि अल्पसंख्य मुस्लिमांचं नातं तपासण्यासाठीही मी उत्सुक होतो. या दोघांत द्वेष होता, तसं गैरसमजाचंही प्रचंड जाळं पसरलेलं होतं. दोन धर्मांतल्या किळसवाण्या वितुष्टाचं ते प्रतिनिधित्व करत. धार्मिक भांडणं किती अक्राळविक्राळ रूप धारण करू शकतात याचा अनुभव युरोपनं एक शतकभर घेतला होता. कॅथलिक आणि प्रॉटेस्टंट अतिरेक्यांतली ही युद्धं नंतर आमच्या वेळी उत्तर आयर्लंडनेंही अनुभवली. या मूर्ख, रक्तरंजित लढायांत दोन्ही बाजूंचे लोक ख्रिश्चन धर्मीयच होते हे विशेष !

कित्येकदा ब्रिटिशच हिंदु–मुस्लिम दंग्यांना उत्तेजन देत. त्यांच्या 'फोडा आणि राज्य करा' तंत्राचाच तो एक भाग होता. ते अशा कौशल्याने परिस्थिती चिघळवत की भारतीयांनाही त्यात पडण्याशिवाय गत्यंतर नसे. गांधीजी आयुष्यभर हा प्रश्न सोडवण्यासाठी धडपडत होते हे मी स्वत: पाहिलंय. जोपर्यंत हिंदु–मुस्लिम असे एकमेकाचे गळे आवळण्यासाठी टपलेले होते तोपर्यंत स्वातंत्र्याच्या लढ्यात त्यांची एकजूट होण्याची सुतराम आशा नव्हती. सुरुवातीला गांधींना थोडंफार यश मिळालंही. त्यांनी प्रमुख मुस्लिमांना काँग्रेसमध्ये आणलं, अध्यक्ष बनवलं; पण यशापेक्षा अपयशच याबाबतीत मोठं होतं. पुढं हेच अपयश स्वातंत्र्यसंग्रामाच्या अंतिम प्रगतीतला अडसर ठरलं. गांधीजींची ही सगळ्यात मोठी निराशा होती. आपलं सगळं तन–मन गांधीजींनी अलीकडच्या काळात याच कामासाठी दिलं होतं.

या ऐतिहासिक टप्प्यापर्यंत महात्मा गांधी कसे पोचले याची कहाणी अनेक पुस्तकांतून सांगितली गेली आहे. सगळ्यात महत्त्वाचं त्यांचं आत्मकथन आणि १९२१ नंतर 'यंग इंडिया' साप्ताहिकात त्यांनी केलेलं लेखन.

□

भारतात येण्यासाठी बोटीत बसल्यापासून पुढचे दहा दिवस मी हे सगळं आठवत होतो. दिल्लीला जाऊन गांधींची भेट घेण्यासाठी गाडी पकडली तरी ही उजळणी संपली नव्हती. विषयाची व्याप्तीच एवढी मोठी होती की, सरळपणे मी तो संपवू शकलो नाही. त्यातली प्रचंड गुंतागुंत, ब्रिटिश आणि भारतीय इतिहासातले आडवेतिडवे धागे, अनेकांच्या आयुष्यातले अपघाती कोपरे, मानवी स्वभाव, युरोपियन आणि भारतीय अशा दोन टोकांच्या संस्कृतीचा हा बहुढंगी संघर्ष पहाताना मी पार चक्रावून गेलो. आधी गांधींनाच भेटणं श्रेयस्कर असं मी ठरवलं. प्रत्यक्ष निर्मात्याच्याच तोंडून त्याच्या निर्मितीबद्दल ऐकावं असा सोइस्कर विचार यामागे होता. गांधींची कुशाग्र बुद्धिमत्ता, त्यांचा कोट्यवधी लोकांवरती असलेला प्रभाव मला समजून घ्यायचा होता. विसाव्या शतकातल्या क्रांतिकारी राजकारणाच्या दृष्टीने त्यांची कामगिरी अनोखी होती. ते त्यांचं सत्याग्रहाचं तत्त्वज्ञान मला त्यांच्याच तोंडून ऐकायचं होतं. 'सत्याग्रह' हा शब्द त्यांनी आपल्या मातृभाषेतून–गुजरातीतून घेतला होता. हिंदू सदसद्विवेकाच्या दृष्टीनं कायदेभंग, असहकार, शांततामय सत्याग्रह याहीपेक्षा काही तरी वेगळा, खोल अर्थ या शब्दामागे आहे असं मला वाटत होतं. सत्याचा शोध आत्मिक सामर्थ्य अशा मूलभूत कल्पनांशी या शब्दाचं नातं आहे असं माझा भारतातला आधीच्या वर्षीचा अनुभव सांगत होता. त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे या शब्दानं सर्वसामान्य माणसाला एक नवी वाट दाखवली होती. आजवर त्याच्याकडून हिसकावून घेतलेला काही तरी अमूल्य ठेवा त्याला गवसला होता. आता तो पिळवणूक, हिंसा किंवा युद्धासारख्या गोष्टींना ताठ कण्यानं उत्तर देऊ शकत होता.

निदान मला समजलेला सत्याग्रहाचा हा अर्थ बरोबर आहे की नाही हे तरी गांधीजी सांगू शकले असते. ब्रिटिशांना पदच्युत करण्याच्या त्यांच्या लढाईतला पुढचा टप्पा कुठचा हेही मला त्यांच्याकडूनच कळलं असतं. असंख्य बंदुका, पोलिस आणि तुरुंग पदरी बाळगणाऱ्या ब्रिटिशांच्या सामर्थ्याविषयी गांधींचं म्हणणं काय हेही मला जाणून घ्यायचं होतं.

### ही कसोटीच पुढचा मार्ग ठरवणार होती.

गेले काही महिने भारतीयांचा हा क्रांतिकारक लढा मी निरखत होतो. त्यावरून एक गोष्ट मात्र मला स्पष्टपणे दिसत होती. गांधींचा भारत आणि ब्रिटिश एका तिठ्यावर उभे होते. जिथे त्यांचा संघर्ष अपरिहार्य होता आणि ज्या तिठ्यावरच्या लढाईत निकाल त्यांच्या नशिबाचीही कसोटी पहाणार होता. ही कसोटीच त्यांचा पुढचा मार्ग ठरवणार होती. इतिहासाच्या प्रवाहात असे प्रसंग क्वचितच येतात.

राष्ट्राचं आणि तिथल्या लोकांचं भवितव्य ठरवणाऱ्या या घटना असतात. जसं इथे पस्तीस कोटी जनतेचं आणि ब्रिटिश साम्राज्याचं भवितव्य पणाला लागलं होतं !

अंतिम निकालाची बहुतेक जबाबदारी मात्र या छोट्याशा, किरकोळ बांध्याच्या हडकुळ्या हिंदूच्या खांद्यावर होती. काळवेळेचा अंदाज घेऊन तो आपली पावलं टाकत होता. आपल्या असाधारण बुद्धिमत्तेच्या जोरावर तो अँग्लोइंडियन इतिहासाला दिशा दाखवणार होता. एकट्यादुकट्या व्यक्तीनं महत्त्वाच्या घटनांवर आपला प्रभाव टाकायची ही काही पहिलीच वेळ नव्हती. त्यापूर्वी जगाने अशी अनेक उदाहरणं पाहिली होती. आमच्या वेळेला युरोपात असा प्रभावशाली लेनिन होऊन गेला. त्यापाठोपाठ हिटलरचाही जन्म झाला. गांधींप्रमाणेच इतिहासाचे प्रवाह आपल्या असंख्य अनुयायांच्या बाजूनं वळवायची प्रतिभा आणि शक्ती त्याच्यामध्ये होती. लेनिन, हिटलरशिवाय कदाचित बोल्शेविक आणि नाझी क्रांत्या यशस्वीच होऊ शकल्या नसत्या. गांधी नसते तर ब्रिटिश साम्राज्याला जबरदस्त आव्हान मिळालंच नसतं. तीस साली गांधींनीच पहिल्यांदा ब्रिटिशांना दाखवलं. हिटलरबद्दल फ्रेडरिक मिनेकनं म्हटल्याप्रमाणे गांधींमध्येही मला अफाट सामर्थ्य दिसलं. इतिहासातल्या जबरदस्त व्यक्तिमत्त्वांपैकी ते होते.


मी दिल्लीला पोचलो तेव्हा गांधी आणि लॉर्ड आर्यविनची बोलणी चालू होती. जवळपास रोज ते चर्चा करत. कित्येकदा रात्री उशीरापर्यंतही त्यांच्या या बैठका चालू रहात. गांधीजी कायदेभंगाची चळवळ मागे घ्यायला तयार होते. अटी फक्त दोनच—तुरुंगातल्या पन्नास हजार सत्याग्रहींची सुटका आणि इतक्या वर्षांच्या टाळाटाळीनंतर भारतीयांना स्वराज्य देण्याच्या वाटाघाटी सुरू करण्याचं फक्त वचन !

गांधीजी भयंकर कामात होते; पण मला भेटायचं त्यांनी मान्य केलं. ही खासियत अनेक थोर माणसात मी नंतर बघितली. कितीही महत्त्वाच्या कामात असोत, माझ्यासारख्या पत्रकाराला काहीही करून ही मंडळी भेट देतच.

गांधींच्याबाबत सुरुवातीलाच हा सुखद अनुभव आला. पुढेही अनेकदा त्यांच्या या वृत्तीचा प्रत्यय आला. मी खूष झालो; पण त्या वेळी गांधीजी माझ्या वार्तापत्रांना किती महत्त्व देत होते हे मला माहीत नव्हतं. कुठचं साधन कसं वापरावं हे त्यांना बरोबर माहीत होतं. माझ्यामुळं त्यांचा विचार जगभर पोचणार होता आणि त्यांना त्याची किंमत नक्कीच कळत होती ! त्यांचा स्वातंत्र्यलढा टिपण्यासाठी एखाद्या अमेरिकन पत्रानं पाठवलेला मी भारतातला एकमेव प्रतिनिधी होतो. शब्दाला एक डॉलर असा प्रचंड खर्च मला माझी वार्तापत्रं तारेनं पाठवायला येत असे. फक्त 'शिकागो ट्रिब्यून'मध्येच नाही तर अमेरिकेतल्या इतर अनेक महत्त्वाच्या पत्रांत ती प्रसिद्ध होत. त्यासाठी खास आमच्या वृत्तसंस्थेची वर्गणी या पत्रांनी भरली होती. माझ्या वार्तापत्रात फक्त ब्रिटिशांचीच नव्हे तर भारतीयांचीही बाजू असे. माझ्या मते अमेरिकन लोकांना पहिल्यांदाच भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचं निःपक्षपाती वृत्त मिळत होतं. 'ट्रिब्यून'च्या पॅरिस आवृत्तीतही माझ्या बातम्या रोज छापून येत. सहाजिकच युरोपातले लोकही प्रथमच असं चित्र पहात होते. युरोपातल्या एकाही पत्राचा स्वतःचा वार्ताहर त्या वेळी भारतात नव्हता. त्यापैकी अनेक दैनिकं माझ्याच बातम्या उचलत असत.

'न्यूयॉर्क टाइम्स' हे त्या काळातलं अमेरिकेतलं सगळ्यात प्रतिष्ठित दैनिक; पण त्यांचा प्रतिनिधीही भारतात नव्हता. लंडनच्या 'टाइम्स'च्या प्रतिनिधीनं दिल्लीहून पाठवलेल्या बातम्यांवरच त्यांची मदार होती. 'टाइम्स' हा प्रतिनिधी खास ब्रिटिश खाक्यातला होता. हुशार, पण भरपूर पिणारा. त्याच्या रोजच्या बातम्या म्हणजे अगदी खास ब्रिटिश 'मतं' असत. त्याला स्वतःला समजलेला तो एकमेव दृष्टिकोन होता आणि त्याचंच प्रतिबिंब बातमीत पडायचं इतकंच ! □

---



"या जगावेगळ्या म्हाताऱ्याला दारिद्र्यात ठेवणं किती महागात पडतं हे तुम्हाला नाही कळायचं !" —सरोजिनी नायडू विनोदानं म्हणत.

□

नेहरूही काहीसे नाराजच होते. लॉर्ड आर्यविन—बरोबरच्या वाटाघाटीत गांधी फारच तडजोडी करतात असं काँग्रेस वर्किंग कमिटीतल्या त्यांच्या गटाचं मत होतं.

□

पण गांधी ठाम होते. एक साधा लखोटा घेऊन ते गोऱ्या साहेबांशी चर्चा करायला जात. साहेबांचे अधिकारी फाइली उपसत, चार—चार वेळा खलबतं करत; पण या एकसष्ट वर्षांच्या तरुणाच्या डोक्यात सगळी गणितं आधीच तयार असत !

## गांधी—शिरर पहिली भेट

**लेखांक दुसरा । पुढील अंकी**

## सर्चलाइट

अमृत पुरंदरे

# वेद आणि विज्ञान

वेद हे हिंदुधर्माचे आद्य ग्रंथ. त्यांच्यात खूप काही सांगितलं आहे, याच्यापलीकडे मला वेदांची माहिती नाही आणि माझ्या मते आज भारतातल्या नव्याण्णव टक्के लोकांची माझ्यापेक्षा वेगळी परिस्थिती असेल असे मला वाटत नाही. अशा या वंदनीय ग्रंथांबद्दल थोडी तरी माहिती व्हावी असं बरेच दिवस माझ्या मनात होतं; पण तसा योग येत नव्हता. एक दिवशी सकाळ वाचनाना 'चुकवू नये असे काही' या सदरात वेद विज्ञानमंडळाचा 'सेमिनार' हुजुरपागेमध्ये असल्याचे समजले......गेलो.

कार्यक्रम सुरू झाला तेव्हा जेमतेम साठ-सत्तर लोक जमले होते. अपेक्षेप्रमाणे म्हातारे किंवा वयस्कर लोकांचा भरणा जास्त होता. तुरळक तरुण कुठे तरी कोपऱ्यात उभे होते. फारशी गडबड नाही, दगदग नाही. प्रथम डॉ. वर्तक बोलले. ही पुण्यातली बरीच फेमस व्यक्ती असल्यामुळे मी त्यांच्याबद्दल काही लिहीत नाही. त्यांनी वेद आणि विज्ञान यांचा संबंध आहे असे प्रतिपादन करून अध्यक्ष डॉ. व्यंकटाचारी यांची ओळख करून दिली.

डॉ. व्यंकटाचारी हे उज्जैनी येथील एका कॉलेजचे प्राचार्य आहेत. ते स्वतः गणितात एम. ए. झालेले आहेत आणि संस्कृतचे पंडितसुद्धा आहेत. 'राजा भोज आणि समकालीन शास्त्रे' या विषयावर त्यांनी बराच अभ्यास केलेला आहे.

ओळख करून देण्याच्या कार्यक्रमानंतर या संस्थेच्या चिटणिसांनी संस्थेची आणि तिच्या कार्याची थोडक्यात माहिती दिली. ती थोडक्यात अशी –'ही संस्था गेली सहा वर्षे कार्य करीत आहे. या सेमिनारला जो प्रतिसाद मिळाला तो आत्तापर्यंतच्या सर्व कार्यक्रमांपेक्षा सर्वात जास्त आहे. वेदांमध्ये जे शास्त्र सांगितले आहे ते लोकांसमोर आणण्याचे कार्य ही संस्था वेगवेगळ्या *स्कॉलर्सना बोलावून, त्यांची व्याख्याने ठेवून करते. त्या स्कॉलर्सची नावे ... इ. त्यानंतर 'कुट्टक' या विषयावर पहिले व्याख्यान झाले. कुट्टक म्हणजे कठीण किंवा किचकट गणित. आता गणितासारखा विषय की, जो जगातल्या निम्म्या लोकांचा शत्रू आहे, तो मांडताना अतिशय सोप्या पद्धतीनं मांडला तर जरा तरी सहन होतो. माझे आणि गणिताचे कधीच जमले नाही. गणिताच्या पेपरच्या आदल्या दिवशी मला नेहमी एखादा माजलेला रेडा अंगावर चाल करून येतोय असे स्वप्न पडायचे! तर अशा या कठीण गणितातला अतिकठीण भाग म्हणजे कुट्टक! आता हे कुट्टक समजावून घेणे म्हणजे आपण एकाच वेळेला सतपाल आणि दादू चौगुले यांच्याशी कुस्ती करायला उभे रहाण्यासारखेच... काही समजले नाही ...

आणि बहुतेक सर्वच कार्यक्रम हे असेच संपले! त्याचे कारण असे की, दिलेला वेळ फार थोडा होता आणि घेतलेले विषय फार मोठे होते. त्यामुळे वक्त्याची फार घाई घाई होत होती. तो थोड्या वेळात जास्तीत जास्त सांगायचा प्रयत्न करायचा. त्यामुळे अजूनच गोंधळ व्हायचा. असो. तरी पण जी काही चांगली व्याख्याने झाली त्यांच्यापैकी वैदिक गणितावर श्री. दिलीप कुलकर्णी यांचे एक व्याख्यान.

गणितासंबंधी माझी मते मी वरतीच परखडपणे मांडली आहेत. त्यामुळे ज्या वेळेला 'वैदिक गणित' हा विषय मांडायला दिलीप कुलकर्णी नावाचा एक किरकोळ पोरगा उभा राहिला तेव्हा मी उठून जायचाच विचार करत होतो; परंतु सुरुवातीला त्यांनी गोवर्धनपीठाचे शंकराचार्य स्वामी भारतीकृष्णतीर्थ या थोर अभ्यासकाची (गणितज्ञाची) थोडक्यात छान ओळख करून दिली. ती या ठिकाणी देतो.

"स्वामींचा जन्म १८८४ सालचा. ते लहानपणापासूनच तल्लख बुद्धीचे. १८९९ साली ते मॅट्रिकच्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. त्याच वर्षी मद्रासच्या संस्कृत संघटनेने त्यांना 'सरस्वती' ही पदवी दिली.

१९०२ साली ते बी. ए. झाले व १९०४ साली ते एम. ए. झाले; पण नवल असे की, एकाच वेळेला ते विज्ञान, तत्त्वज्ञान, इतिहास, इंग्रजी, गणित व संस्कृत या सर्व विषयांच्या 'अमेरिकन इन्स्टिटयूट ऑफ सायन्सेस' या संस्थेने घेतलेल्या परीक्षांना बसले व सर्वांमध्ये प्रथम आले!! (इथे एक पुणेरी शंका ... त्या वेळेला 'अमेरिकन इन्स्टिटयूट ऑफ सायन्सेस'मध्ये संस्कृत हा विषय खरंच होता का? दिलीप कुलकर्णींना हा प्रश्न विचारायचा राहून गेला. असो.) त्यांचा हा विक्रम अजूनही अबाधित आहे!

त्यानंतर ते बंगलोरला प्राचार्य म्हणून होते; पण मुळचा पिंड योग्याचा, त्यामुळे या सर्वांवर पाणी सोडून त्यांनी १९१९ पासून आठ वर्षे शृंगेरीभोवतालच्या घनदाट अरण्यात, एकांतवासात अध्यात्मसाधना केली. १९१९ साली त्यांना संन्यासदीक्षा दिली गेली. १९२५ मध्ये ते पुरीच्या गोवर्धनमठाचे शंकराचार्य झाले.


त्यांनी आठ वर्षे जी साधना केली त्या काळात त्यांनी अथर्ववेदात विखुरलेल्या माहितीवरून काही संस्कृत-सूत्रे रचली. यालाच त्यांनी वैदिक गणित असे नाव दिले. ही सोळा सूत्रे वापरून गणितातल्या कोणत्याही शाखेतली उदाहरणे कमीत कमी वेळात सोडविता येतात असे त्यांनीच सांगितले आहे. या गणिताच्या प्रचारासाठी त्यांनी भारतात व अमेरिकेत अनेक दौरे काढले.

या सूत्राचा वापर कसा करावा याची माहिती देणारे सोळा ग्रंथ त्यांनी लिहिले. हे ग्रंथ त्यांच्या एका शिष्याने निष्काळजीपणाने हरवले; परंतु एवढ्याने खचून न जाता त्यांनी ते पुन्हा पहिल्यापासून लिहायला घेतले. एक ग्रंथ लिहून पूर्णसुद्धा झाला; परंतु १९६० साली त्यांनी समाधी घेतली. त्यामुळे मानव उरलेल्या पंधरा ग्रंथांतील अमूल्य ज्ञानाला मुकला!

एवढी इंटरेस्टिंग बॅकग्राउंड तयार झाल्यावर श्री. कुलकर्णी यांनी वैदिक गणितातली सूत्रे कशी वापरावीत हे सांगितले. मोठमोठे गुणाकार, भागाकार, वर्ग इ. गोष्टी केवळ काही बेरजा व वजाबाक्या सोडवून कशा करायच्या हे त्यांनी सांगितले. खरोखरीच ते अत्यंत सोपे होते. मला असा प्रश्न पडला

# स्वातंत्र्याची हाक

'स्वातंत्र्य व सार्वभौमत्व यांचे रक्षण
मेहनतीमुळेच होते.
– महात्मा गांधी





सर्व भारतीय लोक इच्छित ध्येयाप्रत
पोहोचेपर्यन्त व आपली प्रतिज्ञा
पूर्ण होईपर्यन्त आम्हापैकी कोणालाही
उसंत घेण्यास वेळ नाही. – पं. जवाहरलाल नेहरू

व्यक्ती प्रमाणेच, राष्ट्राच्या विकासाला व
जडणघडणीला पूर्ण वाव मिळण्यासाठी
स्वातंत्र्याची आवश्यकता असते.
स्वातंत्र्याला अभिप्रेत आहे सर्व बाजूंनी
कठोर परिश्रम.
– पंतप्रधान, श्रीमती इंदिरा गांधी



प्रतिज्ञापूर्तीसाठी
महाराष्ट्र कटिबध्द आहे.

डी.जी आय पी आर /१९८२-८३

की हे आपल्याकडे अजून शिकवत कसे नाहीत ?

कार्यक्रम संपल्यावर मी त्यांना हा प्रश्न विचारला तेव्हा ते म्हणाले की, इंग्लंडमध्ये 'काही शाळांमध्ये वैदिक गणित हा विषय सक्तीचा आहे तसेच 'Vaidic Mathematics' हे मूळचे स्वामीचे पुस्तक ९० टक्के परदेशांतच खपते ! कुलकर्णींनी मराठीमध्ये वैदिक गणित याच नावाने एक पुस्तक प्रसिद्ध केले आहे. याच्या १५०० प्रती एका महिन्यात संपल्या !

असाच एक इंटरेस्टिंग विषय म्हणजे 'लिपीशास्त्र'. उच्चाराचा आणि लिपीचा कसा संबंध असतो हे श्री. वाकणकर यांनी छान सांगितले. वर्ण कसे तयार झाले ? त्यांचा अभ्यास कसा महत्त्वाचा आहे ? हे त्यांनी थोडक्यात सांगितले. कॉम्प्युटर हा फक्त रोमन लिपी समजू शकतो. देवनागरी लिपी त्याला समजेल असे कोणीच मानत नव्हते. कारण देवनागरीमध्ये मूळ वर्ण रोमन लिपीपेक्षा बरेच जास्त आहेत; परंतु वाकणकरांनी प्रथमच असे दाखवून दिले की, देवनागरी लिपी आणि रोमन लिपी यांच्यात बरेच साम्य आहे आणि नंतर लगेच देवनागरी लिपीही कॉम्प्युटरच्या भाषेत बसवूनसुद्धा दिली. आता काही दिवसांतच मराठी 'बोलणारा' कॉम्प्युटर जर तुम्हाला दिसला तर आश्चर्य मानू नका. अर्थात हे सर्व सांगताना वेदाचा आणि पाणिनीचा लिपीशास्त्रात कसा उपयोग झाला ते त्यांनी वेळोवेळी समजावून दिले.

### वेदात हे आहेच !

वेदकालीन विमाने या विषयावर डॉ. वर्तक याचे व्याख्यान असेच मनोरंजक होते. त्यांनी अनेक ग्रंथांची माहिती देऊन, तसेच सध्याचे काही उपलब्ध पुरावे देऊन वेदकाळात विमाने कशी होती ते सांगितले. त्यांनी असे काही श्लोक सांगितले की जे विमानाच्या रचनेची माहिती देत होते. ते श्लोक काही मला ( अर्थातच ) आठवत नाहीत; पण त्याचा सारांश असा की, वेदकाळात तीन मुख्य प्रकारची विमाने होती. एक गोल, एक डमरूसारखे व एक मृदुंगासारखे. त्यांना इंधन म्हणून पाण्याची वाफ वापरत असत. (ही वाफ अत्यंत विषारी असते व त्यामुळे माणसाचे दात गळून पडू शकतात हे त्यांनी सांगितले नाही) त्या विमानाच्या आवाजाचे आणि बाह्य दृश्याचे वर्णन या श्लोकात केलेले होते. तसेच त्यांनी दक्षिण अमेरिकेमध्ये जी 'इंका' संस्कृती होती, तिचा आणि भारताचा संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला ! त्यांच्यामते दक्षिण अमेरिकेत या वाळवंटी प्रदेशात जी प्रचंड चित्रे आहेत व मोठमोठे 'रन वे' सदृश पट्टे आहेत (ही गोष्ट खरी आहे. याचे फोटो हल्ली बऱ्याच पुस्तकांत बघायला मिळतात.) ते या विमानांना खुणा म्हणून असावेत वगैरे... मला काही या गोष्टी पटल्या नाहीत.

शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. व्यंकटाचारी यांनी समारोपाचे भाषण केले. त्यांनी मांडलेले विचार मोठे विचार करायला लावण्यासारखे होते. ते म्हणाले, 'वेदामध्ये खूप काही सांगितले आहे असे नेहमीच म्हटले जाते. उदाहरणार्थ– परदेशांत विमानाचा शोध लागला की, आपण म्हणतो, 'हे काय वेदांमध्येसुद्धा आहे.' परदेशांत अणुबाँबचा शोध लागला की, आपण म्हणायचे, 'हुं, वेदांमध्ये हे कधीच सांगितले आहे' पण त्यांनी एखादा शोध लावायच्या आधी आपण वेदांचा आधार घेऊन तुम्ही एखादे यंत्र, उदा. विमान बनवले तर त्याला काही अर्थ आहे. मी एकदा एक विनोद ऐकला होता, 'एक कुठलासा मंत्र जर का अनेक वेळा म्हटला तर माणूस अदृश्य होऊ शकतो' असे एकाने सांगितले. दुसऱ्याने युक्ती केली, त्याने या मंत्राची रेकॉर्ड बनवली आणि तो ती सारखी वाजवू लागला. परिणामतः तो माणूस अदृश्य होण्याऐवजी ती रेकॉर्डच अदृश्य झाली ! तसेच 'अनेक गोष्टी आपल्याकडे होत्या हो; पण काय करणार ? आता काही उरले नाही !' असे रडत बसायची सवय लोकांना लागली आहे. मुख्य प्रश्न येतो तो संस्कृत चांगले जाणणाऱ्या शास्त्रज्ञांचा; परंतु शास्त्र व संस्कृत हे दोन्ही विषय सहसा एकत्र येत नाहीत. त्याचप्रमाणे या विषयातली तज्ज्ञ माणसेसुद्धा एकत्र येत नाहीत. त्यामुळे वेदांमधले अफाट ज्ञान नुसतेच पडून राहिले आहे. इत्यादी.


या समारोपाला कार्यक्रमाच्या सुरुवातीला जेवढी गर्दी होती त्यापेक्षा बरीच कमी गर्दी होती.

– यावरून हा सर्व सेमिनार कसा झाला असेल ते तुमच्या लक्षात येऊ शकेल. तरी पण आज असे काही काम चालले आहे हे काही वाईट नाही आणि अशा काही संस्था पुण्यात आहेत म्हणूनच पुण्याचे वैशिष्ट्य टिकून आहे.

शेवटी 'हे असेच चालत आले आणि तसेच चालत रहाणार'...असे किंवा तत्सम काही 'संस्कृत श्लोकात' लिहायला मला आवडले असते; परंतु......

□


# टॉलस्टॉय – एक माणूस
दुसरी आवृत्ती
लेखिका : सुमती देवस्थळे
किंमत : ५५ रुपये
राजहंस प्रकाशन, १०२५, सदाशिव, पुणे ३०



# मुक्काम : ब्रीच कँडी

## सारी मुंबई एक घर झाली आहे. त्या घरात अमिताभ आजारी आहे !

हेमंत देसाई

सध्या अवघ्या मुंबईचंच एक घर होऊन राहलंय. या घरात एक अमिताभ आहे. तो मरणासन्न आहे अन् त्याच्या प्रकृतीच्या प्रत्येक चढउताराबरोबर हे घर हलून अन् हेलावून जातंय. वृत्तपत्रकचेऱ्यांत रोज 'अमिताभ बच्चन कसा आहे ?' अशी विचारणा करणारे अनेक फोन, त्याच्या तब्येतीविषयी प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, अमिताभला रक्त देण्याची छोटया-छोटया मुलींनीही दाखवलेली तयारी, माहीम चर्चमध्ये त्याच्यासाठीच झालेल्या प्रार्थना व लोकल, हॉटेल्स एकूण सर्वत्र ही एकच चर्चा असं हे या 'घरातलं' वातावरण.

दूरदर्शनमुळं तर आबालवृद्धांच्या एकदम जवळ आलेला अमिताभ, राखीपौर्णिमेच्या दिवशीच्या छायागीतात 'मजबूर'मध्ये तो फरिदा जलालला उद्देशून 'नहीं मैं नहीं देख सकता तुझे रोते हुए' हे गाणं म्हणतो, तेव्हा तमाम चित्रपटशौकिनांच्या मनात अमिताभविषयी एक वेगळीच जवळीक निर्माण झालेली ...

बंगलोरला 'कूली'चं शूटिंग करताना जखमी झालेल्या अमिताभला ३१ जुलैला मुंबईत विमानानं आणण्यात आलं अन् त्वरित ब्रीच कँडी इस्पितळात दाखल करण्यात आलं. प्रथम तो अतिगंभीर, मग गंभीर व फारशी काळजी करण्यासारखी त्याची प्रकृती नाही, असं ताजं वृत्त आहे. बंगलोर येथे त्याला नेमकं काय झालंय हे डॉक्टर्सना त्वरित समजू शकलं नाही. खरं तर त्यांच्याकडून दुर्लक्षच झालं, असं सांगण्यात येतंय, अमिताभला ब्रीच कँडी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आल्यानंतर राजीव गांधी, पंतप्रधान इंदिरा गांधी; एवढंच नव्हे, तर बबनराव ढाकणेही त्याला भेटून आले. परवीन बाबी, स्मिता पाटील, रेखा, अशोककुमार, यश चोप्रा आदि बडी मंडळी भेटून गेली. जावेद खान, सुरेश चटवाल हे छोटे–मोठे नटही जाऊन आले. यापलीकडे चाहत्यांचा एक मोठा वर्ग फोनवरून 'आम्हाला अमिताभशी बोलायचंय' अशा प्रकारचा हट्ट धरून असतो, असं खुद्द अमिताभच्या भावानं, अजिताभनंच मला सांगितलं,

बंगलोर विद्यापीठात मनमोहन देसाईंच्या 'कूली' सिनेमाचं शूटिंग चालू होतं. दृश्य होतं मारामारीचं. रिहर्सल झाल्यानंतर एकाएकी अमिताभ वाकून पोट आवळू लागला. त्याचा चेहरा चिंताव्याप्त झाला. मंडळींना वाटलं, की तो अजून रिहर्सलच करतोय !

अमिताभलाही वाटलं की, टेबलावर जोरात आदळल्यामुळं पोट दुखलं असेल वगैरे. म्हणून कोणतेही वैद्यकीय उपचार न घेता, त्यानं वेदनाशामक गोळया घेतल्या. हॉटेलमध्ये परतल्यानंतर थोडया वेळातच वेदना असह्य होऊ लागल्या. मग तडबडतोब अमिताभला सेंट फिलोमिना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं. जसलोकमध्ये जयप्रकाश नारायणांवर ज्यांनी उपचार केले, ते डॉ. भट योगायोगाने बंगलोरातच होते. त्यांनी त्वरित शस्त्रक्रिया करणं आवश्यक असल्याचं सांगितलं.

दरम्यान, अमिताभची आई तेजी बच्चन, जया प्रभृती विमानाने बंगलोरात आलेले. याच वेळी रेखा तिरुपतीला गेल्याबद्दलचं एक वृत्त. अमिताभचा व्यक्तिगत हेअरड्रेसर हकीम कैरनवीने तेथे येऊन कुराणपठण केलं. आय. एस. जोहर, प्रकाश मेहरा, रमेश सिप्पी, यश जोहर, सुभाष घई, दिलीपकुमार, सायरा बानो, प्रभृती मंडळीही अमिताभच्या

प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी बंगलोरमध्ये. अशा घटकेला, अमिताभसारख्या कसलेल्या अभिनेत्याला भेटण्यासाठी दिलीपकुमार-सारखा ज्येष्ठ कलाकार येतो, या गोष्टीस फार महत्त्व आहे.

या वेळपर्यंत अमिताभची प्रकृती अधिकाधिक गंभीर होत होती. रक्तातील पेशींचं प्रमाण कमी होऊ लागलं होतं. मुंबईहून तज्ज्ञ डॉक्टरांचं एक पथक बोलावण्यात आलं. अखेर अमिताभला मुंबईत नेण्याचा निर्णय झाला. विमानतळावरून थेट ब्रीच कँडी हॉस्पिटल; पण विमान व मोटारीतील प्रवासात धक्के बसल्याने त्याची जखम जास्तच चिघळली असावी ...

## कडक बंदोबस्त

–तर पेडर रोडवरचं प्रशस्त आवार असलेलं, समुद्रकाठचं, स्वच्छ-सुंदर ब्रीच कँडी हॉस्पिटल. इथे कनूभाई शाह यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टरांचं एक पथक अमिताभच्या प्रकृतीवर दिवसरात्र लक्ष ठेवून आहे.

मी ब्रीच कँडीत गेलो, तेव्हा हॉस्पिटलच्या अगदी बाहेरच्या प्रवेशद्वारापाशी सिक्युरिटी गार्ड येणाऱ्या जाणाऱ्यांवर नजर ठेवून होता. त्याच्याकडे पूर्णतः दुर्लक्ष करून मी आत प्रवेश केला. आतलं आवार मोठं आहे. तेथे मोटारींचा ताफाच्या ताफा. हॉस्पिटलच्या या आतल्या प्रवेशद्वारासमोर, मोटारींपाशी मी उभा राहिलो. एवढ्यात पाऊस आला. तसा मी समोरच्या दरवाजापाशी गेलो. तेथे छत मिळालं. चुकार पाऊस चिंब करून सोडत होता, तोच शशिकपूर आपल्या मोटारीतून आला. तो जवळच नेपियन सी–रोडवर राहातो. जागरणामुळे त्याचे डोळे सुजल्या-सारखे दिसत होते. थोडावेळ आत जाऊन तो लगेच बाहेर आला. प्रवेशद्वारापाशीच लावलेल्या मोटारीत बसायचं म्हणजे थोडा पाऊस लागणारच; पण तेवढं कारणही त्याला आपल्या नोकरावर वैतागायला पुरेसं ठरलं. 'छाता नहीं लाया' असं तो सारखा पुटपुटत होता.

जया, हरिवंशराय, अजिताभ, तेजी बच्चन हे सर्वजण पेडर रोडजवळच्याच एखाद्या हॉटेलमध्ये किंवा स्नेह्याकडे राहात असावेत. कारण सकाळी साडेआठ–नऊलाच ही मंडळी आली. तेजी बच्चन आल्या व लगेच गेल्या. जया मात्र दिवसभर थांबली. हरिवंशराय यांचा चेहरा अत्यंत दुःखमय भासला.

अमिताभचा भाऊ अजिताभ हा काळजी-पूर्वक सर्व कामं करताना दिसत होता. अमिताभला चित्रपटसृष्टीत जाण्याचा सल्ला देणारा हा अजिताभ. एवढ्या काळजीतही त्याचा चेहरा प्रसन्न होता; पण चेहरा प्रसन्न ठेवणं वेगळं आणि नटूनथटून, तोंड फाकवीत चाहत्यांचा सलाम स्वीकारत येणं वेगळं, जे बहुसंख्य फिल्म–स्टार्स करत होते.

वहिदा, नंदा या दोघीही एकदम नटूनथटून आल्या होत्या. दोघींचे चेहरे निर्विकार वाटले. शशीकपूर रोज एकदा हॉस्पिटलमध्ये येऊन जातो,असं ऐकलं. त्याच्या येण्याजाण्यात किंवा ओमप्रकाशच्या चेहऱ्यावर, हालचालीत कुठेही हिरोपणा जाणवला नाही. अत्यंत 'कॅज्युअल' वेषात व पद्धतीने ते आले होते. व्यावसायिक संबंधांपलीकडचे भावनिक संबंध जोडले गेल्यामुळे ते आले आहेत हे सहजपणे जाणवत होतं.

## शीतल जैन

अमिताभच्या सेक्रेटरी व चमच्यांनी ब्रीच कँडीचं स्वरूप वजबजपुरीचंच करून टाकलंय. या दोघांमुळं त्याला अपवाद घडला.

ब्रीच कँडीतलं वातावरण न्याहाळत मी बसलो असताना अमिताभचा एक सेक्रेटरी शीतल जैन तर मला म्हणाला, 'व्हाय आर यू सिटिंग हिअर फॉर सो मच टाइम ?'

मला त्याला उत्तर देणं भाग पडलं 'धिस इज नॉट युवर प्रायव्हेट प्रॉपर्टी, आय अ‍ॅम डुइंग माय ड्यूटी. डू यूवर ओन जॉब !'

अमिताभच्या प्रकृतीबद्दल गुप्ततेचं वलय राखण्याचा हा प्रयत्न म्हणून एक तर गूढ किंवा अजब म्हणावा लागेल. त्याच्या प्रकृतीबद्दल सार्वत्रिक चिंता आहे; असंच पण वेगळ्या स्तरातलं, निराळ्या पद्धतीचं प्रेम जेपींनाही लाभलं. जेपी जसलोकमध्ये असताना अशी गुप्तता पाळली जात नसे. आज मात्र प्रेक्षकांच्या प्रेमाच्या पाठिंब्यावर मोठ्या झालेल्या अमिताभच्या प्रकृतीबाबत मनमोकळेपणाने काहीच सांगितलं जात नाहीये. 'सुपरस्टार' हा लोकांपेक्षा मोठा, लोकांपेक्षा वेगळा, लोकांपासून दूर असतो. कदाचित ही प्रतिमा जतन करण्यासाठीच ही गुप्तता पाळली जात असावी !


सध्या तरी ब्रीच कँडीत पैसे गुंतल्यामुळं निर्माते–वितरक, आयत्या गर्दीत मिरवण्याचा आनंद मिळविण्यासाठी येणारे नट-नटीच जास्त ! त्यामुळं हस्तिदंती रंगातलं; पण अमिताभच्या आजारपणामुळं काळवंडलेलं ब्रीच कँडी हॉस्पिटल मला विकृत वाटलं; भेसूर वाटलं.

## पुनीत इस्सार

अपवाद होता तो काही स्टंट्समनचा. त्यातला प्रमुख म्हणजे पुनीत इस्सार. ज्याच्या ठोशामुळं हे सर्व नाट्य घडलं, तो पुनीत. सहा फुटी, गोरापान, मार्शल आर्टपटाईत पुनीत. खरं तर मनमोहन देसाईंच्या प्रतिस्पर्धी निर्मात्यानं अमिताभला पुनीतच्या मदतीनं मारून टाकण्याचाच हा डाव होता वगैरे बेलगाम आरोप यापूर्वी प्रसिद्ध झालेले. त्यामुळं खरोखरच तो व्यथित झाला होता. अखेर एका चिठ्ठीद्वारे अमिताभनंच पुनीतचं सांत्वन केलं.

असा हा पुनीत दरवाजापाशीच असलेल्या एका खुर्चीत नुसता बसून होता. मी त्याला बोलतं करायचा प्रयत्न केला, तेव्हा त्यानं काही नियतकालिकांतून याविषयी प्रसिद्ध झालेल्या मजकुराबद्दल आत्यंतिक चीड व्यक्त केली.

पुनीत सांगत होता : मी अमिताभच्या चेहऱ्यावर ठोसा मारायचा अर्थातच तसं नाटक करायचं आणि त्याने चेहरा वळवायचा असं एक दृश्य होतं. त्याच्या पुढच्या दृश्यात अमिताभनं कोसळून



पुनीत
ज्याच्यामुळं हे नाट्य घडलं !

लोखंडी टेबलावरून पडायचं असा प्रसंग होता. या प्रसंगात त्यानं डमी वापरायची असं ठरलं होतं; पण अमिताभ हा जेवढा बडा कलाकार तेवढाच निडर आदमी ! मी त्याला ठोसा ‘मारताच’ तो वळला आणि स्वतःहूनच टेबलावरून कोसळू लागला. टेबलाची लोखंडी कड अणकुचीदार होती. प्रसंगातल्या इन्व्हॉल्व्हमेंटमुळं त्यानं डमी न वापरता काम केलं. सुरुवातीला त्यालाही काय झालंय ते समजलं नाही. थोड्या वेळानं अमितनं पोट धरलं तेव्हा शूटिंग लौकर संपवायचं असेल म्हणून अमित नाटक करतोय अशी ऋषिकपूरनं थट्टाही केली. नंतर मात्र ते दृश्य फार भारी पडल्याचं लक्षात आलं ! ......

आडदांड पुनीत अत्यंत गंभीरपूर्वक सांगत होता. तरीही त्याला मी विचारलं, ‘आता तुमची मानसिक स्थिती नेमकी काय आहे ?’

‘काय वाटायचंय......’ एवढंच बोलून पुनीतनं आपली भावना प्रदर्शित केली. अपघातानंतर तीन दिवस त्याला क्षणभरही झोप नव्हती आणि आता अमिताभ बरा व्हावा म्हणून तो सतत देवापुढं हात जोडून असतो. यातच त्याची घालमेल स्पष्ट व्हावी.

ब्रीच कँडीत अमिताभला दुसऱ्या मजल्यावरच्या इंटेन्सिव्ह केअर युनिटमध्ये ठेवण्यात आलंय. त्याचे कुटुंबीय बहुधा त्याच मजल्यावरील एका खोलीत असतात. बाहेर पोलीस व आत खाजगी सिक्युरिटीवाले असा बंदोबस्त आहे.

प्रत्येक नट अथवा नटी आल्यावर, लिफ्टने वर जाऊन बच्चन कुटुंबियांना भेटून येते. बाहेर चाहत्यांची गर्दी व त्यांच्यासमोर भाव खाऊन घेणारे अमिताभचे सेक्रेटरी अन् अन्य चमचे-मंडळी !

## आजारोत्सव !

सध्या ब्रीच कँडीतलं वातावरण शोकमग्न निश्चितच आहे; पण अमिताभच्या गंभीर आजाराला बरेच दिवस झाल्यामुळं मंडळींना दुःखाचीही कदाचित सवय झाली असेल ! हॉस्पिटलमधलं वातावरण चिंतामय, स्तब्ध व शोकमय असेल, असं आपल्याला वाटत असेल, तर तसं नाहीये. अमिताभच्या गंभीर आजाराचाच उत्सव करण्यात आलाय, असंच दिसून आलं !

अमिताभचा हा अपघात-आजार खरोखरचाच महाग आहे. मनमोहन देसाईंचा कूली, रमेश बेहूलचा पुकार व अंधा कानून, प्रकाश मेहरांचा कायर व शराबी, प्रमोद चक्रवर्तींचा नास्तिक, मुशीर रियाझ यांचा शक्ती आणि एस. रामनाथनकृत महान आदि बिग बजेट चित्रपटांचं भवितव्य टांगणीलाच लागलंय. याशिवाय शशीकपूरच्या एका सिनेमात तो कमल हसनबरोबर येतोय. बी. आर. चोप्रा, अमजद खान, कादरखान, रोमू सिप्पी व रमेश सिप्पी यांच्याही आगामी चित्रपटांत अमिताभ आहे.

अमिताभला सध्या एका चित्रपटासाठी ३० लाख रुपये देण्यात येतात. या हिशोबाने त्याच्या प्रत्येक चित्रपटाचा खर्च अडीच कोटींच्या घरात पोचतोच. यावरून एकूण किती रक्कम अमिताभच्या चित्रपटांत गुंतून पडलीय, त्याची कल्पना येईल !

चित्रपटनिर्माते ३० टक्के व्याजावर पैसा उभारतात. दोन महिने जरी अमिताभला बरे होण्यास लागले, तरी ४० लाख रुपयांचं नुकसान होणार आहे. अमिताभच्या आजारपणामुळे अनेक चित्रीकरणं रद्द करावी लागणार असून, अमिताभबरोबर काम करणाऱ्या प्रत्येक कलावंतास आपल्या तारखा व कार्यक्रमात बदल करावा लागणार आहे.

ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊनच आता निर्माते–दिग्दर्शक मंडळी नायकांना, मारामारीच्या दृश्यात त्यांनी प्रत्यक्ष भाग घेऊ नये म्हणून दडपण आणू लागली आहेत. यश चोप्रा तर म्हणालेच – आता मात्र आम्ही सावधगिरी बाळगणार आहोत. यापुढे हिरो नाही, तर कॅमेराच हाणामाऱ्यांचा आभास निर्माण करील !

## निर्मितीपद्धत बेशिस्त


शेवटी अनुभव आल्याशिवाय शहाणपण येत नाही, हेच खरं. मल्टीस्टारर्स पडायला लागल्यावर, त्याबद्दलचा ‘शोले’नंतर निर्माण झालेला पहिला जोर ओसरला. मल्टीस्टार्स हे आमच्या बेशिस्त व भंपक चित्रपटनिर्मितीचं जणु प्रतीकच ! विशेषतः स्टारमंडळींचा भाव अवाजवी प्रमाणात वाढवणारी ही एक पद्धत.

याच काळात, म्हणजे जंजीरनंतर, भाऊ पाध्येंच्या शब्दांतच सांगायचं, तर अमिताभ प्रेक्षकांवर छा गयासा झाला !’

त्यामुळं एकाच टाइपचे रोल्स असलेले अनेक चित्रपटांचे करार त्यानं करून टाकले. प्रत्येक सिनेमाला दोन तास. दिवसाला तीन-तीन शिफ्ट्स. या पद्धतीत जाण्या-येण्यात, बड्या नटांची वाट पाहाण्यात व पुन्हा थोड्या वेळासाठी सेट लावण्या–काढण्यातच बराच वेळ जातो.


तिसरी आवृत्ती

संपत आली



सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किंमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

अमिताभच्याआधी राजेशचं युग होतं. तेव्हा शत्रुघ्न सिन्हा, संजीवकुमार अन् राजेश हे नट उशीरा यायचे (आजही !) व त्या-बद्दल अभिमानाने सांगायचेही. अमिताभच्या काळातच मल्टीस्टार्सचा जमाना आला. चित्रपटांची बजेट्स वाढली. सिनेमाला चोख धंद्याचं स्वरूप आलं व आज अमिताभमध्ये केवळ त्याच्या बिलिंगपोटीच दहा कोटी रुपये तरी गुतले आहेत. एकूण गुंतवणूक शंभर कोटींची तरी असावी, असा अंदाज बांधता येतो.

यामुळे कर वाढल्यानंतर शेअरबाजारात जशी घबराट निर्माण होते, तशी घबराट सध्या चित्रपटवर्तुळात निर्माण झाली आहे. एका नटामुळं अवघ्या चित्रसृष्टीवर एवढा व्यापक स्वरूपाचा परिणाम होणं कितपत योग्य आहे ?

अमिताभ आज अपघातानं आजारी पडलाय. दोन वर्षांपूर्वी तो काविळीनं आजारी होता, तेव्हाही चित्रसृष्टीत अशीच घबराट माजली होती. अमिताभच्या मृत्यूचीही अफवा पसरली होती. त्यापूर्वी संजीवकुमारही एकदा अतिश्रमानं आजारी पडला होता.

### रोगजर्जर

अमिताभला दम्याचा पूर्वीपासूनच त्रास होता. आता कायमचा मधुमेह होण्याचा संभव आहे. लिव्हरचा त्रास आहेच. तीन-तीन शिफ्ट्समधील कामं, जागरणं, व्यायामाचा अभाव, ही याची उघड कारणं आहेतच. आज अमिताभ दारू–सिगरेट काही घेत नाही; पण पूर्वी भोगलेल्या सवयींचे आज हे परिणाम दिसत असावेत.

स्टार्सना अवाजवी भाव देणं, एका सिनेमात विनाकारण जास्त स्टार्स घेणं याचे परिणाम आज अमिताभ भोगतोय. उद्या कोणत्याही बड्या स्टारवर ही पाळी येऊ शकेल. चित्रसृष्टी यापासून काही बोध घेणार आहे काय ?

काही वर्षांपूर्वी प्रत्येक नटानं अथवा नटीनं एक वेळी सहापेक्षा अधिक सिनेमात कामं करू नयेत, असा अशाच तऱ्हेचा फतवा काढण्यात आला होता. तो नट-नट्यांनी पार धुडकावून लावला होता !

### मैं तुम्हें मरने नहीं दूंगा।

अमिताभ आज मृत्युशय्येवर आहे, हे दृश्य काही पडद्यावरचं नाही. शोले, दीवार, मुकद्दरका सिकंदर आदि चित्रपटांतील त्याचा मृत्यू प्रेक्षकांना हलवून सोडणाराच ! मजबूरमध्ये रोगजर्जर अमिताभही वादळ माजवून जातो, तितकीच तीन तास काळजीही लावून जातो. आज ही काळजी त्यानं रसिकांना लावली आहे. त्यांची भावना आनंदमधल्या बाबू मोशायसारखीच झालीय. आनंदला उद्देशून तो आक्रंदत राहणारा, बाबू मोशाय आनंद, मैं तुम्हें मरने नही दूंगा, मैं तुम्हें मरने नही दूंगा, .. टेप बजाओ, बजाते रहो ..., वगैरे. अमिताभच्या चेहऱ्यावर त्या भूमिकेत दुःख, प्रेम व आक्रदन दाटून आलं होतं.

अन् आज पडद्याबाहेरच्या अमिताभसाठी मुंबईतच नव्हे, तर देश–परदेशांत लोक त्याच्यासाठी प्रार्थना करत आहेत.

हरिवंशराय बच्चनना काय वाटत असेल ? ज्यांच्या साहित्य-संस्कारात अमिताभ फुलून आला ते हे अमिताभचे पिताजी. ब्रीच कँडीत त्यांना पाहिलं तेव्हा 'मधुशाला'कार बच्चन त्यांच्या या कवितेइतकेच व्याकुळ भासले अन् त्यांची 'मधुकलश' मधली 'मांझी' ही कविता आठवली :

आज है अस्थिर गगन
अस्थिर सलिलतल हो रहा है,
किंतु अस्थिर हो न मांझी
धैर्य अपना खो रहा है,
झेलने को इस बडे
तूफान के झोके–झकोरे
मानवी संपूर्ण साहस
वक्ष बीच सँजो रहा है।

☐

पडद्यावरचा अमिताभ तरी मनोबलाचे दर्शन घडवणारा आहे. त्रिशूलमध्ये सुरुंग पेटवून, न डरता जवळच विडी पीत उभा राहाणारा अमिताभ दिसतो. 'जिसको रोज मौत आती है, वो मौतसे क्या डरेगा ?' अशा-तऱ्हेची त्याची वृत्ती झालेली असते.

### मृत्युंजय ?

पडद्याबाहेरचा अमिताभ आज मृत्यूशी झुंज घेत आहे. मृत्यूवर त्याने विजय मिळवावा, अशी सर्वांचीच इच्छा आहे. या विजयानंतरचा अमिताभ मात्र वेगळा असावा, अशी अपेक्षा आहे. मग तो प्रेक्षकांच्या नजरेत 'सुपरमॅन' ठरेलच; पण समीक्षकांच्या नजरेतही भरेल अशी आशा बाळगायला काय हरकत आहे ? ☐


तिचं सौंदर्य हाच तिचा शाप ठरला !....
स्त्रीबुवाबाजीवर झोत टाकणारी
'माणूस'मधून क्रमशः प्रसिद्ध
झालेली कादंबरी आता पुस्तकरूपात
प्रकाशित झाली.

सबला
माधव शिरवळकर

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०
मूल्य रुपये बारा

# यार अमिताभ,

# तुला पुन्हा यायलाच हवं !



रोजच्याप्रमाणेच ते सर्व हमाल आपल्या ‘पसीनेची कमाई’ घेऊन घरी जायच्या तयारीत असतात. आयुष्याचे ओझे आजच्यापुरते उतरवून ते खोपटाच्या दिशेने निघालेले असतात. हातावर असतो आजच्या कामाचा मोबदला; पण त्यातही हिस्सा मागणारे आणि तो गोळा करणारे ‘सामंत और उसके आदमी’ असतात. तो हिस्सा देण्यासाठी नेहमीप्रमाणेच रांग लागलेली असते. तो ‘हिस्सा’ न देण्याची, त्याबाबत जाब विचारण्याची ताकद, हिम्मत कोणात नसते. हिस्सा मुकाट्याने देत, न बोलता रांग पुढे सरकत असते. नव्यानेच कामाला लागलेला एक पोरसवदा हमाल एका जुन्या, वृद्ध हमालाला विचारतो, ‘हा हिस्सा का द्यायचा ?’ ‘मै नहीं दुंगा !’ तो वृद्ध हमाल ही जुनी रीत म्हणून समजावून सांगत असतानाच रांग पुढे सरकत असते. त्या पोरसवदा हमालाचा नंबर येतो. परिणामाची क्षिती न बाळगता ‘हिस्सा’ देण्यास तो नकार देतो. व्हायचे तेच होते. सामंतचे गुंड त्याला लाथा-बुक्क्यांनी तुडवितात. तेवढ्यात भरधाव वेगाने आलेल्या ट्रकखाली सापडून तो पोरसवदा हमाल तेथेच मरतो. निषेधाचा एक अंकुर उमलता–उमलताच लयास जातो.

या पार्श्वभूमीवर त्या पोरसवदा हमालाच्या मागे रांगेत उभी असलेली एक दुर्दम्य आकृती समोर उभी राहते–चारचौघांसारखाच चेहरा असलेली, गळ्याभोवती मफलर गुंडाळलेली, लांबसडक हात व ताड-माड टांगा असलेली ती उंचपुरी व्यक्ती–! विस्कटलेल्या केसांच्या खाली लपलेल्या डोळ्यात समोर घडलेल्या घटनेचा तीव्र संताप ओकणारा अमिताभ समोर येतो !

अमिताभ, तुझ्या तोंडातली विडी ओठातल्या ओठात चुळबुळ करते आणि तू फक्त एवढेच म्हणतोस, ‘कल और एक कुली पैसे देनेसे इन्कार करेगा.’

त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी तू हिस्सा देण्यास नकार देतोस. सामंतचा अडेलतट्टू गुंड तुझ्यावर झडप घालतो. तू त्याचीच वाट पाहात असतोस. त्या गुंडाचा तू पार खिमा करतोस. थोड्याच अवधीत सामंतचे अनेक गुंड तुझा शोध घेतात. तू सापडत नाहीस म्हणून ते एका गोदामात जमतात–आणि तिथेच एका कोपऱ्यातील खुर्चीवर तू शांतपणे बसलेला असतोस. तेथूनच तू त्या सर्वांना साद घालतोस ‘आओ मैं आप सबकी राह देख रहा था.’

बस, अमिताभ, ‘दिवार’मधील ही तुझी सलामीची तिरंदाजी बघूनच आम्ही तुला डोक्यावर घेतला·तिथेच तू आम्हाला जिंकलेस· त्या पोरसवदा हमालाप्रमाणे आमच्यातील दबलेल्या निषेधाला तू ठसठशीतपणे, न डगमगता, बेदरकार स्वरूपात व्यक्त केलंस. आमचं तुझं नातं तिथेच अतूट जमलं–आणि तू आमचा नायक बनलास आणि त्यानंतर जग डोक्यावर घेतलेल्या ‘ॲटलास’ प्रतिमेप्रमाणे तुझा प्रवास चालू झाला. गेले एक तप तो चालू आहे.

आजच्या धावपळीच्या, धकाधकीच्या आमच्या आयुष्यात काही वेळ निवांत बसायला मिळाले तर पाहाता पाहाता तुझ्या अशा अनेक आठवणी मनात गर्दी करतात, अनेक प्रसंग डोळ्यांसमोर धावू लागतात. आमचे मन कृतज्ञतेने तुडुंब भरून जाते. आम्ही भारावतो.

ते तृप्तीचे, बेहोषीचे बेभान क्षण आठवू लागतात. तुझ्या गोळीबंद आवाजातील संवाद कानात घुमू लागतात. हजारो फुटांचा तुझा सारीपाट जसाच्या तसा समोर दिसू लागतो.

त्या पोरसवदा हमालाप्रमाणेच आमचा निषेध कुठे तरी दबला गेलेला असतो–किंवा त्या इतर हमालांप्रमाणेच आम्ही रेशनच्या, बसच्या किंवा मत देण्याच्या रांगेत पुढे सरकत असतो. ‘आहे त्या’ परिस्थितीला मूक प्रतिसाद देत.

अशा वेळी तुझ्यासारखा शूर मर्द पांढऱ्या पडद्यावर उभारी घेतो आणि मग वासना, विकृती, द्वेष, लोभ, स्पर्धा, मत्सर, लाचारी आणि स्वार्थ यांनी व्यापलेल्या या समाजात ...! खून, मारामाऱ्या, गुंडगिरी, हिंसाचार व क्रौर्य यांचा सुळसुळाट असलेल्या या गुन्हेगारी दुनियेत ...! व आमच्या बेबस, वीरान, पराभवाने खचलेल्या जीवनात तू असंतोषाचा फूत्कार करीत, निषेधाचा जयजयकार करीत परिस्थितीला सामोरा जातोस जिंकण्याच्या ईर्षेने, अगदी बिनधास्त-बेधडक मस्तीत तू सामोरा जातोस.

जीवनात पदोपदी घडणारा अन्याय गिळण्याची आदत तू नाकारतोस. कसले पाश तुला खेचत नाहीत, अडवीत नाहीत. कोणतेही भय तुला भेडसावीत नाही. म्हणून तू आपल्याला भिडतोस. कुठे तरी आपल्या मनातलं तू बोलतोस आणि तसं करून दाखवितोस म्हणूनच ‘काला पत्थर’मध्ये कोळसाखाणीत उंदरागत मेलेल्या एकेका कामगाराच्या नावाचा उच्चार करत खाण मालकाला तू झोडपून

काढतोस तेव्हा आपल्यासकट सारे प्रेक्षक तुझ्यामागे उभे असतात.

'दिवार'मध्ये एका उत्तुंग इमारतीच्या बांधकामावर पाटी वाहण्याचे काम करणाऱ्या तुझ्या आईला मुकादम लाथ घालतो तेव्हा हा अन्याय तू डोळ्यात साठवून स्मगलर बनतोस व तीच उत्तुंग इमारत खरेदी करून आईला भेट देण्यासाठी तू आईकडे जातोस आई आणि तुझा भाऊ तत्त्वज्ञानाचे डोस पाजतात तेव्हा तू फार पुढे गेलेला असतोस. त्या वेळी खरेदीखताचे कागद फाडतोस तेव्हा तुझ्याबरोबर आमच्या भावनांचा चोळामोळा होतो. पुढे 'तुम्हारे आदर्श' म्हणून आपल्या पोलीसइन्स्पेक्टर भावाला जे काही सुनावतोस ते अगदी मनापासून पटतं म्हणून आम्ही तुला दाद देतो.

'जंजीर'मध्ये ज्या सराईतपणे खुर्ची लाथाडून पोलीसचौकीत मटका–अड्डेवाल्यांची जागा काय हे तू दाखवून देतोस आणि तोच मटका–अड्डेवाला प्राण तुझी 'वर्दी' बोलतेय असं म्हटल्यावर वर्दी काढून त्याच्या गल्लीत तू एकटा जातोस...तेव्हा आम्ही शिट्टया फुंकतो ते तुझ्या धैर्याचे कौतुक म्हणून !

या समाजाविरुद्धचा दबलेला आमच्यातील असंतोष, चीड, संताप, उद्वेग सारं काही तुझ्या निमित्तानं या पांढऱ्या पडद्यावर उसळून येतं. शब्द, शरीर यातून एक उसळतं अदम्य चैतन्य एखाद्या गरजत्या वादळासारखं तू व्यक्त करतोस. 'नमकहराम'मध्ये आपल्या दोस्ताला मार लागल्यानतर त्याची विचारपूस करून तू गल्लीत येतोस आणि 'कौन माईका लाल है, सामने आओ!' असे आव्हान देतोस ते तुलाच शोभतं. आईचं दूध आणि बापाच्या पसीन्याची किंमत वसूल करण्याचे हक्क या दुनियेत तू एकटाच बिनदिक्कतपणे गाजवू शकतोस. म्हणूनच तुला पडद्यावर पाहताना आमचं रक्त सळसळतं, आमच्या मुठी वळतात !

'लावारीस'मध्ये तू लाकडाच्या वखारीत नोकरीसाठी जातोस तेव्हा तेथील कोणी एक कारकून तुला विचारतो 'नाम क्या ?'

तू म्हणतोस 'हिरा' !

तो कारकून विचारतो, 'बापका नाम क्या ?'

तू म्हणतोस, 'नौकरी मैं करनेवाला हूँ, मेरा बाप नही ।'

बस, अमिताभ इथेच तू आमचा स्वाभिमान जागवतोस. 'मी'ला महत्त्व देणारा तुझा अहंकार आम्हालाही आमच्या आयुष्यात गोजारावासा वाटतो. बापाचे नाव, त्यानंतर येणारे आडनाव व त्याला चिकटून येणारे जात, धर्म व संकुचितपणाचे पापुद्रे तू एका फटक्या सरशी उडवून लावतोस.

तुझ्या हरएक चित्रपटात तुला समाज लाथाडतो, तुझ्या घराची-कुटुंबाची वाताहात तू तुझ्या डोळ्यानी पाहतोस ती साठवूनच तू परिस्थितीला सामोरा जातोस.

घर, आई, वडील, प्रेयसी, पत्नी असल्या गोष्टीविषयी वरपांगी लक्ष न देणाऱ्या तुझ्या निर्ढावलेल्या निबर मनात कायम एक हळवी जागा असते हे सातत्याने जाणवते. म्हणूनच 'मुकद्दर का सिकंदर' असो नाहीतर दिवार, डॉन, त्रिशूल किंवा इमान धरम असो, या सर्वच चित्रपटात तुला कोणाकडून तरी मायेचा, प्रेमाचा ओलावा मिळेल असे वाटते; पण यातले काहीही तुला भेटत नाही. अशा या साध्या निर्मळ सुखासाठी एकीकडे तू तळमळत, तटतटत असतोस. यार अमिताभ, हे तर अगदी थेट आपल्यासारखे असते. फरक इतकाच असतो की, आपण तिथेच पिचत पिसले जात असतो आणि तू मात्र विलक्षण अशा धकाधकीच्या तुरुंग आणि मृत्यूच्या कायम छायेतल्या ससेहोलपटीच्या जीवनात भराऱ्या घेत असतोस. थरारक असे धाडसी जीवन स्वीकारून खून, रक्त आणि पोलिसांच्या आवळत्या मगरमिठीतून जिवाच्या कराराने सुसाट पळत असतोस, निसटत असतोस ——— आणि तुझ्याबरोबर आमचंही मन उच उंच भराऱ्या घेत असत.

आणि असं असतानाही तू 'कुली' या चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या वेळी एका लोखंडी कपाटावर आपटल्याच्या निमित्तानं रुग्णालयात दाखल होतोस — — ! नाही अमिताभ, हे शक्य नाही !

प्रत्यक्षात तुला अहंकारी, गंभीर, हिशेबी असे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असेल आणि तो अमिताभ बच्चन रुग्णशय्येवर असेल; पण विजय, हिरा अशा नावानं पांढऱ्या पडद्यावर धुमसणाऱ्या अमिताभला असं रुग्णशय्येवर पडून चालणार नाही, आम्ही ते चालू देणार नाही. तुला उभं राहायला हवं. पुन्हा एकदा तुझं अदम्य उसळतं चैतन्य आम्हाला पडद्यावर पाहायचय. सर्व प्रकारचे धोके, ताण, रक्त, जखम, वेदना, मृत्यू हे तर तुझ्या आयुष्याच्या पाचवीलाच पुजलेलं–तेव्हा त्यावर नेहमीप्रमाणे मात करून तुला पुन्हा पडद्यावर येणं भाग आहे.

**बाबू मोशाय .... पुन्हा एकदा !**

त्याच त्याच कथा, तोच तोच अमिताभ आम्हाला पुन्हा पुन्हा पाहायचा आहे. मग 'कुली', 'मगन', 'पुकार' व 'शक्ती' अशी वेगळी नावे का असेनात, रामायण माहीत असूनही 'रामलीला' पुन्हा पुन्हा पाहणारे भाविक असतात तसे आम्ही तुझे पाईक आहोत.

रुपेरी पडद्यावरील तुझा दृष्टिकोन पौरुषयुक्त आहे. जीवन हे जगण्यासाठी नाही भिरकाविण्यासाठी आहे असे मानणाऱ्या शर्यतबाज मोटारसारथ्यांच्या आयुष्यासारखे तुझे जीवन सुसाट, वेगवान आहे म्हणून आम्हाला तू हवा आहेस.

आजच्या स्त्रैण, पराभव–युक्त व गुळाबा–साखराबा संस्कृतीत वाढलेले आमचे लेचेपेचे मन तुझ्या तात्कालिक तीन तासांच्या पौरुषयुक्त यशासाठी आणि गरमरक्त्या वेगाच्या नशेसाठी आसुसले आहे.

केवळ स्वप्नरंजनासाठी का असेना, पण जीवनाच्या एका अपवादात्मक परतु सच्चा दर्शनानं तू आम्हाला प्रभावित केलस. निसर्गातील बावनकशी पशुत्व तू मुक्तहस्ते त्या तीन तासाच्या अंधाऱ्या साम्राज्यात आमच्यावर उधळले आहेस.

आयुष्य हा पोरखेळ नव्हे, ते एक मैदान आहे आणि प्राणाची बाजी लावून लढणाऱ्यालाच मर्द म्हणतात, हे तू दाखवून दिलेस आणि म्हणूनच आमच्या खिशाला परवडतील अशा पैशात तुला ही स्वप्न विकणं भाग आहे.

'आनंद'मध्ये तू जसा मृत्यूला कवटाळलेल्या आनंदला सांगतोस–

"छे महिनोंसे तुम्हारी बकबक सुनता आया हूँ. आज तुझे बोलना होगा आनंद. तुझे बोलना होगा...!' तसेच आज आम्ही तुला सांगतोय–'तुला पडद्यावर पुन्हा येणं भाग आहे अमिताभ, भाग आहे...' 'आणि लवकर !'

"बाबु मोशाय, जिंदगी और मौत तो उपरवालेके हाथमें हैं. हमतो इस रगमंचकी कठपुतलियाँ..." ही 'आनंद'ने सागितलेल्या तत्त्वज्ञानाची टेप सुरू होण्याआधी अमिताभ, तुला पडद्यावर पुन्हा यावं लागेल ...!

—कलंदर

( Licensed to post without prepayment of postage–No. 11)

" डॉ. जैन, तुम्ही सूर्य मासिक परत करून
मला सुखाने जगू का देत नाही ?
पंचवीस लाख तुम्हाला पुरेसे वाटत नाहीत का ?
तुम्ही साठ लाख रुपयांवर व्यवहार मिटवाल का ? "

– मनेका गांधी

" नाही.
हा फक्त पैशाचा प्रश्न नाही.
हा निराळ्या जीवनमूल्यांचा प्रश्न आहे.
...पंतप्रधानांची इच्छा असेल तरच. "

–डॉ. जैन

# .... तरच काय ?

# सूर्य मासिक परत घेण्यासाठी पडद्यामागे काय नाट्य घडले ?

## माणूस

तिसरा खळबळजनक लेख

यापुढील २८ ऑगस्ट या अंकात

किंमत : दोन रुपये